# पं. नेहरूंचे अंतरंग

ठाण
१३०६
१९६०

आर. के. करंजिया

RFFBK-0011006

અનુક્રમ ૨૯૯૮૨
વિભાગ ચારિત્ર
ક્રમાંક
ઓ. દિ. ૨૭/૧૨/૬૦.

ચારિત્ર

૧૩૦૬
૨૦/૧/૯૬

દા. નં.
૧૧૦૦૦

# पंडित नेहरूंचें अंतरंग
## एक दर्शन

[The Mind of Mr. Nehru चा मराठी अनुवाद]

आर्. के. करंजिया

उपोद्घात
डा. राधाकृष्णन्

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ..................
क्रमांक ..................... नों: दि: ...............

REFBK-0011000

दि बुक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड
मुंबई २८

पहिली आवृत्ति : १४ नोव्हेंबर १९६०

© George Allen and Unwin Ltd. London, 1960

सर्व भारतीय भाषांमधील अनुवादाचे सर्वाधिकार
दि पेरेनिअल प्रेस, मुंबई ५, यांजकडे

प्रकाशक : कृ. रा. सामंत, दि बुक सेंटर प्रायव्हेट लिमिटेड, रानडे रोड, मुंबई २८
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

# उपोद्घात

आज आपल्या समोर असलेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांविषयींचा जगांतल्या एका महान् विचारवंताचा दृष्टिकोण या मुलाखतीमध्यें व्यक्त झाला आहे. पंथीय दृष्टीनें आपले पंतप्रधान धार्मिक किंवा पोथीनिष्ठ नाहींत, परंतु सत्य आणि करुणा या आध्यात्मिक मूल्यांवर त्यांची निरंतरची श्रद्धा आहे.

—राधाकृष्णन्

# अनुक्रमणिका

परिचय पान सात

१. गांधीजींचा वारसा १
२. आधुनिक जगांतील मार्क्सवाद ९
३. समाजवादाचा भारतीय मार्ग २१
४. एका दशकाचें सिंहावलोकन ३०
५. भारत कुठल्या दिशेनें जाणार ? ४१
६. विकासाचें लोकशाही वळण ५५
७. संश्लेषणाचें तत्त्वज्ञान ६२
८. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सहजीवन ६७
९. नेहरूंनंतर काय ? ८१
१०. भविष्यकाळाचें आव्हान ८६

स्थळप्रत

# परिचय

नेहरूंच्या विषयीं लिहायचें झालें तर खुद्द नेहरूंचेंच दर्शन घेतलें पाहिजे. नेहरूंचा भावी चरित्रकार या नात्यानें त्यांच्या मुलाखती मिळवण्याचा मी प्रयत्न केला तो यासाठींच. नेहरूंचें वाङ्मय मिळण्यासारखें होतें, तेवढें सगळें मी वाचलें. इतरांनीं त्यांच्याविषयीं लिहिलेलें लिखाणहि वाचून काढलें. तरीहि कांहीं बाबतींत मला पुरेशी माहिती मिळाली नाहीं. श्री. नेहरू यांच्या तत्त्वज्ञानाच्या आकृतींत या गोष्टी योग्य जागीं बसवतां याव्या, या उद्देशानें प्रश्न, शंका व टीका यांचीं एक भली मोठी यादी करून त्यांचीं उत्तरें मिळवायचा प्रयत्न केला. पंडितजींनीं अनेक मुलाखती देऊन मला उपकृत केलें. त्यांतल्या कांहींच्या वेळीं फक्त आम्ही दोघे हजर होतों. इतर वेळीं तिसरी व्यक्ति—टेप रेकॉर्डर—हजर होता. त्या भेटींमधून निर्माण झालेल्या या मुलाखतींच्या मालिकेमध्यें त्यांच्या अगदीं अलीकडच्या मनःस्थितीचें आणि विचारांचें अगदीं अस्सल, वास्तव प्रतिबिंब बहुधा दिसेल.

मुळांत या मुलाखती, पं. नेहरू यांचें चरित्र लिहिण्याच्या माझ्या योजनेची पार्श्वभूमि म्हणून घेतल्या होत्या. परंतु आज चीन-भारत वादामुळें आणि त्यानंतर भारतांतील व बाहेरच्या प्रतिगामी गटांनीं संघटित हालचाल सुरू केल्यामुळें श्री. नेहरू यांचें संपूर्ण तत्त्वज्ञान आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांविषयींचा त्यांचा मूलभूत दृष्टिकोण यांना प्रखर आव्हान मिळालें आहे. तेंहि त्यांच्या आयुष्याच्या सायंकालीं. त्या दृष्टीनें, नेहरूमार्ग या नांवानें अनेकदां ओळखलें जाणारें तत्त्वज्ञान त्यांच्याच शब्दांमध्यें जगापुढें मांडलें जाणें हें उपयुक्त आणि कालोचित ठरतें.

मॅक्स लर्नर यांनीं अलीकडे लिहिलें आहे, "श्री. नेहरूंच्या दीर्घ, उज्ज्वल आणि खळबळीच्या कारकीर्दीचा सगळ्यांत धोक्याचा काल आजचा आहे. कदाचित् सर्वांत हाच त्यांच्या कारकीर्दीचा कळसहि ठरण्याचा संभव आहे."

किती अचूक आहे हें विधान! प्रस्तुत मुलाखतींच्या बाबतींत सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट मला वाटते ती ही: चिनी लोकांची आमच्या सीमेवरील गडबड चालू असतांनाच्या आणीबाणीच्या व अटीतटीच्या काळांत या मुलाखतींसाठीं पंतप्रधान सवड काढूं शकले. देशांतल्या सगळ्या दुष्ट प्रवृत्तींना सीमेवरील आक्रमण ही जणुं पर्वणीच आली. सरंजामशाही व फॅसिस्ट घटक, जातीयतावादी, प्रबोधन-विरोधक, प्रतिगामी या साऱ्यांनींच श्री. नेहरू यांचें नेतृत्व आणि तत्त्वज्ञान यांना जोरदार आव्हान देण्यासाठीं तयारी चालवली.

पंतप्रधान आणि भारतीय जानता यांच्या हातून क्रांतीचें भरदार पीक हिरावून घेण्याचा प्रयत्न करायला याहून उत्तम वेळ सांपडणें अशक्यच होतें. स्वातंत्र्याच्या अल्प, चैतन्यमय काळांत भारतानें राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांमध्यें अनेक विजय संपादन केले आहेत. निधर्मीपणाच्या भक्कम पायावर स्वतंत्र, लोकशाही प्रजासत्ताक उभारून भारतीयांनीं समाजवादाकडे आपली वाटचाल सुरूहि केली आहे. श्री. नेहरू यांनीं ऐतिहासिक पावित्र्य लाभलेल्या भारतीय परंपरांचें सूत्र कायम राखलें आहे आणि शांततेच्या ध्येयावर अढळ निष्ठा ठेवणारें पंचशीलांचें तत्त्व भारतीयांपुढें आणि जगांतल्या राष्ट्रसमूहांपुढें ठेवून त्यांच्या दृष्टिकोनाला नवी समृद्धि दिली आहे. तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर आज भारत उभा आहे. वसाहती धाटणीच्या स्थितिशील जीर्ण अर्थव्यवस्थेकडून गतिशील, स्वयंगतिक अर्थव्यवस्थेकडे 'उड्डाण' करण्याच्या तयारींत भारत आहे. आणि भूतकाळांत ज्यांचे दृढ हितसंबंध गुंतले आहेत, अशा प्रतिगाम्यांपुढें जीवनमरणाचा पर्याय त्यानें ठेवला आहे. नेहरूमार्गाचें उच्चाटन करण्याच्या आपल्या योजनेसाठीं भारतीय प्रतिगामी गट चिनी सीमाप्रकरणाचा उपयोग एक निमित्त म्हणून करीत आहेत, तो याच संदर्भांत; स्वतंत्र भारताच्या इतिहासांतील सर्वांत महत्त्वाच्या, नाजुक अशा क्षणीं.

या आव्हानाला श्री. नेहरू यांचें उत्तर काय आहे? मुळांत आमच्या मुलाखतींचा हा मुख्य प्रश्न नव्हता. परंतु या मुलाखती चालू असतांना दर महिन्याला या प्रश्नाचें महत्त्व आणि कालसापेक्ष निकड हीं उत्तरोत्तर वाढत गेलीं. भारतीय तत्त्वप्रणालीचा घात करूं पाहाणाऱ्या संभाव्य मारेकऱ्यांना या मुलाखतींमध्यें अगदीं बिनतोड आणि जोरकस उत्तर दिलें गेलें आहे, असें मला वाटतें.

वाचकाला विवेचनाच्या ओघांत ओढीत नेत श्री. नेहरू त्याच्यापुढें अवकाश आणि काल यांचा विशाल पट त्याच्यापुढें उभा करतात. त्यांत बुद्ध–अशोक आहेत. मार्क्स–गांधी आहेत, अणुयुग आहे आणि उद्यांचीं अवकाशयानें आणि स्पुत्निक आहेत. पंचशीलांच्या आधुनिक वेषांत सहजीवनाचें आणि वैश्विक समन्वयाचें पुरातन हिंदु तत्त्वज्ञान त्यांनीं मांडलें आहे. भूतकाळानें दिलेला मूल्यवान् ऐतिहासिक वारसा म्हणूनच केवळ नव्हे, तर एतत्कालीन प्रश्नांच्या संदर्भांतलें ऐतिहासिक दृष्ट्या अपरिहार्य कर्तव्य म्हणून ते या तत्त्वज्ञानाकडे पाहातात. मूलतः भारतीय असलेला हा दृष्टिकोन म्हणजे केवळ वैयक्तिक छांदिष्टपणा नव्हे किंवा सार्वजनिक 'पवित्रा' नव्हे; तर भारतीय विचार, धर्म, परंपरा, संस्कृति, इतिहास आणि भौगोलिक स्थान या सार्‍यांतून निघालेला तो निष्कर्ष आहे ही गोष्टहि त्यांनीं दृष्टांतांनीं पटवून दिली आहे.

मुलाखतीच्या वेळीं राजकीय क्षेत्रांतल्या या असामान्य नेत्याकडे, उत्कृष्ट युरोपीय आणि पौर्वात्य विचारपरंपरांनीं संस्कारित झालेल्या या दैदीप्यमान मानवतावाद्याकडे पाहात असतांना अनेकदा वाटायचें कीं जागतिक संश्लेषण आणि शांततामय सहजीवन यांच्या प्रयोगशाळेंत हा रसायनतंत्राचा साधक जणुं प्रयोग करीत आहे. छोटीं-मोठीं, शीत-उष्ण युद्धें आणि रक्तपाती शेवट असलेल्या मार्क्सवादी वर्गसंघर्षासह सगळे तत्त्वप्रणालीविषयक लढे या गोष्टी आजच्या अणुयुगांत अनर्थकारक आणि म्हणूनच जुनाट झाल्या आहेत, या विचारांवर त्यांचें तत्त्वज्ञान आधारलेलें आहे, असें मुलाखतीच्या वेळीं दिसून आलें. हिंसेचा एकूणएक प्रकार आतां इतिहासजमा होण्याजोगा झाला आहे. आणि जगापुढें शांततामय सहजीवन किंवा समूळ सहविच्छेद एवढे दोनच पर्याय राहिले आहेत. सारे प्रश्न आणि अडचणी,—मग त्या राष्ट्रीय असोत कीं आंतरराष्ट्रीय असोत, ध्येयविषयक असोत कीं भौतिक असोत—समंजसपणा, सहिष्णुता व एकमेकाच्या गरजांची जाणीव यांच्या प्रकाशांत आपली सोडवणूक करण्यासाठीं तीं जणुं टाहो फोडून मागणें करताहेत.

आजच्या युगांतल्या भव्यतम प्रयोगांपैकीं एक मानला जाईल असा हा प्रयोग अमलांत आणण्यासाठीं स्वतःला किंवा देशाला प्रभावी यंत्रणा उपलब्ध करून देण्यांत श्री. नेहरू यांची कसूर झाली, हा त्यांच्या मधला सर्वांत मोठा उणेपणा

आहे. माझ्याबरोबर बोलतांना स्वतःमधील या उणीवेची कबुली त्यांनीं दिली आहे. 'यंत्रदेवता' म्हणून श्री. नेहरू ख्यात आहेत; पण खरोखर ती हातांत यंत्रबळ नसलेली देवता आहे. त्यांचा दृष्टिकोण मान्य करणाऱ्यांनाहि त्यांच्या हाताशीं असलेल्या तोटक्या संघटनेकडे बोट दाखवल्याशिवाय राहावत नाहीं. काँग्रेस पक्षाचा एकजिनसीपणा नाहींसा झाला असून त्यांत ओढाताण सुरू आहे. राज्यकारभाराची यंत्रणा भूतकाळांतून उसनी घेतलेली आणि भूतकाळाशींच बांधली गेलेली आहे आणि संस्थात्मक लोकशाही ही राष्ट्राचीं उद्दिष्टें गांठण्याऐवजीं त्यांना दूर ठेवीत आहे.

भारतीय संदर्भात ज्यांना 'नेहरूवादी' असें संबोधतां येईल, अशा जहाल विचारांच्या काँग्रेसजनांनीं हें काम हातीं घेतलें, तरच तें पुरें होईल. पण असे नेहरूवादी आहेत कुठें? आणि नेहरूंच्या पश्चात् त्यांचें तत्त्वज्ञान शाबूत राहील याची खात्री काय आहे?

मला खात्रीनें वाटतें कीं हे प्रश्न इतक्या उघडपणानें श्री नेहरूंना एखाद्या पत्रकाराकडून या मुलाखतींमध्यें प्रथमच विचारले गेले आहेत. श्री. नेहरूंचीं उत्तरें वाचकांपुढें आहेतच. 'नेहरू तत्त्वज्ञाना'ची कल्पना ते विनयानें बाजूस सारतात. आपलें तत्त्वज्ञान आणि दृष्टिकोण यांचें श्रेय ते भारतीय विचारांतील उत्क्रांतीला देतात. त्याला कोठल्या व्यक्तीचें नांव द्यायचेंच असेल, तर तें दुसऱ्या कोणाचें न देतां गांधींचें द्यावें, असें ते सुचवतात. आपल्या अनुयायांचा गट किंवा फळी ते बांधूं शकलेले नाहींत, परंतु सबंध राष्ट्र व जनता यांना बदलून त्यांचें रूपांतर देशाची ऐतिहासिक परंपरा दक्षतेनें, जाणीवपूर्वक आणि हुशारीनें सांभाळणाऱ्या नागरिकांच्या राष्ट्रांत व्हावें यासाटीं महान् भगीरथ प्रयत्न करून श्री. नेहरू आधीं उल्लेखलेल्या उणीवेची जणुं भरपाई करीत आहेत. या संदर्भात श्री. नेहरू यांनीं प्रगट केलेले विचार हेच आमच्या चर्चेमधले सगळ्यांत महत्त्वाचे व अर्थपूर्ण विचार म्हणतां येतील. आपल्या पश्चात् प्रतिक्रांति होऊं नये यासाठीं त्यांनीं योजलेला तो सर्वोत प्रभावी उपाय आहे. संसदीय लोकशाहीचा पाया आणि स्वयंविकासी अर्थव्यवस्थेचें इंधन मिळालें म्हणजे भारतांत निधर्मी, समाजवादी, लोकशाही, व सहकारी समाज निर्मिण्याचें ध्येय विधिमंडळीय क्रांतीच्या साहाय्यानें गांठतां येईल,

अशी त्यांची निष्ठा आहे. त्यांना खात्री वाटते कीं स्वतःचे हक्क आणि परंपरा यांची जाणीव असलेले शिक्षित आणि दक्ष नागरिक प्रतिक्रांतीला निकराचा विरोध करतील. नव्या चिनी कम्यून्सना श्री नेहरूंनीं सुचवलेला हा लोकशाही पर्याय आहे.

'नेहरूंनंतर काय ?' या 'चालू' वादाकडून आम्ही अंतरीक्षविजयाच्या विज्ञानाच्या युगाकडे वळलों. मानवासमोर नुकत्याच उगवूं लागलेल्या या नव्या जगांच्या बाबतींत, जगांतल्या एका प्रतिभाशाली मनाची प्रतिक्रिया या मुलाखतींमध्यें व्यक्त झाली आहे. सर्वोत्कृष्ट दर्जाच्या एका तत्त्वज्ञ-राजकारणी व्यक्तीचें मन अत्यंत उच्च पातळींवर विहरतांना येथें दिसेल.

जागतिक प्रश्नांकडे केवळ भौतिक दृष्टिकोनांऐवजीं आध्यात्मिक आणि नैतिक दृष्टिकोनांतून पाहाण्याची आवश्यकता अणुयुग व अणुशक्ति यांच्या उदयामुळें श्री. नेहरूंना अधिकच वाटूं लागली आहे. एके काळीं मार्क्सवादी आणि अनीश्वरवादी असलेल्या नेहरूंचें हें 'घूम जाव' पाहून मी जरा चकितच झालों आणि जीवनाच्या सायंकाळीं आपण आतां ईश्वराच्या शोधाला लागलांत कीं काय, असा सवाल त्यांना करावासा वाटला. आपल्या मनाला येत असलेल्या नव्या परिमाणाची त्यांनीं जी चिकित्सा केली, तिच्यामागची तर्कसंगति मला बरीच पटली. शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीला अनेक बाजू असतात, अनेक पैलू असतात. फार मोठ्या प्रमाणावर विकसित झालेल्या समाजामध्यें केवळ आर्थिक आणि भौतिक प्रगती लोकांना सुनिबद्ध, पूर्ण जीवन देऊं शकलेली नाहीं. एक प्रकारची आध्यात्मिक आणि नैतिक पोकळी निर्माण झाली आहे. आजची बालगुन्हेगारी, मद्याचें व्यसन, अत्याचार, तोल गेलेलीं मनें हीं सारीं आजच्या युगाला जडलेल्या विकृतींचीं अपत्यें आहेत. स्वयंचलनाचें तंत्र वाढत्या प्रमाणावर वापरलें जातें आहे. कामाचे तास कमी होत आहेत. त्यामुळें फावल्या वेळेचा उपयोग हाच एक मोठा प्रश्न बनत आहे. माणसाला हवें असलेलें भौतिक सुख मिळालें म्हणजे मग त्याच्या अंतरंगाला आध्यात्मिक आणि नैतिक आनंदाची तहान लागते. असली आध्यात्मिक पोकळी आज निर्माण झाली आहे आणि त्यांतूनच आजची तथाकथित संतप्त तरुण पिढी निर्माण झाली आहे. या प्रश्नांकडे नवीन दृष्टिकोणांतून

पाहाण्यावर श्री. नेहरू जोर देतात. देवाच्या शोधांत असलेला मार्क्सवादी असें त्यांचें वर्णन करतां येईल. हा देव त्यांना माणसांत—स्वदेशांतल्याच नव्हे तर साऱ्या जगांतल्या जनतेमध्यें—सापडला आहे. पूर्ण, एकजिनसी व्यक्तित्याच्या माणसाचें—'काल आणि अवकाश यांच्याविषयीं मानवतेचे जे प्रयोग चालले आहेत त्यांसाठीं भौतिक दृष्टिनेंच नव्हे, तर आध्यात्मिक दृष्टीनें सज्ज असलेल्या' माणसाचें त्यांच्यापुढील चित्र हें बहुधा श्री. नेहरूंनीं अजाणता काढलेलें आपलें स्वतःचेंच चित्र आहे.

श्री. नेहरू यांच्या मुलाखतीच्या अखेरचा अविस्मरणीय ठसा माझ्या मनावर कसला उमटला असेल तर तो मूलभूत चांगुलपणाचा—किंबहुना, सौंदर्याचा! हा शब्द कांहींसा स्त्रीत्वाचे रंग असलेला आहे, पण त्यांच्या उमद्या पुरुषी व्यक्तित्वासाठींहि हाच शब्द वापरावासा वाटतो. याचें कारण तें विशुद्ध, शिव आणि सत्यमय आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचें तर हा साध्य आणि साधनें यांचा प्रश्न आहे! सत्य, शिव आणि सुंदर अशा साध्यासाठीं जें कार्य असतें तें घाटहि सत्य, शिव आणि सुंदर निर्माण करतें.

'तीन विसा आणि दहा' हें माणसाचें सर्वसाधारण आयुष्य. ज्यांना आपण मानवतेची चैतन्यज्योति मानतों अशा एका व्यक्तीनें ही वयोमर्यादा ओलांडली आहे, हा विचार केवढा भीतिदायक आहे! गांधीजींचें निधन झालें त्यावेळीं त्यांना खात्री होती कीं, आपल्याला जें सांगायचें आहे तें आपल्या मागें जवाहरलाल सांगत राहील. परंतु आपल्या पश्चात् आपली भाषा अमुक व्यक्तीच्या तोंडून ऐकू येईल अशी खात्री जवाहरलालनीं कोणाच्या बाबतींत बाळगावी? ते म्हणतील, अर्थातच जनता माझी भाषा बोलेल.' श्रीयुत नेहरू यांचे विचार आणि भाषा छापील शब्दांमध्यें मांडण्याचा हा माझा एक नम्र प्रयत्न आहे. श्रीयुत नेहरू यांचें अंतरंग समजून घेण्यासाठीं, त्यांची भाषा बोलण्यासाठीं भारतांतल्याच नव्हे तर साऱ्या जगांतल्या लोकांना ह्या पुस्तकामुळें मदत झाली तर, त्याचा हेतु भरपूर प्रमाणांत सफल झाला असें मी म्हणेन!

—आर्. के. करंजिया

ग्रंथ संग्रहालय
११०००

# गांधीजींचा वारसा

प्र. पंतप्रधान महाशय, आतांच मी मुलाखतीसाठीं आपल्या बोलावण्याची वाट पाहात बाहेरच्या बाजूस थांबलों होतों, त्यावेळीं ऐकलें कीं पुढल्या वर्षीं आपले पिताजी पं. मोतिलालजी यांची शताब्दि येते. ही माहिती बरोबर आहे काय ?

उ. अगदीं बरोबर. त्यांचा जन्म १८६१ सालचा.

प्र. या गोष्टीला शंभर वर्षें उलटून गेलीं असतील याची कल्पनाच मला नव्हती. केवढा विलक्षण समृद्ध कालखंड होऊन गेला हा !

उ. होय—मौज अशी कीं रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन, तोच पिताजींचाहि जन्मदिन.

प्र. अगदीं एकाच तारखेचा जन्म आहे त्यांचा ?

उ. होय. तीच तारीख, तोच महिना, तेंच वर्ष. मोठा लक्षणीय योगायोग आहे हा.

प्र. भारताच्या गेल्या शतकावर ज्यांचा फार मोठा प्रभाव पडला, अशांपैकीं या दोन व्यक्ति. गांधीजी आणि अर्थात् आपण हीं नांवें अशा यादींत घेतलीं पाहिजेत. खरोखर, मोतिलालजी, आपण आणि गांधीजी मिळून पिता, पुत्र व संत अशी एक प्रकारची भारताची राष्ट्रीय त्रिमूर्ति म्हणतां येईल; नाहीं का ?

उ. मी हें जरा वेगळ्या प्रकारानें मांडलें असतें. पण एक मात्र खरें; आम्हा तिघांचा एकमेकांवर फार परिणाम झाला आहे. त्यांतहि गांधीजींचा प्रभाव

आमच्या दोघांवर विशेषच पडलेला आहे. त्यांचें व्यक्तित्व सामर्थ्यवान् आणि क्रांतिकारक होतें. त्याचा परिणाम फार खोल होत असे. वेगळ्या प्रकारें पिताजींचें व्यक्तित्वहि तितकेंच पीळदार होतें. अतिशय दृढ आणि अविचल असें. गांधीजींच्याहून अगदीं वेगळ्या जातीचें. पण गांधीजींनीं त्यांना आपले मार्ग आणि निष्ठा बदलायला लावल्या आणि त्यांना स्वातंत्र्यसंग्रामांत ओढलें. ज्या तऱ्हेनें त्यांनीं हा बदल घडवून आणला, त्यांत अतिशय वेधक आणि अत्यंत परिणामकारक असें कांहींतरी आहे, हें मला जाणवलें. युक्तिवाद करून, मन वळवून संमति मिळवण्याचें हें तंत्र होतें. मानवी स्वभाव धीमेपणानें, चिकाटीनें बदलण्याची पद्धती होती ती. त्यांत कसली सक्ती नव्हती, त्याचबरोबर पायाभूत तत्त्वांच्या बाबतींत कसली तडजोडहि नव्हती. विरोधकांना जिंकण्यांतल्या गांधींच्या डावपेचाचा तो एक उत्तम नमुना होता. या तंत्रानें प्रत्यक्ष कार्य घडलें, मोठाले बदल झालेले प्रत्यक्ष दिसले—केवळ पिताजींच्याच बाबतींत नव्हे, तर लोकांच्या बाबतींत, मानवसमूहांच्या बाबतींत आणि खरें तर साऱ्या राष्ट्राच्याच बाबतींत हे परिणाम घडले.

प्र. आणि सगळ्यांत मोठा परिणाम तर आपल्यावर घडला. खरें ना?

उ. होय. माझ्यावर घडला. गांधीजींच्या प्रभावामुळें पिताजींच्या मध्यें जो बदल झाला, आणि जनमानसांत जी क्रांति झाली, तिच्या मध्यें नवें आणि क्रांतिकारक असें कांहीं तरी होतें. हें सारें घडवून आणलें गेलें, तें प्रामाणिक, सत्यनिष्ठ साधनांनीं; अहिंसामय साधनांनीं. सक्तीनें नव्हे, तर शांततामय हृदयपरिवर्तनाच्या मार्गानें. आणि हे मार्ग अत्यंत परिणामकारक, प्रत्यक्ष फल देणारे आहेत हें कळून आलें. मला हवें होतें तें, या साऱ्यांत, मला मिळालें.

प्र. आपण स्वतः मनाशीं ठरवलेल्या उद्दिष्टांच्या सफलतेसाठीं उपयुक्त अशी जणुं एक तरफच आपल्या हातांत आली?

उ. निःश्चितच. त्यावेळीं देशासमोरच्या प्रश्नांकडे पहाण्याचा माझा दृष्टिकोण गांधीजींच्या पेक्षां वेगळा—अगदीं वेगळा होता. पण स्वातंत्र्य आणि लढ्यासाठीं वापरावयाचे डावपेंच या बाबतींत—साध्य आणि साधनें या दोन्हीबद्दल

—आमचें संपूर्ण मतैक्य झालें. युद्धाचे त्यांचे मार्ग मनांत विश्वास निर्माण करीत नव्हते, पण त्यांनीं प्रत्यक्ष परिणाम घडवून दाखवले आणि आक्षेपकांना गप्प बसवलें. जनतेमध्यें त्यांनीं प्रचंड जागृति घडवली, इष्ट त्या दिशेनें कूच करायला तिला प्रवृत्त केलें तेव्हां आमच्या ध्यानांत आलें कीं गांधीजींच्या रूपानें एक महान् क्रांतिकारक शक्ति कार्यप्रवण झाली आहे.

प्र. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत आज 'भारतीय दृष्टिकोन' किंवा 'नेहरू-मार्ग' या नांवानें विशिष्ट धोरण ओळखलें जातें. हा नेहरू मार्ग ज्या घटकांमधून निर्माण झाला, ते घटक मोतिलालजी, गांधीजी आणि आपण या तिघांच्या परस्परसंबंधांमधून उदित झाले असें म्हटलें, तर तें चुकीचें होईल काय ?

उ. आजच्या आपल्या धोरणाला 'नेहरू-मार्ग' किंवा तसेंच दुसरें एखादें नांव देणें चुकीचें आहे. आपण म्हणालां त्याप्रमाणें त्याचा पाया अस्सल भारतीय आहे, आणि गांधीजी हे त्याचे प्रवर्तक आहेत. त्यांनीं देशांत मोठमोठे बदल घडवून आणले, ते त्यामुळेंच.

प्र. मला सुचवायचें आहे तें असें: मोतिलालजी हे युरोपीय उदार-मतवादाच्या उत्कृष्ट परंपरांचें प्रतिनिधित्व करणारे व्हिक्टोरियन युगांतले एक महान् नेते. उलट गांधीजी हे भारतांतील सनातन, प्राचीन परंपरांचें प्रति-निधित्व करणारे निखळ राष्ट्रवादी. आपण मार्क्सप्रणीत समाजवाद आपल्या व्यक्तित्वांत मुरवून आणि सामाजिक, वैज्ञानिक व ऐतिहासिक प्रवाहांची नवी जाणीव घेऊन भारतांत परतलेले. मोतिलालजी व गांधीजी यांच्या, एकमेकांपासून अगदीं वेगळ्या असलेल्या व्यक्तित्वांमधला दुवा होणें कदाचित् आपल्यालाच शक्य होतें. या तीन दृष्टिकोनांच्या एकमेकांवर घडलेल्या परिणामांतून आज भारतीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत दिसणाऱ्या भारतीय धोरणाचा उदय झाला असें म्हणतां येईल काय ?

उ. व्यक्तित्वांचें स्वरूप इतक्या निश्चित रेषांनीं रंगविणें शक्य नसतें. उदा-हरणार्थ, गांधीजी हे नुसते विशुद्ध—आणि, आपण म्हणतां त्याप्रमाणें सनातन

परंपरेचे–राष्ट्रवादीच केवळ नव्हते. त्याहून कितीतरी विशाल असें त्यांचें व्यक्तित्व होतें. ते एक श्रेष्ठ नेते होते; महापुरुष होते. त्यांच्याजवळ समाजाविषयीं एक खोल अशी विवेकयुक्त जाणीव होती. समाजवादी अर्थाची किंवा वर्गयुद्धात्मक जाणीव नव्हे. त्यांची सामाजिक श्रद्धा ही त्यांच्या कांहीं चळवळींमध्यें व्यक्त झाली आहे. पददलितांच्या, हरिजनांच्या आणि किसानांच्या बाजूनें त्यांनीं विषमतेविरुद्ध जो अखंड लढा केला, त्याचें उदाहरण येथें देतां येईल. आपली जातिसंस्था घ्या. अस्पृश्यतेला आव्हान देऊन त्यांनीं त्या आव्हानाचा तरफ म्हणून उपयोग केला आणि साऱ्या जातिसंस्थेचाच किल्लेकोट हादरवून टाकला.

मला म्हणायचें आहे तें असें : गांधीजींचें सुद्धां स्वतःचें असें सामाजिक तत्त्वज्ञान होतें आणि त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं—दक्षिण आफ्रिकेंतच तें साकार होऊं लागलें होतें. त्यामुळेंच आमच्या स्वातंत्र्यलढ्यांतून सामाजिक आशय कधींच लुप्त झाला नाहीं. खरें तर सामाजिक आशय हा त्याचा पाया होता. गांधीजींच्या धोरणाला एवढी सफलता लाभली, ती या पायामुळेंच. नेतृत्वानें जनतेशीं पूर्णपणें एकरूप झालें पाहिजे; मग त्यासाठीं नेत्यांना स्वतःच्या गतीपेक्षां जरा मागें राहावें लागलें व प्रगतींत संथपणा आला तरी वेहेत्तर; जनतेला आपल्याबरोबर घेऊनच त्यांनीं पुढें गेलें पाहिजे, अशी गांधीजींची श्रद्धा होती.

**प्र.** संपूर्ण भारतीय जनसमाजाला बरोबर घेऊन ?

**उ.** होय. निष्कारण चढाईचा किंवा हट्टाग्रही पवित्रा घेतल्यामुळेंच फुटीर विरोधी गट निर्माण होतात व चळवळ दुभंगते—हा धोका टाळून, शतकानुशतकें साकार होत आलेली समाजजीवनाची जी चौकट असते, त्या चौकटींत राहून नेहमी कार्य करण्याचा गांधीजींचा प्रयत्न असे. ही चौकट मोडून तोडून आणि समाजजीवनाचीं पाळंमुळें उपटून क्रांति घडवण्यापेक्षां पायरीपायरीनें, परंतु कायमपणानें बदल घडवून आणण्याकडे त्यांचा कल होता. परंपरेचे धागे कायम ठेवण्याचा त्यांचा आग्रह असे. त्या त्या वेळीं प्रचलित असलेल्या समाजपद्धतीवरच ते आपली राजकीय व सामाजिक चळवळ उभारीत असत. पुन्हा एकदा जातिसंस्थेचें उदाहरण घेतलें, तर गांधीजींच्या कार्यपद्धतीची

कल्पना आपल्याला येऊं शकेल. जातिसंस्थेच्या तटबंदींतला सगळ्यांत दुर्बळ बुरूज अस्पृश्यता आहे हें त्यांनीं हेरलें आणि त्या बुरुजाला सुरुंग लावून साऱ्या जातिसंस्थेलाच त्यांनीं हादरा दिला. केवढा प्रचंड सामाजिक धरणीकंप गांधीजी घडवून आणीत आहेत, याची जाणीव लोकांना त्यावेळीं झाली नाहीं. अशा प्रकारें त्यांनीं समूहमानसांत नव्या क्रांतिकारक प्रक्रिया सुरू केल्या आणि प्रचंड सामाजिक बदल प्रत्यक्षांत आणले.

प्र. कदाचित् हें खरें असेल. माझ्यासारख्या वेगळ्या विचाराच्या कांहीं लोकांना गांधीजींचें तत्त्वज्ञान कांहींसें गोंधळाचें आणि अशास्त्रीय वाटतें; तरीहि भारतीय क्रांतीवरचा त्यांचा प्रचंड प्रभाव कोणीच नाकारीत नाहीं. तें कांहींहि असो; गांधीयुगाच्या अखेरीस कॉंग्रेसनें राजकीय सत्ता धारण केली होती; १९४७ सालीं, साऱ्या जगांत गाजणारें नेहरू-युग आपल्या देशांत सुरू झालें. स्वातंत्र्याच्या आगमनानंतर आपण नेहरूंच्या साध्यांसाठीं गांधींचीं साधनें वापरलीं, असा निष्कर्ष मी काढला तर बरोबर होईल काय? माझ्या दृष्टीनें आपलीं उद्दिष्टें म्हणजे प्रथम संसदीय लोकशाहीच्या चौकटींत समाजवाद; नंतर निधर्मी राज्य; आणि सर्वांत महत्त्वाचें, जागतिक शांतता व कुठल्याहि गटांत न जाण्याचें तत्त्व यांवर आधारलेलें परराष्ट्रीय धोरण.

उ. आपण 'नेहरू-युग', 'नेहरू-मार्ग' असे शब्द वापरतां आहांत, तें बरोबर नाहीं. आपलें युग हें अस्सल गांधी-युग आहे असें मी म्हणेन. आज आम्ही जें तत्त्वज्ञान व धोरण अमलांत आणूं पाहात आहोंत, तें आम्हांला गांधीजींनीं शिकवलेलें आहे. १९४७ च्या नंतरच्या वैज्ञानिक आणि तंत्रविज्ञानात्मक प्रगतीमुळें कांहीं बाबतींत पुनर्विचार करावा लागला किंवा नव्या काळाशीं धोरणें जुळवून घ्यावीं लागलीं हें खरेंच; पण १९४७ मध्यें आधींची विचारधारा खंडित होऊन नवी सुरू झाली असें मुळींच झालेलें नाहीं. उलट नव्या बदलांच्या बाबतींत गांधीजींचा द्रष्टेपणाच आमच्या प्रत्ययाला आला. औद्योगिक क्रांतीचें युग आणि नवें अणु-युग यांच्यामधली दरी ओलांडतांना आम्हांला गांधीजींचे विचार, दृष्टिकोण व उपाययोजना यांचा मोठा उपयोग झाला. अखेर अणुबॉंबला एकमेव संभाव्य उत्तर म्हणजे अहिंसाच, नव्हे काय?

प्र. मध्येंच आपल्याला थांबवतों आहें, याबद्दल क्षमा करा, पण अहिंसेच्या पलीकडे जाऊन अणुबॉंबच्या धोक्याला अधिक विधायक असें उत्तर आपण शोधून काढलें आहे. तें म्हणजे पंचशील किंवा शांततामय सहजीवनाचें तत्त्व.

उ. हें सारें गांधीवादांत अनुस्यूत होतेंच. खरें तर, पंचशील, सहजीवन, शांतता, सहिष्णुता, 'जगा आणि जगूं द्या' अशी वृत्ति हे सारे भारतीय विचाराचे युगानुयुगांचे पायाभूत घटक राहिले आहेत. अशोकासारख्या महान् सम्राटांनीं त्यांचें आचारण केलें आणि गांधीजींनीं त्यांतून प्रत्यक्ष कृतीचें व्यावहारिक तत्त्वज्ञान निर्माण केलें. आम्ही त्याचेच हक्कदार वारस आहोंत. अशोकाच्या मनांत 'शीत युद्धा'ला जागा नव्हती; आणि निःशस्त्र प्रतिकाराच्या अहिंसक हत्यारानें गांधीजींनीं एक प्रचंड क्रांती केली; युद्ध आणि अहिंसा यांना एक अत्यंत व्यवहारी असा पर्याय जगाला दिला. आमच्या परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत सर्वांत महत्त्वाची गोष्ट हीच कीं तें आमच्या महान् ऐतिहासिक परंपरेंतलें आहे. आपल्याला चाणक्याची कथा माहीत आहे काय ?

प्र. मला ती स्मरत नाहीं.

उ. माझे मेहुणे कै. पंडित हे संस्कृताचे अभ्यासक होते. त्यांनीं भाषांतरित केलेल्या अत्यंत वेधक अशा एका संस्कृत ग्रंथांत ती कथा आलेली आहे. तें इंग्रजी भाषांतर अजून उपलब्ध असेल तर आपण तें अवश्य मिळवा आणि ती कथा वाचा. राजा चंद्रगुप्त आणि त्याचा प्रधान चाणक्य यांची ती कथा आहे. चाणक्य हा भारतीय बुद्धिमंतांचा एक उत्तम नमुना होता. शांतताप्रेमी, कुशाग्र, चाणाक्ष, गाढा विद्वान, मानी, निस्पृह आणि अत्यंत शहाणा मुत्सद्दी म्हणून तो गाजलेला होता. कांहीं राजे एकत्र आले, त्यांनीं चंद्रगुप्ताविरुद्ध आपला संघ बनवला आणि त्याच्या राज्यावर चाल केली. संरक्षणाचीं सूत्रें चंद्रगुप्तानें चाणक्याकडे सोपविलीं. चाणक्य हा महान् मुत्सद्दी आणि कुशल राजनीतिज्ञ होता असें दिसतें. त्यानें युद्ध किंवा साधी एखादी चकमकहि होऊं न देतां विरोधी राजसंघाला गोंधळून टाकलें आणि त्याचा पराभव केला. कांहीं मार्गांनीं त्यानें शत्रूला आपल्याकडे वळवून घेतलें. मग खरी कसोटीची वेळ आली. पुढें काय करायचें याबद्दल चंद्रगुप्तानें चाणक्याचा सल्ला विचारला.

चाणक्यानें सांगितलें, माझें 'काम आतां पूर्ण झालें. शत्रूला पळवून लावून आपल्यासाठीं मी विजय संपादन केला आहे. आतां आपण मला जबाबदारींतून मुक्त करा म्हणजे मी अरण्यांत जाऊन अध्ययन व ग्रंथलेखन सुरू करीन.' राजाला धक्काच बसला. आतां चाणक्याऐवजीं दुसरा योग्य मुख्य प्रधान कोण सापडणार? चाणक्याचें उत्तर अभिजात, आणि भारतीय विचाराचें प्रातिनिधिक होतें. त्यानें राजाला सांगितलें, 'पराभूत संघराज्याच्या प्रमुखाला आपण पाचारण करावें, आणि आपलें मुख्य प्रधानपद त्याला द्यावें. राज्यांत शांतता आणि सद्भावना टिकण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.' 'सहजीवना'चाच हा दोन हजार वर्षांपूर्वींचा नमुना आहे कीं नाहीं?

प्र. खरें आहे तें. मी कदाचित चुकत असेन; पण पुरोगामी गटांमध्यें अजूनहि अशी पक्की समजूत दिसते कीं आपल्या भावनात्मक आणि आध्यात्मिक विचारांनीं गांधीजींनीं आपली शास्त्रीय समाजवादावरची निष्ठा दुबळी केली, मोडून टाकली.

उ. गांधीजींचे कांहीं दृष्टिकोन जुनाट होते. आपल्याला माहीतच आहे कीं मी त्यांबद्दल गांधीजींशीं वाद केला; त्यांना विरोधहि केला. पण एकंदरींत पाहिलें तर त्यांनीं मला किंवा कुणालाहि दुबळें केलें किंवा मोडून काढलें असें म्हणणें चुकीचें ठरेल. असें कांहींहि त्यांच्या पद्धतींत बसण्यासारखें नव्हतें. एका गोष्टीचा ते सतत आग्रह धरीत. ती म्हणजे साधनांचें महत्त्व. ज्या साधनांनीं एखादें उद्दिष्ट गांठायचें, त्या साधनांनींच त्या उद्दिष्टाचें स्वरूप निश्चित होत असतें; आणि म्हणून साधनें हीं शुद्ध, शिव आणि सत्यात्मक असलीं पाहिजेत. हें आम्ही त्यांच्याकडून शिकलों आणि त्यामुळें आमचा फायदाच झाला.

दुसऱ्या बाजूनें, आपण भावनात्मक आणि आध्यात्मिक उपाययोजनांविषयीं म्हणालांत तें खरें असूं शकेल. भावनात्मक हा शब्द मानवतावादी या अर्थानें आपण वापरतां असें मी गृहीत धरतों. अशा तऱ्हेचा गाढ मानवतावादी दृष्टिकोन हा गांधीजींच्या प्रमाणेंच माझ्याहि विचारांचा अविभाज्य असा भाग झालेला आहे. आध्यात्मिक दृष्टिकोन हाहि मला आवश्यक आणि हितप्रद वाटतो. तोहि गांधीजींप्रमाणेंच मीहि अंगीकारला आहे. आज आपल्या तंत्रविज्ञानात्मक

संस्कृतींत आध्यात्मिक पोकळीचा जो धोका निर्माण झाला आहे, तो पाहातां तर पूर्वीपेक्षांहि मला हा आध्यात्मिक दृष्टिकोण अधिक महत्त्वाचा वाटूं लागला आहे. शास्त्रीय समाजवाद म्हणजे मार्क्सप्रणीत समाजवाद असें आपल्याला सुचवायचें आहे असें गृहीत धरतों. हा मार्क्सवाद औद्योगिक क्रांतींतून जन्माला आला. आज नवविज्ञानाचें युग हें औद्योगिक क्रांति ओलांडून पलीकडे गेलें आहे. या नव्या युगाला अनुसरून, शास्त्रीय समाजवादाला आपलें स्वरूप बदलणें भाग आहे. नवे बदल नव्या समस्या निर्माण करतात आणि या नव्या प्रश्नांवर नवे तोडगे शोधावे लागतात.

## .२.

# आधुनिक जगांतील मार्क्सवाद

प्र. गांधीवाद व मार्क्सवाद यांच्याविषयीं आपण आधुनिक जगाच्या संदर्भात बोलत होतों. बदलत्या काळानें निर्माण केलेल्या नव्या प्रश्नांचीं—निदान त्यांतल्या कांहींचीं नवीं उत्तरें आपण भारतीयांनीं इथें शोधून काढलीं आहेत अशी माझी भावना आहे. 'आपण भारतीयांनीं' असा सामुहिक शब्दप्रयोग मी मुद्दाम करतों आहें. कारण जवाहरलाल नेहरू हें नांव उपयोजून विधानें केल्यामुळें आपल्याला अवघडल्यासारखें होतें हें उघड दिसतें. नव्या वैज्ञानिक आणि तंत्र-विज्ञानात्मक युगांतल्या अटळ परिस्थितीकडे पहाण्याचा मार्क्सप्रणीत दृष्टिकोण आपण स्वीकारला, ही या नव्या उत्तरांमधली सर्वांत महत्त्वाची गोष्ट. अर्थात् या मार्क्सवादी दृष्टिकोणावर भारतांत गांधीवादाचा प्रभाव बराच पडलेला आहे, हें कबूल केलेंच पाहिजे. या संदर्भात, भारताला दोन नव्या गोष्टी निर्माण केल्याचा दावा सांगतां येईल. पहिली, समाजवादाचा नवा प्रकार आणि दुसरी समाजवाद आणण्याचा एक नवा मार्ग. एका बाजूनें भांडवलदारी लोकशाही आणि दुसऱ्या बाजूनें साम्यवादी हुकुमशाही या दोहोंचें संश्लेषण करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

वृथा स्तुतीच्या भरीस न पडतां मला म्हणावेंसें वाटतें कीं हा एक अत्यंत लक्षणीय असा अभिनव प्रयोग आहे. जगांतील एकसतमांश मानवसमूहावर प्रत्यक्ष आणि इतर जगावर अप्रत्यक्ष—पण प्राणभूत—असा परिणाम या प्रयोगा-मुळें होत आहे. अणु-संशोधन आणि अंतरीक्ष-विजयाचे प्रयत्न यांनीं सुरू केलेल्या नव्या युगाच्या कांहीं समस्यांचीं उत्तरें या प्रयोगानें दिलीं आहेत.

पण ही चित्राची एकच बाजू झाली. दुसऱ्या बाजूस वेगळें दृश्य आहे. या नव्या समाजवादाविषयींचे किंवा समाजवादी मानवतावादाविषयींचे आपले उदात्त,

पण कांहींसे अमूर्त जाहीरनामे वाचून आपले अनुयायी या नव्या मार्गाच्या उद्दिष्टांविषयीं गोंधळून गेले आहेत. याचें कारण असें कीं या नव्या भारतीय समाजवादाचें साध्य आणि दिशा आपण स्पष्ट केलेल्या नाहींत. त्याचप्रमाणें त्याची साधनसामग्रीहि नीटपणें सांगितलेली नाहीं. पण आतांपर्यंत आपल्याला या दोहोंचाहि जो अनुभव आला आहे, तो त्यांची व्याख्या करायला पुरेसा आहे असें मला वाटतें. तशी व्याख्या आपण देऊं शकाल काय?

उ. भारतीय समाजवाद आणि समाजवादावर मी काढलेले जाहीरनामे यांचा आपण वारंवार उल्लेख करीत आहांत. पण खरें सांगायचें तर मी आपल्यापुढील प्रश्नांचा विचार 'भारतीय' समाजवादाच्या परिभाषेंत करीत नाहीं. तसेंच, समाजवादावर जाहीरनामे तर मी कधींच काढलेले नाहींत...

प्र. मला येथें आपलीं भाषणें, आपलें लेखन, आपलीं 'व्हिदर इंडिया' सारखीं पुस्तकें हीं अभिप्रेत आहेत. हें सारें आम्ही आपल्या जाहीरनाम्यांप्रमाणेंच मानतों...

उ. आलें माझ्या ध्यानांत. पण मी आधीं म्हटलें त्याप्रमाणें, आपल्या ध्येयधोरणाला मुद्दाम, विशेषत्वानें 'भारतीय' समाजवाद ही संज्ञा देणें तितकें उचित नाहीं. अर्थात् मला हें मान्य आहे कीं प्रत्येक देशाला त्याची अशी प्रकृति असते, विशिष्ट भूमींत त्याचीं पाळेंमुळें गेलेलीं असतात आणि त्याच्या सामाजिक व आर्थिक संघटनांचें स्वरूप अंशतः या घटकांमुळें निश्चित होत असतें. आपण धर्माचें उदाहरण घेऊं या. बुद्धधर्म भारतांतून इतर अनेक देशांमध्यें पसरला; पण तो त्या त्या देशाचा वेळवेगळा वेष चढवून तेथें प्रस्थापित झाला. चीनमधील बुद्धधर्म भारतांतून गेलेला; पण चीनच्या राष्ट्रीय प्रकृति-प्रवृत्तींशीं जुळणारें असें स्वरूप त्याला दिलें गेलें. जपान, ब्रह्मदेश इत्यादींमधील बुद्धधर्माचीहि अशीच स्थिति दिसते. याचा अर्थ असा कीं त्या त्या राष्ट्राच्या आत्म्यावर—येथें 'आत्मा' या शब्दाऐवजीं आपण पाहिजे तो शब्द वापरा—या धर्माचें जणुं कलम झालें. त्या दृष्टीनें, राजकीय तत्त्वप्रणालींचा विचार करतांना देशाचें हवामान किंवा इतर भौगोलिक परिस्थिति यांच्याप्रमाणेंच राष्ट्रीय प्रकृतीचा घटकहि नेहमी ध्यानांत ठेवावा लागतो. विषुववृत्तावरील एखाद्या

प्रदेशाचा, आर्थिक उत्पादनाच्या संदर्भांतला अभ्यास हा विषुववृत्तापासून दूर असलेल्या प्रदेशाच्या तत्सम अभ्यासापेक्षां बहुधा वेगळा असणेंच संभवनीय.

प्र. खरें आहे तें. भारतीय परिस्थितीचें व आपण उल्लेखलेल्या इतर वास्तव घटकांचें समीक्षण मार्क्सवादी पद्धतीनें आपण करावें असें मला सुचवायचें आहे.

उ. मी तिकडे वळणारच होतों. आर्थिक किंवा सामाजिक तत्त्वज्ञान असें ज्याला म्हणतां येईल, त्यांचा विचार करतांना पूर्वानुभवांतून शिकण्यासारखें बरेंच मिळतें. आणि भूतकाळाचें मार्क्सवादी विश्लेषण मला नेहमीच अत्यंत शास्त्रपूत आणि तितकेंच सूक्ष्मदर्शी वाटत आलें आहे. मार्क्सचीं सगळींच मतें मला मान्य आहेत असें नाहीं. पण स्थूलमानानें पाहतां तीं बुद्धिनिष्ठ आणि उपयुक्त आहेत असें मला दिसलें. कसेंहि असलें तरी एक गोष्ट आपण ध्यानांत ठेवली पाहिजे. इंग्लंडमधल्या औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभींच्या परिस्थितींतून मार्क्सवाद जन्माला आला. ही अगदीं सुरुवातीची परिस्थिति कांहींशी असाधारण होती. विशिष्ट स्वरूपाची होती. तशी परिस्थिति जगांत इतरत्र कुठेंच पुनरावृत्त झालेली नाहीं. आणि त्यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. औद्योगीकरणाच्या पहिल्या लाटेंत जी अनैसर्गिक आणि, तसें पाहिलें तर उद्वेगकारकहि परिस्थिति निर्माण झाली, तिचा परिणाम मार्क्सच्या मनावर झाला होता. त्या काळांत राजसत्तेची उभारणी लोकशाही पद्धतीची नव्हती. कुठलाहि बदल घटनात्मक किंवा लोकशाही पद्धतीनें करण्याची संधि नव्हती,— या अगदीं सरळ-साध्या कारणामुळें हिंसेचा मार्ग अवलंबणें भाग होतें. क्रांतिकारी हिंसेच्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा उगम हा असा आहे.

मार्क्सनें विवेचिलेले, उत्पादन, बदल इत्यादि प्रश्न जेव्हां आपल्यासमोर उभे राहातात, तेव्हां आपल्याला त्यांचा विचार आपला काळ, आपला देश, त्यांतली विशिष्ट, वास्तव परिस्थिति यांच्या संदर्भांत करावा लागतो. एकोणि-साव्या शतकांतल्या इंग्लंडांत मार्क्स वावरत होता. आपण त्या विशिष्ट देशकालांत आतां शिरूं शकत नाहीं. आपल्या विचारावर पगडा असतो तो आपल्या भोवतालच्या परिस्थितीचा. मार्क्सनें सांगितलेले उपाय कुशाग्र

बुद्धिमत्तेचे निदर्शक आहेत. एका विशिष्ट काळांत विशिष्ट तऱ्हेच्या प्रश्नांच्या दृष्टीनें ते अचूक व उचित ठरले असतीलहि. पण त्यांच्या ऐतिहासिक संदर्भापासून ते तोडायचे आणि अगदीं वेगळ्या परिस्थितीच्या कालखंडाला लागू करायचे, हें जमण्याजोगें नाहीं. मार्क्सच्या उपायांबद्दल अंधश्रद्ध हट्टाग्रह धरला जातो, त्याविरुद्ध हा एक मुद्दा मांडतां येईल.

दुसरा मुद्दा : ऐतिहासिक प्रवाहांविषयींचें व इतरहि अनेक गोष्टींबद्दलचें मार्क्सचें विश्लेषण अचूक होतें. पण तें फार अल्प अशा व्याप्तींत. मला म्हणायचें आहे तें असें, अमूक अमूक तऱ्हेची परिस्थिति असेल, तर पुढें अमूक अमूक घडेल,— निदान घडलें पाहिजे— असें सांगणाऱ्या मार्क्सवादी अर्थशास्त्राची दिशा तर्कदृष्ट्या बरोबर आहे. पण हें सारें केव्हां ? परिस्थितींवर परिणाम करणारे कांहीं घटक वरील विचार करतांना बाजूला ठेवले तर. गंमत अशी कीं भविष्यकाळांत जे 'इतर' घटक परिस्थितींत निर्माण होण्याचा संभव, ते मार्क्स आपल्या विचारांतच घेत नाहीं. अर्थात यांत मार्क्सचा कांहीं दोष नाहीं. स्वतःच्या काळांत परिस्थिति जशी होती, तशी त्यानें पाहिली, आणि तिच्यावर आपले सगळे निष्कर्ष आधारले. नंतर इतर परिणामकारक घटक निर्माण झाले. त्यांतला सगळ्यांत महत्त्वाचा घटक म्हणजे संसदीय लोकशाही. कारण त्यामुळें शांततामय बदल शक्यतेच्या कोटींत आले. एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. मार्क्सच्या काळांत राजकीय लोकशाही अस्तित्वांत नव्हती. तथाकथित लोकशाही राजवटींमध्येंहि नव्हती. तेथें जमीनदार वर्गाचीं सरकारें होतीं. जनता मतें देऊन राज्यकर्ते प्रतिनिधि निवडूं लागली; या केवळ एका घटनेमुळें सगळे प्रश्न सुटले नसतील; परंतु त्यामुळें फार मोठा फरक पडतो— पडला आहे. प्रत्येकाला मतदानाचा हक्क मिळणें म्हणजे एक मोठी शक्ति निर्माण होणें. या शक्तीचा ताण आणि वजन जाणवूं लागतें; समाज बदलूं लागतो. मार्क्सला कल्पनाहि आली नसेल इतक्या मोठ्या प्रमाणांत तो बदलूं लागतो; मार्क्सच्या डोळ्यांपुढें त्या घटनेचें चित्र नसल्यामुळें पुढील बदलांची कल्पना त्याला असणें शक्यच नव्हतें.

समाजाच्या घडणींत नंतर आणखीहि कांहीं लोकशाही घटक आले. कामगारांच्या व्यवसायसंघटना, कामगार संघ, किसान संघ अस्तित्वांत आले. त्यांनीं

श्रीमंत सत्ताधारी वर्गावर दडपण आणायला सुरुवात केली. ' आर्थिक लोकशाहीची सुरुवात ' असें आपण ज्याला म्हणूं शकूं अशा कालखंडाला प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीमुळें उत्तरोत्तर थोड्या व्यक्तींच्या हातांत अधिकाधिक संपत्ति आणि सत्ता केंद्रित होईल आणि त्यामुळें दारिद्य अधिक वाढेल अशी जी भीति मार्क्सला व मार्क्सवाद्यांना वाटत होती, ती प्रत्यक्षांत निराधार ठरली. लोकशाही, कामगार चळवळ व नंतरचे आणखी कांहीं प्रवाह यांच्या दडपणामुळें श्रीमंती, सत्ता यांचें केंद्रीकरण आणि दारिद्याची वाढ या दोहोंनाहि चांगलाच आळा बसला. मार्क्सनें जिचें भाकीत करून ठेवलें होतें, ती आर्थिक प्रवृत्ति निर्माणच झाली नाहीं, असें मला म्हणायचें नाहीं. पण त्या प्रवृत्तीला वास्तवांत बरेच अडसरहि निर्माण झाले.

अशा तऱ्हेनें एका बाजूला राजकीय क्षेत्रांत नव्या प्रकारच्या संघटना उभ्या राहात होत्या, सतत बदलत होत्या, वाढत होत्या. त्यांच्यामुळें सामाजिक न्यायाबद्दलची प्रेरणा जोर धरूं लागली आणि सामाजिक बदल घडवण्याची इच्छा तीव्र झाली. दुसऱ्या बाजूस तंत्रविज्ञानांतल्या भव्य, प्रचंड प्रगतीमुळें सारें जग बदलून टाकलें जात होतें. या प्रगतीची कल्पना एकोणिसाव्या शतकांतल्या मार्क्सला किंवा दुसऱ्या कुठल्याच तत्कालीन विचारवंताला येणें शक्य नव्हतें.

या वैज्ञानिक व तंत्रविज्ञानात्मक विकासामुळें निदान तात्त्विक दृष्ट्या तरी संपत्ति व उत्पादन यांचे प्रश्न सुटले आहेत, भौतिक समृद्धि ही सर्वांच्या आवाक्यांत आली आहे, असें म्हणतां येईल. याचा अर्थ असा कीं निदान सैद्धांतिक दृष्ट्या तरी आतां साऱ्या मानवजातील पुरेल इतकें उत्पादन होतें आहे. मानवाच्या प्राथमिक व सर्वसाधारण गरजा पुरवूं शकेल एवढें उत्पादन करणें आतां निदान शक्य झालें आहे.

जें पुरेसें नाहीं त्याची वांटणी कशी करायची हा ज्या काळांतला सर्वांत महत्त्वाचा आर्थिक प्रश्न होता, अशा काळांत मार्क्स वावरत होता. त्या परिस्थितींत अनेक समस्या व झगडे निर्माण झाले. शक्तिवान् व धनवान् समाजघटकांनीं जें मिळेल तें आपल्या खिशांत टाकलें आणि गरीब, दुर्बळ समाजघटक मागें ढकलले गेले.

प्र. सबळांनाच अस्तित्वांत रहायचा हक्क; दुर्बळांनीं पाहिजेतर नाहींसें व्हावें—असेंच ना?

उ. होय. हेंच तत्त्व प्रत्यक्षांत आलें. मुद्दा असा कीं जेव्हां सर्वांच्या गरजा पुऱ्या होत नाहींत त्या वेळीं संघर्ष उग्र स्वरूप धारण करतात. पण सर्वांना पुरण्याइतकें उत्पादन होण्याची शक्यता निर्माण होते तेव्हां या संघर्षांची तीव्रता नाहींशी होते.

आज उत्पादनाची सर्वांत प्रचंड साधनसामुग्री अमेरिकेमध्यें आहे. अमेरिकेंतला कोट्यधीश आणि इतर नागरिक यांच्यांत मोठा फरक आहे, हें मी नाकारीत नाहीं. पण एक गोष्ट शिल्लक राहातेच. तिथली राहाणी व जीवनमान हीं फार वरच्या पातळीचीं आहेत. मार्क्सनें रंगवलेला श्रमजीवी वर्ग आज अमेरिकेंत नाहीं.

प्र. अमेरिकेंतले निग्रो हे मार्क्सच्या त्या व्याख्येंत बसत नाहींत काय?

उ. बसूं शकतील. उत्तरेपेक्षां दक्षिणेंतील निग्रो कांहींसे अधिकच बसतील. पण अगदीं पूर्णपणें मार्क्सच्या व्याख्येंत नव्हे. अमेरिकेंतहि नवी परिस्थिति ही मार्क्सनें केलेल्या भाकितांशीं पूर्णपणें जुळणारी नाहीं. खुद्द भांडवलशाहीच बदलली आहे, सतत बदलते आहे. अर्थात् तिची पायाभूत लोभी प्रवृत्ति किंवा मक्तेदारीकडे व आर्थिक सत्ता मिळविण्याकडे झुकणारा तिचा कल नाहींसा झालेला नाहीं. पण भांडवलशाही संघटनेंतहि सामाजिक न्यायप्रस्थापनेच्या प्रेरणा येऊं लागल्या आहेत.

महत्त्वाची गोष्ट अशी : मार्क्सची विचारप्रणाली तर्कदृष्ट्या अचूक होती, परंतु इतर नवे प्रवाह परिस्थितींत आले आहेत. त्यांनीं सगळें चित्र बदललें आहे. हे नवे घटक, विशेषतः मी सांगितल्या त्या दोन गोष्टी—राजकीय लोकशाही आणि तंत्रविज्ञानात्मक प्रगति हीं सर्व एकत्र आल्यामुळें परिस्थितीचें स्वरूप बदललें आहे. या नव्या संदर्भांत मार्क्सवादाचें पुनरवलोकन केलें पाहिजे. कारण नव्या काळानें नवे प्रश्न निर्माण केले आहेत, नवीं उत्तरें तो मागतो आहे. हे प्रश्न आणि हे उपाय या दोहोंचीहि कल्पना मार्क्सला नव्हती. ती त्याला येणेंच अशक्य होतें.

प्र. आपण राजकीय लोकशाही आणि तंत्रविज्ञानांतील क्रांति यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला. आणखी कांहीं घटक आपण सांगूं शकाल काय?

उ. अमेरिका व इतर पुढारलेले देश आज उत्पादनक्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणावर ऑटोमेशनकडे—स्वयंचलनाच्या तंत्राकडे वळत आहेत. विशेषतः अशा देशांमध्यें येत्या दशकांतला—कदाचित नंतरचाहि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असा असेल कीं माणसाला मिळणाऱ्या फावल्या वेळाचें काय करायचें? अर्थात् अमेरिका, युरोप–विशेषतः पुढारलेले स्कॅंडिनेव्हियन देश, आणि अर्थात् रशिया या देशांमध्यें हा प्रश्न जेवढा तीव्र आहे, तेवढा तो भारतासारख्या अविकसित देशांत नाहीं हें खरें. आज या प्रश्नानें सर्वांत अधिक अमेरिकेला ग्रासलें आहे. आणि ही साथ अधिक तीव्र होणें व सगळीकडे पसरूं लागणें अपरिहार्य आहे. तरुणांमध्यें पसरलेला वांडपणा व गुन्हेगारी, संपन्न देशांमध्यें व समाजांमध्यें केव्हां ना केव्हां तरी अटळपणें होणारा, नैतिक मूल्यांचा व आध्यात्मिक शिस्तीचा अधःपात—यांच्याबद्दल जगांतल्या सगळ्या ठिकाणांहून येणाऱ्या बातम्या आपण वाचतोंच. फावल्या वेळाचा उत्तम उपयोग कसा करायचा, या समस्येवर उपाय कोणता? तो शोधून काढला नाहीं, तर साऱ्या संस्कृतीचाच बौद्धिक आणि नैतिक ऱ्हास होईल.

प्र. मी असें वाचलें आहे कीं रशियानें या प्रश्नाचा शास्त्रीय दृष्टीनें विचार चालवला आहे.

उ. खरें आहे. खरें आहे. पण बऱ्याच कमी प्रमाणांत कां होईना, पण रशियांतहि या गोष्टी निर्माण झाल्या आहेतच. ‘इतर’ कांहीं मूल्यें बाजूस टाकून शास्त्रीय दृष्टीनें हा प्रश्न हाताळणें शक्य आहे का, या विषयीं मला खात्री नाहीं. मला हें नक्की कशा तऱ्हेनें मांडावें तें कळत नाहीं, पण या साऱ्यांत कसली तरी उणीव दिसते. या प्रश्नाच्या नैतिक बाजूचा विचार होतांना दिसत नाहीं. आध्यात्मिक उपायाचा शोध होत नाहीं.

प्र. नैतिक आणि आध्यात्मिक उपायांबद्दलचें हें बोलणें कालच्या जवाहरलाल नेहरूंच्या तोंडीं अगदीं अनपेक्षित वाटत नाहीं काय? आपलें हें बोलणें

ऐकतांना आपल्या आयुष्याच्या सायंकाळीं परमेश्वराला शोधूं लागलेल्या नेहरूंचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहातें.

उ. अशाच शब्दांत आपल्याला हें मांडायचें असेल, तर माझें उत्तर असें कीं, होय. मी बदललों आहें. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांविषयींचा आग्रह अजाणतां माझ्या बोलण्यांत आला असें नाहीं. तो अगदीं जाणीवपूर्वक आलेला आहे. त्याला कांहीं कारणें आहेत. भौतिक विकास हा आपल्याला साधलाच पाहिजे; परंतु त्याशिवाय, अधिक खोलवर पोंचणाऱ्या अशा नैतिक व आध्यात्मिक विकासाचीहि तहान मानवी मनाला लागलेली असते. कदाचित या विकासाच्या अभावीं भौतिक विकास हा निरर्थकहि ठरेल. आतां प्रश्न असा येतोः योग्य ती नैतिक आणि आध्यात्मिक पातळी आणायची कशी? धर्मपंथांचा एक मार्ग आहे, पण तो दुर्दैवानें अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांनीं संकुचित झालेला आहे. धर्मांचें बाह्य स्वरूप किंवा कवच शाबूत आहे, पण आंतलें प्राणतत्त्व हरवलें आहे. मला काय म्हणायचें आहे तें आलें का आपल्या ध्यानांत?

प्र. होय आलें. धर्माच्या बाबतींत पाहिलें तर आपला कल कांहींसा बुद्ध-धर्माकडे आहे, तसेंच ब्रह्मतत्त्वानें सारें विश्व व्यापलें आहे, या वेदान्ती श्रद्धे-कडेहि आपला ओढा आहे असें मी म्हटलें तर तें बरोबर म्हणतां येईल काय?

उ. बुद्धधर्माचें तत्त्वज्ञान अतिशय वेधक आहे. केवळ धर्माच्या बाबतींत नव्हे, तर कला आणि राजकारण या क्षेत्रांतहि या तत्त्वज्ञानानें प्रत्यक्ष कार्य करून दाखवलें आहे, हें आपल्या अशोकाच्या कारकीर्दीवरून दिसून येतें. जगांत दैवी ब्रह्मतत्त्व भरलेलें आहे आणि प्रत्येक व्यक्तीमध्यें त्याचा अंश असतो, ही पुरातन हिंदु कल्पना मला आवडते. फक्त मी या ब्रह्मतत्त्वाला जीवन-शक्ति (लाइफ फोर्स) म्हणतों. मी कांहीं श्रद्धाळू धार्मिक मनुष्य नाहीं; पण माणसाला त्याच्या सर्वसाधारण पातळीच्या वर नेणारी आणि मानवी व्यक्तित्वाला आध्यात्मिक गुणवत्ता आणि नैतिक गाढता यांचें नवें परिमाण देणारी गोष्ट—मग तिला तुम्ही धर्म म्हणा किंवा आणखी कांहीं म्हणा—मला जरूर श्रद्धेय वाटते. माणसाला त्याच्या 'अहं'च्या वरच्या पातळीवर नेणारी कुठलीहि गोष्ट मी चांगलीच मानतों. मग तो एखादा देव असो किंवा दगडाची मूर्ति असो. ती

एक हितकारक गोष्ट आहे आणि तिची हेटाळणी करणें इष्ट नाहीं. माझ्याविषयीं म्हणाल तर सर्व धर्म, पंथ व दर्शनें यांच्याविषयीं सहिष्णुता हा माझा धर्म आहे.

प्र. केवळ सहिष्णुताच नव्हे. मी त्याहि पुढें जाऊन असें म्हणेन कीं आपण त्या सर्वांचा जणुं समन्वय साधूं पाहात आहांत.

उ. निदान जाणीवपूर्वक तरी असा समन्वय साधण्याचा माझा प्रयत्न चाल-लेला नाहीं. पण माझ्या स्वभावांतली ही एक सहजप्रवृत्ति आहे. जगांतल्या सगळ्या चांगल्या आणि सुंदर गोष्टी—तसेंच निसर्ग—यांची देवाप्रमाणें पूजा करणाऱ्या प्राचीन मूर्तिपूजकांप्रमाणें कांहींसा माझा स्वभाव आहे. एखादा देव चुकून पुजायचा राहील आणि त्यामुळें तो क्रोधाविष्ट होईल या भीतीनें ते एक मूर्ति मुद्दाम तयार करीत आणि त्याला 'अज्ञात देव' म्हणून भजत! आपल्याला माहीतच आहे कीं चार महान् धर्मांचा परिणाम भारतावर झालेला आहे. अजूनहि होत आहे. त्याच बरोबर तंत्रविज्ञान व औद्योगीकरण या क्षेत्रांमध्येंहि आपण बरीच प्रगति केली आहे. आणि तरीहि विज्ञान आणि धर्म यांमध्यें कसलाहि प्रगट संघर्ष येथें दिसत नाहीं. अशा तऱ्हेचा मेळ घडवून आणण्याचा मान भारताला मिळण्याचा अजूनहि संभव आहे.

प्र. आपण हें फार चांगल्या तऱ्हेनें मांडलें. पण मला वाटतें कीं आपण आपल्या मुख्य मुद्यापासून जरा दूर गेलों आहोंत. मार्क्सला जें जाणवणें शक्य नव्हतें अशा प्रश्नांपैकीं फावल्या वेळाचा योग्य उपयोग करण्याविषयींच्या प्रश्नाचा आपण विचार करीत होतों. हा प्रश्न हाताळण्यासाठीं केवळ शास्त्रीय किंवा मार्क्सवादी दृष्टिकोनापेक्षां अधिक कशाची तरी आवश्यकता आहे, असें आपण म्हणत होतां.

उ. होय. खरा प्रश्न हा पूर्णपणें सुसंघटित, एकजिनसी मानवी व्यक्तित्व निर्माण करण्याचा आहे; नियोजन व विकास यांच्या केवळ भौतिक यंत्रणेचें जें आध्या-त्मिक आणि नैतिक अंग, तें मानवी व्यक्तित्वांत समाविष्ट करण्याचा प्रश्न आहे. नियोजन आणि विकास यांना आतां शास्त्रांतल्या किंवा गणितांतल्या फॉर्म्युल्याचें—सूत्राचें स्वरूप आलें आहे. त्यांना मजबूत पाया लाभला म्हणजे

स्वयंविकासी अर्थव्यवस्था आणि कल्याणकारी राज्य हीं त्यांचीं उद्दिष्टें साध्य होण्याची खात्री आहे. परंतु खरोखर एवढें पुरेसें आहे का? मला तसें वाटत नाहीं. आर्थिक दृष्ट्या अत्यंत विकसित अशा राष्ट्रांतहि भौतिक प्रगतीमुळें लोकांना पूर्णपणें सुसंघटित, अर्थपूर्ण अशा जीवनाचा लाभ होऊं शकलेला नाहीं. तेथें एक पोकळी दिसत आहे. जीवनांतला तोल बिघडला आहे. तुम्ही उद्योगाचा, कामधंद्याचा प्रश्न सोडवला कीं वाढलेल्या फावल्या वेळेचेंच काय करायचें, हा त्याच्या पुढला आणि त्याहून मोठा प्रश्न उभा राहातो. कारण माणसाच्या भौतिक, ऐहिक इच्छा तृप्त झाल्या, कीं त्याहून खोलवर दडलेली आध्यात्मिक व नैतिक तहान त्याला जाणवूं लागते.

मग आणखी एक प्रश्न पूर्वींपेक्षां अधिक निकडीनें आपल्यापुढें ठाकतो. आपला फावला वेळ उत्तम तऱ्हेनें उपयोगांत आणण्याइतकी बौद्धिक आणि नैतिक प्रगल्भता माणसामध्यें आली आहे काय? अर्थात् हा प्रश्न फावल्या वेळाखेरीजच्या इतर वेळाबाबतहि अस्तित्वांत आहेच. परंतु जेव्हां मनुष्य काम करीत असतो, नोकरी करीत असतो, अस्तित्वासाठीं झगडा करीत असतो—हा झगडा आपल्या देशांतल्याप्रमाणें अटीतटीचा असेल किंवा विकसित देशांतल्याप्रमाणें सौम्य असेल—त्यावेळीं त्याचें मन गुंतलेलें असतें. पण विकसित देशांतल्याप्रमाणें त्याचे सामाजिक-आर्थिक प्रश्न सोडवले गेले, आणि स्वयंचलनामुळें—ऑटोमेशनमुळें—त्याला कामांत सवड मिळूं लागली, म्हणजे फार मोठ्या प्रमाणावर देशांत नवे प्रश्न निर्माण होतात. बालगुन्हेगारी, लैंगिक अत्याचार व विकृति, मद्याचें व्यसन, विध्वंसी वृत्ति, अराजक यांसारखे, आध्यात्मिक व्याधींचे आणि नैतिक अनर्थांचे इतर अनेक विषाणु पसरूं लागतात. एकदां माणसाच्या भौतिक गरजा पुऱ्या झाल्या—पुरेसा पैसा, काम, घर आणि इतर अशाच गोष्टी त्याला मिळाल्या, म्हणजे जीवनांत त्याला निश्चित असें कार्यच उरत नाहीं, हा खरा प्रश्न आहे.

प्र. तो माणूस मग एका आध्यात्मिक पोकळींत बुडून जातो, असेंच ना?

उ. होय. आध्यात्मिक पोकळीच असते ती. साऱ्यांतला आत्मा नाहींसा होतो. या साऱ्याचा परिणाम म्हणजे तुम्ही ज्यांना आपल्या पिढींतले 'संतप्त

तरुण आणि तरुणी ' म्हणतां त्या व्यक्ति ही कांहीं बुद्धिहीन किंवा गुन्हेगार मनोवृत्तीची पिढी नाहीं. ही तरुण मंडळी बुद्धिमान आहे; त्यांचीं मनें मूळचीं शाबूत आहेत. पण कांहींतरी चुकलें आहे. कदाचित आर्थिक झगड्याच्या प्रश्नाचा त्यांच्या जीवनांतला अभाव हेंहि कारण असेल. आपण मुद्यावर येऊं या. एकंदर प्रश्नाचा हा पैलू—हा विशिष्ट तऱ्हेचा विकास, त्यांतून निर्माण होणारी अभिनव परिस्थिति आणि नव्या समस्या—हें सारें मार्क्सच्या विचारांत येणें शक्य नव्हतें.

प्र. समाजवादी देशांचा मला जो वैयक्तिक अनुभव आला आहे, त्यावरून मला असें निश्चयानें म्हणावेंसें वाटतें, कीं हा विशिष्ट प्रश्न भांडवलशाही देशांतल्याइतका तिकडे तीव्र नाहीं.

उ. स्थूलमानानें पाहिलें तर अशा प्रश्नांची उकल ही समाजवादी समाज-संघटनेंत अधिक सुकर असते, अशी माझीहि धारणा आहे. पण या नव्या प्रश्नांपैकीं सगळयांचीं उत्तरें समाजवादी समाजांना सापडलीं आहेत, असें मी म्हणणार नाहीं. मला तर तें उत्तर माहीतहि नाहीं; पण हळुहळु, कालान्तरानें तें उत्तर सापडेल याची मला खात्री आहे. प्रश्न जसजसे निर्माण होतात, तसतसे त्यांवरील उपायहि सापडत जातात. विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांच्या नव्या युगाला साजेल असा संस्कृतीचा नवा पाया बहुधा निर्माण होईल आणि त्यांतून नव्या ध्येयप्रणालि आणि विशालतर तत्त्वज्ञानहि निर्माण होईल. सामुहिक जीवनाचे कांहीं नवे प्रकार आजच्या परिस्थितींत आवश्यक आहेत. ते निर्माण करणें इतर प्रकारच्या समाजांपेक्षां समाजवादी समाजांतच अधिक सोपें जाईल असें मला वाटतें. तरीहि एक वास्तव उरतेंच : प्रश्न अणुबॉंबचा असो, समा-जाच्या उभारणीचा असो किंवा दुसरा कसला असो, त्याच्या नैतिक पैलूला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे.

आपल्या जवळ अणुबॉंब, अणुशक्ति किंवा अंतरीक्ष-यानें आहेत असें धरलें, तर तीं कोणत्या प्रकारें वापरायचीं, हा खरा प्रश्न आहे. नेहमीच्या सर्वसाधारण आर्थिक क्षेत्राच्या बाहेर हे नवे शोध आपल्याला खेचीत आहेत. मार्क्सवादी अर्थशास्त्र किंवा असेंच आणखी एखादें ' स्थिर ' झालेलें शास्त्र—

यांच्या भाषेंत आपल्याला या नव्या शोधांची विचिकित्सा करतां येणार नाहीं. त्यासाठीं नवा, आधुनिक दृष्टिकोन हवा. नैतिक किंवा आध्यात्मिक दृष्टिकोन हवा-हें कसें मांडायचें तें मला समजत नाहीं-पण अशा तऱ्हेचें कांहींतरी आज आवश्यक आहे. आपल्या समोरच्या कूट प्रश्नाची उकल दुसऱ्या कशानें होणार नाहीं. नाहींतर आपल्या वैज्ञानिक आणि तंत्रविज्ञात्मक नवयुगाची प्रगति थांबवणाऱ्या सत्तास्पर्धेंत अवनतीची अखेर होईल. माझ्यामतें साऱ्या प्रश्नाचा खरा गाभा हाच आहे.

११०००

३.

# समाजवादाचा भारतीय मार्ग

प्र. चालू काळांतील परिस्थितीसाठीं नव्या दृष्टिकोणाची आवश्यकता आहे आणि हाच साऱ्या प्रश्नाचा गाभा आहे, असें आपण म्हणालांत तें अगदीं बरोबर. आपल्या काळाला अनुरूप अशा, आणि या काळांतील प्रश्नांची योग्य उकल सुचवणाऱ्या नव्या समाजवादाची व्याख्या आपल्याकडून मिळवण्याची माझी इच्छा आहे.

उ. माफ करा, तुम्हाला तशी व्याख्या मी देऊं शकणार नाहीं. वेगानें बदलणाऱ्या आजच्या जगांत स्वच्छ, नितळ अशा विचारशीलतेची आवश्यता आहे. उलट व्याख्या या फार झटकन अपरिवर्तनीय अशा 'आज्ञा' बनतात. घोषणा बनतात. स्वतःसमोर कांहीं उद्दिष्टें ठेवून, परिणामकारक अशा उपाय-योजना शोधून काढायचा प्रयत्न मी करीत आहे. मनवी सुखसमाधान, मानवी प्रगति व स्वतःचा पूर्ण विकास साधण्याची प्रत्येक व्यक्तीला संधि मिळवून देणें—अशीं हीं स्थूल उद्दिष्टें आहेत. यासाठीं प्रत्येक गटांत स्पर्धेचें तत्त्व कमी कमी होत गेलें पाहिजे; सहकाराची भावना अधिकाधिक वाढली पाहिजे. मित्रत्वाच्या स्पर्धेतली योग्य प्रमाणांतली ईर्ष्या ही उत्तेजन देणारी असते हें खरें; पण भांडवलशाही मार्गाच्या मुळाशीं असलेली गळेकापू स्पर्धा ही नक्कीच नाहींशी झाली पाहिजे. समाजवादाची व्याख्या करायला आपण सांगितलें. मी असें गृहीत धरतों कीं आपल्याला व्याख्या हवी आहे, ती इष्ट उद्दिष्टांकडे नेणाऱ्या 'आर्थिक धोरणाची.' साध्याकडे जाण्याचें हें एक साधन आहे. साध्य, मी सांगितल्याप्रमाणें मूलतः मानवी विकास व प्रत्यक्ष उन्नतीची संधि प्रत्येकाला उपलब्ध होणें, हें आहे. अर्थात्, हें सगळ्यांनाच हवें

आहे—निदान प्रत्येकाचा दावा तरी तसा आहे. आपल्याला मानवी विकास किंवा सामाजिक न्याय नको आहे, असें भांडवलदारहि म्हणत नाहींत. सार्वत्रिक विकास किंवा प्रगतीची समानतेची बाजू यांच्या विषयीं त्यांना आशंका असेल. या बाबतींत सुद्धां अति हट्टाग्रह हा उपयोगाचा नाहींच. आपण सर्वांना एकमेकांसारखे करूं शकत नाहीं. कारण माणसांमाणसांमध्यें शारीरिक आणि बौद्धिक वेगळेपणा असतोच. कांहीं हुशार, कांहीं जडबुद्धीचे—सगळ्या तऱ्हेचे लोक असतात. सर्वांना समान संधि देणें व सर्वांना समान दर्जानें वागवणें एवढेंच आपण करूं शकतों.

येथें आपण इष्ट उद्दिष्टें साधण्यासाटीं अमलांत आणायच्या सामाजिक व आर्थिक धोरणांकडे येतों. समाजाची जुनी आणि विषम घडण मुळापासून बदलण्याचा आपला प्रयत्न आहे. खासगी मिळकत किंवा व्यक्तिगत नफा या लोभी प्रेरणांचा पगडा आपल्याला नको आहे. राजकीय व आर्थिक सत्तेचें न्याय्य—आणि सर्वांना समान—असें वांटप करून आपल्याला हें साधायचें आहे आम्हांला वर्गहीन समाज हवा आहे. सर्वांना सारखी संधि देणारी समाजवादी घडण हवी आहे. आणि अर्थातच हें सारें आपल्याला शांततामय आणि लोकशाही मार्गांनीं घडायला पाहिजे आहे. एखाद्या देशांत जी विशिष्ट वास्तव परिस्थिति असते, तिच्या संदर्भात प्रत्येक देशांत हें धोरण वेगळ्या प्रकारें विकसित होईल. विकसित देशांतील आर्थिक धोरण वेगळें असणार; अविकसित किंवा प्राथमिक समाजव्यवस्थेंतून बाहेर पडत असलेल्या देशांतील आर्थिक धोरण वेगळें असणार. आपण मधले टप्पे गाळूं शकत नाहीं; त्यांच्यावरून उडी मारूं शकत नाहीं; एकेका टप्प्यांतून आपल्याला वाढत पुढें जायचें असतें.

प्र. या संदर्भात आपला देश कुठें बसेल?

उ. आजच्या घडीला आपला देश अतिशय संमिश्र अवस्थेंत आहे. आपल्या इतिहासाचें प्रत्येक शतक आज भारतांत अस्तित्वांत आहे—अगदीं अश्मयुगांत जगणाऱ्या आदिवासींपासून तो विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत. आपल्याकडे अणुशक्ति आहे, त्याचप्रमाणें शेणाचाहि उपयोग होतो आहे. पण स्थूलपणें पाहिलें, तर तंत्रविज्ञानाच्या बाबतींत बरीचशी प्रगल्भता मिळविण्याच्या बेतांत आपला देश आहे. हें केवळ मी तंत्रविज्ञानात्मक दृष्टीनें बोलतों आहें, इतर

दृष्टीनें नव्हे—हें कृपा करून ध्यानांत घ्या. कांहीं बाबतींत आपण अजून मागासलेले असूं, कांहीं बाबतींत बरीच प्रगति केली असेल. पण तंत्रवैज्ञानिक संस्कृति ही कसोटी मानली तर आपण अलीकडच्या काळांत मजबूत पाया घातला आहे. तोहि वाढतो आहे. हा वाढता पाया अपरिहार्यपणें देशाला अधिकाधिक औद्योगीकरणाकडे नेणारा आहे.

प्र. अपरिहार्यपणें ?

उ. होय. अपरिहार्यपणें असें मी म्हणतों, याचें कारण, वाढता पाया घातला गेला आणि कांहीं शक्ति मुक्त झाल्या म्हणजे त्यांना एक गतिमानता येते. त्या आपोआप पुढें जाऊं लागतात. आमचा दृष्टिकोन समाजवादी आहे. तो मुख्यतः आर्थिक आहे. येथें राजकारण हें अर्थकारणाभोवती फिरतें आहे. येथें आपसांत मतभेद होतील, कांहीं अडचणी निर्माण होतील, कदाचित् थोडी पीछेहाटहि होईल; पण अटळपणें विशिष्ट दिशेकडे जाणाऱ्या शक्तींना हें सारें थोपवूं शकणार नाहीं. त्यांतले कांहीं घटक त्यांची गति मंद करतील, कांहीं ती वाढवतील. यांतून देश पुढेंच जात राहील. या मुद्द्यावर माझ्या मनांत कसली शंका नाहीं. मला अस्वस्थ करणारा प्रश्न एकच : इतर अनेक घटकांच्या संदर्भांत योग्य तितक्या वेगानें आपण जाऊं शकूं कीं नाहीं ?

प्र. इतर घटक म्हणजे बाहेरचें जग ? कीं अंतर्गत प्रवाह ?

उ. मला सांगायचें आहे तें एका बाजूस वाढत्या लोकसंख्येसारख्या प्रश्नांबद्दल आणि दुसरीकडे वाढत्या सामाजिक प्रश्नांबद्दल. समजा, आपली लोकसंख्या दरसाल दोन टक्क्यांनीं वाढते आहे. या वाढत्या लोकांसाठीं आवश्यक असणारी दोन टक्क्यांची आर्थिक वाढ ही मोठीशी वाढ नव्हे. पण यांतली लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या दोन टक्के आर्थिक वाढीमुळें आपण जास्तींत जास्त म्हणजे फक्त मूळच्या जागीं टिकून राहातों. आणि हें मुळींच पुरेसें नाहीं. कारण लोकसंख्येच्या वाढीबरोबरच आपल्याला दुष्ट सामाजिक अन्याय, निकडीच्या गरजा व टंचाई यांनाहि तोंड द्यायचें आहे. या गोष्टींकडे लक्ष दिलेंच पाहिजे. कारण झगडत असलेले आणि खरोखर दुःख सहन करीत

स्थळप्रत.

असलेले लोक संप-निदर्शनें यांच्यासारख्या साधनांनीं स्वतःच्या दुःस्थितीकडे आपलें लक्ष वेधूं शकत नाहींत.

आज आपण संप, सत्याग्रह इत्यादींविषयीं खूप ऐकतों, त्याचाहि येथेंच विचार करूं. आपण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर, संपावर जातात ते समाजांतल्या सापेक्षतः अधिक सुखवस्तु वर्गांतले असतात. 'सुखवस्तु' म्हणजे श्रीमंत किंवा त्या वर्गांतले असें मला म्हणायचें नाहीं; खऱ्याखुऱ्या दरिद्री वर्गांतले लोक कधीं संप करीत नाहींत ही वस्तुस्थिति मला दाखवायची आहे. निदर्शन करण्याचीं त्यांच्याजवळ साधनेंहि नसतात आणि तेवढी त्यांच्याजवळ शक्तीहि नसते. समजा, एखाद्या गांवांत पिण्याच्या पाण्याचें दुर्भिक्ष्य आहे. तेथें लोक कसला संप करणार? याचा अर्थ असा कीं अन्न, पाणी, वस्त्र, निवारा यांसारख्या अगदीं प्राथमिक गरजा पुरा करण्याच्या दृष्टीनेंच आपल्याला सतत विचार केला पाहिजे.

आतां, लोकसंख्येच्या वाढीसाठीं आर्थिक उत्पन्नाची दोन टक्के वाढ गृहीत धरली, त्याप्रमाणें आतां सांगितलेल्या प्राथमिक गरजांसाठीं आपण सांगाल तेवढे टक्के—समजा दोन टक्के आपण बाजूस ठेवले. म्हणजे एकंदर चार टक्के झाले. परिस्थिति सुधारण्यासाठीं एवढ्याचा थोडाफार तरी उपयोग होईल खरा; पण त्यामुळें पुढील प्रगतीसाठीं भांडवल म्हणून गुंतवायला कांहींच शिल्लक उरत नाहीं. गुंतवणुक व अधिक उत्पादन यांसाठीं शिल्लक कशी टाकायची, हा दरिद्री आणि मागासलेल्या राष्ट्रांपुढचा मुख्य प्रश्न असतो. म्हणून अधिक आर्थिक शक्तीची गरज सतत असते. ती जितकी अधिक मिळेल तितका विकास हा वेगानें होत जातो. आतां ही रक्कम आपण सहा, सात किंवा आठ टक्के धरूं या. फक्त एक लक्षांत ठेवलें पाहिजे. यांतला प्रत्येक टक्का म्हणजे फार प्रचंड रक्कम आहे. एक एक जादा टक्का म्हणजे सुमारें एक सहस्र कोटि रुपये होतात. हे एक सहस्र कोटि रुपये आणायचे कुठून? उत्पादन वाढवून निर्माण करायचे किंवा कर, कर्ज किंवा मदत या रूपानें जमा करायचे.

भारताला आज कमींत कमी पांच टक्के जादा उत्पन्नाची गरज आहे, असें या संदर्भात म्हणतां येईल. कांहींहि करून एवढी किमान रक्कम उभी केलीच पाहिजे. त्यानंतरच देश प्रगतीच्या दिशेनें मार्गस्थ होईल.

प्र. स्थिर अर्थव्यवस्थेकडून स्वयंविकासी अर्थव्यवस्थेकडे 'उड्डाण' करण्यासाठीं —'टेक-ऑफ'साठीं—अपरिहार्य असलेली किमान जादा रक्कम पांच टक्के आहे, असें आपलें म्हणणें आहे काय ?

उ. नाहीं. आपण आतां 'टेक-ऑफ' या शब्दाचा उल्लेख केला. हा एक अत्यंत लोकप्रिय शब्द झाला आहे. अनेक अर्थांनीं तो वापरला जातो आहे. औद्योगिक यंत्रणा व साधनसामग्री आणि शेतकीची यंत्रणा व साधनसामग्री यांचा एकमेकांच्या बरोबरीनें व शेजारानें असा उपयोग केला जावा कीं त्यांतून या दोन व्यवसायांची वाढ स्वयमेव साधली जावी. हाच आपल्यासारख्या देशांच्या दृष्टीनें 'उड्डाणा'चा —'टेक-ऑफ'चा महत्त्वाचा भाग आहे. स्वतःचें पोषण करणारी, स्वतःलाच गति देणारी आणि स्वतःचा विकास करणारी अर्थव्यवस्था हा या साऱ्याचा अर्थ आहे. एखादा देश उन्नतीकडे केवळ याच मार्गानें जाऊं शकेल. इतर जगाला त्यानें चार हात दूर ठेवावें असा याचा अर्थ नाहीं. आपण आयात-निर्यात चालूच ठेवणार; इतरांकडून मदत घेणार इतकेंच नव्हे तर इतरांना मदत देणारहि. पण स्थूल मानानें पाहातां स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध अर्थ-व्यवस्था हीच आपल्याला आपल्या ध्येयाकडे 'उड्डाण' करायला मदत करील.

प्र. यांत गोम एवढीच दिसते : तुलनेनें बोलायचें तर आपल्या स्वतःच्या अपेक्षांच्या मानानेंहि आपल्या विकासाची गति अधिक मंद आहे हें खरें ना ?

उ. होय अगदी खरें. आधींच ज्यांच्याजवळ सारें आहे, त्यांनाच अधिक दिलें जाईल, हाच दुर्दैवानें जीवनाचा नियम दिसतो.

प्र. माफ करा, मी जरा मध्येंच एक प्रश्न विचारतों. श्रीमंत आणि गरीब यांच्यामध्यें १९४७ पूर्वी जेवढी विषमता होती तिच्यापेक्षां अधिकच विषमता १९४७ नंतर शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही क्षेत्रांत निर्माण झालेली दिसून येते. ही आपल्या समाजवादी समाजसंघटनेंतील विसंगतीच आहे असें दिसतें. आपल्या समाजवादांतील या विसंगतीचें समर्थन आपण कसें कराल ?

उ. मी त्याचें समर्थन करीत नाहीं. त्याच बरोबर, इतकें आग्रही असें सार्व-त्रिक विधान मी मान्यहि करूं शकत नाहीं. देशांत विषमता आहे, मोठ्या

प्रमाणावर आहे. कदाचित् कांहीं ठिकाणीं, विशेषतः आपण जेथें रहातां अशा शहरामध्यें ही विषमता वाढते आहे असेंहि दिसत असेल; परंतु एकंदरीनें पाहिलें तर व्यापक प्रमाणावर समानता निर्माण होत आहे. वेगवान् औद्योगीकरण वगैरेमुळें कांहीं श्रीमंत लोक अधिक श्रीमंत झाले असतीलहि, परंतु निर्धन लोकांची–विशेषतः कामगार आणि किसान यांची परिस्थितीहि सुधारलेली आहे. ज्यांच्याजवळ आधीं सर्व कांहीं आहे त्यांनाच अधिक देण्याच्या जीवनाच्या नियमाचा मी मघाशीं उल्लेख केला, त्यावेळीं माझ्या मनांत आपल्या देशांतील श्रीमंत आणि गरीब हे वर्ग नव्हते. इतर श्रीमंत देश आणि आपला देश यांना अनुलक्षून मी तें म्हणालों होतों. आतां त्या प्रश्नाकडे या विशिष्ट दृष्टीनें पाहूं या: आपण भारतीय लोक गेलीं जवळजवळ दहा वर्षे अमाप परिश्रम करीत आहोंत. तरीहि, इतर विकसित देशांतील अर्थव्यवस्थांच्या पेक्षां आपल्या अर्थव्यवस्थेची गेल्या दहा वर्षांतील प्रगति कितीतरी मंदगतीनें चालू आहे. त्या देशांजवळ तंत्रविज्ञानाची शक्ति आहे. त्यामुळें त्यांची अर्थव्यवस्था स्वयंविकासी पायरीपर्यंत पोचलेली आहे. आतां त्यांनीं जरा निष्काळजीपणा केला, आराम केला, तरीहि त्यांच्या प्रगतीला खीळ बसणार नाहीं; कारण आर्थिक विकासाच्या त्यांच्या यंत्रणेला आतां स्वयंगति लाभली आहे. उदाहरणार्थ, रशियन अर्थव्यवस्थेनें हें सामर्थ्य कमावलें आहे. स्वतःच्या शक्तीवर ती वाढत आहे, कारण फार काळापूर्वीं तिनें 'उड्डाण' साधलें आहे. ब्रिटिश अर्थव्यवस्थेनें १९ व्या शतकांत गति घेतली. तेव्हांपासून तीहि स्वतःच्या प्रेरणेनेंच वाढत आहे. जर्मन, फ्रेंच आणि अमेरिकन अर्थव्यवस्थांनीं साठसत्तर वर्षांपूर्वीच 'उड्डाण' साधलें आहे. अर्थव्यवस्थेला आंतूनच गति मिळूं लागेल असा टप्पा गांठणें ही त्यांतली महत्त्वाची गोष्ट. हें एकदां साधलें म्हणजे, स्थूलमानानें बोलायचें तर, नंतरची प्रक्रिया आपोआप होत राहाते.

विषमता—मग ती राष्ट्रांराष्ट्रांमधील असो किंवा एका राष्ट्राच्या नागरिकांमधील असो—कमी व्हायला हवीच. परंतु आजची स्थिति पाहिली तर ही विषमता वाढूं पहाते आहे. आणि त्यामुळें जगांतल्या मागासलेल्या भागांत सामाजिक असंतोष आणि इतर संघर्ष व आपत्ती यांचें प्रमाण वाढूं लागलें आहे.

प्र. पुढारलेले देश आणि मागासलेले देश यांच्यामधील ही वाढती विषमता जर नाहींशी करायची असेल तर त्या दोहोंमधला सतत वाढत जाणारा आर्थिक भेद नाहींसा करणारी—किंवा निदान कमी करणारी—अशी आंतरराष्ट्रीय प्रातिकराची पद्धति निर्माण करतां येणार नाहीं काय? उदाहरणार्थ, समजा, बांदुंग परिषदेंतील राष्ट्रें संयुक्तराष्ट्र संघटनेतर्फे किंवा स्वतंत्रपणानें एकत्र आलीं आणि पाश्चिमात्य व सोविएत गटांतील पुढारलेल्या देशांकडून स्वतःच्या विकासासाठीं त्यांनीं संयुक्त निधि जमविला तर?

उ. अशा उपायांची व्यावहारिक शक्यता मला पटत नाहीं. बांदुंग राष्ट्रें अर्थातच एकत्र जमूं शकतील आणि उच्च पातळीचे ठराव संमत करूं शकतील. परंतु त्यांतून प्रत्यक्ष फळ कांही मिळेल काय? आजच दिसतें आहे कीं, कांहीं बांदुंग राष्ट्रें परस्पर विरुद्ध दिशांना तोंडें करून चालत आहेत.

आंतरराष्ट्रीय प्रातिकराच्या सूचनांच्या संदर्भात पाहिलें तर, जगांतल्या अनेक देशांना इतर प्रदेशांतील विकासकार्याला हातभार लावण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर पटूं लागली आहे. ही गरज त्यांना स्वतःच्या दृष्टिकोणांतून वाटते आहे, आणि अशा देशांमध्यें जगांतले अनेक सधन आणि पुढारलेले देशहि आहेत. सगळ्यांचीच भावना मानवतावादी दृष्टिकोणांतून उद्भवलेली नाहीं. ज्याला 'शहाणें आत्महित' म्हणतात त्या स्वार्थी दृष्टिकोणांतून ही भावना निर्माण झाली आहे. पण एखाद्या देशानें जर स्वतः हातपाय हालवले नाहींत, तर, या प्रचंड जगांतून कितीहि मदत त्याला मिळाली, तरी तो पुढें जाणार नाहीं. हा केवळ पैशाचा प्रश्न नाहीं. भांडवल म्हणून अर्थात पैशाची गरज लागतेच; पण पुढें जाण्याची प्रबळ इच्छा, आंच ही मुख्यतः पाहिजे. ती जर नसेल, तर देश मागें पडलाच म्हणून समजावें. तो देश अवनतीकडे जाणार. आणखी एक ध्यानांत ठेवलें पाहिजे. हा अवनतीचा धोका केवळ मागासलेल्या देशांनाच आहे असें नाहीं. तो पुढारलेल्या देशांच्या बाबतींहि आहे. स्वयंचलन आणि तशाच इतर प्रक्रिया यांच्यामुळें श्रमांशिवाय संपत्ती निर्माण करणें लोकांना अत्यंत सुलभ झालें आहे. त्यामुळें माणसांना जीवनांत कांहीं हेतूच नसल्यासारखें, कांहीं कर्तव्यच न

उरल्यासारखें झालें आहे. कुठल्याहि देशांतला मानवी घटक जेव्हां अशा रीतीनें बिघडूं लागतो—घसरणीला लागतो, तेव्हां देशाला फार मोठा धोका निर्माण होतो.

प्र. भारतासारख्या देशांत रशिया व अमेरिका यांनीं सहकार्यानें मदत करावी आणि आर्थिक सहजीवनाच्या नवजात भावनेचें प्रात्यक्षिक दाखवावें असा विचार मघांची सूचना करतांना माझ्या मनांत होता. शिखर परिषदेच्या दृष्टीनें हा मुद्दा मला महत्त्वाचा वाटतो. कारण कांहीं झालें तरी, रशिया आणि अमेरिका, आयझेनहॉवर आणि क्रुश्चेव्ह यांना शीतयुद्धाचे पवित्रे सोडायला लावण्याच्या कामीं भारताचें—विशेषतः आपलें स्वतःचें श्रेय फार मोठें आहे. शांततामय सहजीवनाची नवी आणि अधिक कृतिशील अशी तत्त्वप्रणाली आपण दिलीत, त्यामुळें हें घडलें. एका चांगल्या कृतीला पडसाद, दुसऱ्या चांगल्या कृतीनें द्यायचा असतो. राजकीय क्षेत्रांत एकत्र येण्याची जरुरी या दोन बड्या राष्ट्रांना वाटते आहे. मागासलेल्या जगाच्या विकासासाठीं मदत करण्याच्या निमित्तानें रशिया व अमेरिका राजकीय सहजीवनाच्या पुढचा—आर्थिक सहजीवनाचा—टप्पा गांठतील आणि या नव्या टप्प्याची प्रयोगशाळा म्हणून भारताची निवड करतील तर किती छान होईल!

उ. आपण या बड्या राष्ट्रांसाठीं काय केलें आहे वगैरे चर्चा बाजूस ठेवूं. परंतु या दोन्ही राष्ट्रांनीं फार मोठ्या प्रमाणावर आमच्याशीं सहकार्य केलें आहे. भिलाई, अमेरिकन प्रकल्प, ब्रिटिश प्रकल्प, कॅनेडियन व जर्मन प्रकल्प—सारे आमच्या विकास-कार्यक्रमांत समाविष्ट झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांमध्यें आर्थिक मदतीसाठीं एक निधि निर्माण करावा आणि आपण व इतर मागासलेले देश यांनीं त्याचा उपयोग करावा, अशी आम्ही नेहमीच शिफारस केलेली आहे, आणि ती कांहीं बाबतींत प्रत्यक्षांतहि आली आहे. महत्त्वाची गोष्ट अशी कीं तुम्ही ज्याला आर्थिक सहजीवन म्हणतां, तिची उपयुक्तता सर्वांना पटूं लागली आहे. आज त्याला सहकार्यापेक्षां स्पर्धेचेंच स्वरूप आहे. पण कालान्तरानें सहकार्यहि येईलच.

प्र. शिखर परिषदेसाठीं एकत्र येणाऱ्या चार राष्ट्रनेत्यांपुढच्या आणि इतर आंतरराष्ट्रीय परिषदांच्या कार्यक्रमपत्रिकांवर या प्रश्नाला अग्रस्थान मिळालें

पाहिजे असें मला वाटतें. आतां तर क्रमशः वाढत्यानिःशस्त्री करणाचें तत्त्व वगैरे गोष्टी जगांत जवळजवळ सर्वमान्य झाल्या आहेत, त्यामुळें होणारी खर्चांतली प्रचंड बचत जगाच्या अविकसित भागाला मदत करण्यासाठीं उपयोगी पडेल.

उ. अशी आशा आपण बाळगूं या. मागासलेल्या राष्ट्रांनीं ज्याप्रमाणें आपलें जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न निकडीनें केले पाहिजेत, त्याचप्रमाणें जगांतील संपन्न राष्ट्रांनीं या राष्ट्रांना मदतहि केली पाहिजे. या दोहोंचीहि अपरिहार्यता आतां सर्वांना जाणवूं लागली आहे. शस्त्रास्त्रांवर आज खर्च केल्या जाणाऱ्या प्रचंड रकमा साऱ्या जगाची प्रगति करण्यासाठीं उपयोगांत आणतां येतील. जागतिक पातळींवर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत तोल निर्माण करण्याचा हा प्रश्न आहे. जागतिक उत्पादनाचा योग्य उपयोग आणि त्याची समान वांटणी हीं कशी साधावीं, हा तो प्रश्न आहे.

.४.

# एका दशकाचें सिंहावलोकन

प्र. आपण आर्थिक विकाससंबंधीं बोलतों आहांत, तेव्हां विचारतों, गेल्या दहा वर्षांत—आपण राजकीय सत्ता व राज्यशकटाचें सारथ्य स्वीकारल्या-नंतरच्या काळांत—भारतानें केलेली प्रगति आपल्याला समाधानकारक वाटते काय ?

उ. औद्योगिक विकासाच्या बाबतींत मला समाधान आहे. अर्थात् आमच्या हातून चुका झाल्या नाहींत असें नाहीं. त्यांतली एक—आणि कदाचित् सर्वांत मोठी चूक म्हणजे, आम्ही पोलाद कारखाने आधींच—पहिल्या योजनेंत सुरू केले नाहींत.

प्र. ही तर घोडचूक म्हटली पाहिजे. नव्हे काय ?

उ. आपण तिला घोडचूक किंवा कांहींहि म्हणा. त्यावेळीं अनेक परस्पर-विरुद्ध दिशांनीं दडपणें येत होतीं. अशा गोष्टींपासून मनुष्य नवा अनुभव शिकत जातो. पण एकंदरीनें पाहिलें तर औद्योगिक क्षेत्रांत आम्ही चांगलीच कामगिरी केली आहे. निराशाजनक जर कांहीं असेल, तर ती आमची शेतकीच्या क्षेत्रांतली वाटचाल. त्यांतहि आम्ही हातपाय हालवले नाहींत असें नाहीं. पण निसर्गानें आम्हाला कांहीं बाबतींत दगा दिला. वाईट हंगाम, अपुरीं पिकें, इतर अनेक अनपेक्षित गोष्टी...आम्ही योग्य दिशेनें आमचे प्रयत्न केले नाहींत हेंहि अंशतः आमच्या अपयशाचें कारण असेल. आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं शेतीचा प्रश्न अजस्र स्वरूपाचा आहे. केवळ सरकारी हुकुमांच्या किंवा कायद्याच्या आवाक्यांतला हा प्रश्न नाहीं. जुन्या

रूढींनीं आणि परंपरेनें बांधलेल्या तीस कोटि शेतकऱ्यांना समाजाच्या जुन्या चौकटींतून बाहेर काढण्याचा हा प्रश्न आहे.

प्र. अशी प्रत्येक व्यक्ति ही एक समस्या म्हटली तर अशा तीस कोटि समस्या सोडवायच्या आहेत म्हणायच्या?

उ. होय. परंपरेनें चालत आलेल्या जीवनक्रमांतून, जुन्या कल्पना व रूढि यांच्या वारशांतून त्यांना बाहेर काढणें हें फार अवाढव्य काम आहे. त्यांना तसें बाहेर काढणें शक्य आहे, आणि तसें त्यांना बाहेर काढलें जाणार यांतहि शंका नाहीं. शेतकरी हा इतका परंपराग्रस्त आहे कीं तो कधींच बदलणें शक्य नाहीं, असें कांहीं लोक म्हणतात तें मात्र मला पटत नाहीं. अर्थात् तो परंपराप्रिय आहे, हें खरें. कामगारांपेक्षां तो अधिक रूढिग्रस्त आहे असेंहि म्हणतां येईल. तो जें काम करतो तें कांहीं नवें नाहीं. तें तो पुरातन काळापासून करीत आला आहे. त्यामुळेंच तो जुन्या पद्धतींना चिकटून आहे. पण बदल करण्यांतले फायदे एकदा त्याला दाखवले म्हणजे तो नक्की बदलतो. मात्र ही गोष्ट सैद्धांतिक युक्तिवाद करून त्याला पटणार नाहीं. त्यासाठीं प्रत्यक्षांत परिणाम घडवून दाखवावे लागतात. कामें करण्याची नवी पद्धत आपल्या आधींच्या पद्धतीपेक्षां अधिक हितकर आहे, हें त्यानें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें म्हणजे तें त्याच्या बुद्धींत व अंतःकरणांत मुरल्याशिवाय राहात नाहीं. या बाबतींत अलीकडे दिल्लींत भरलेल्या कृषि प्रदर्शनामुळें त्याचा फार मोठा लाभ झाला आहे. सुमारें दोन लक्ष शेतकऱ्यांनीं हें प्रदर्शन पाहिलें आणि नव्या कल्पनांचें बियाणें मनांत रुजवून ते आपापल्या शेती-वाडीकडे परतले.

पण एकंदरीनें पाहिलें, तर भारतांत शेतकीनें औद्योगीकरणाच्या बरोबरीनें प्रगति केली नाहीं हें खेदजनक सत्य आहे. आम्ही अधिक झटून प्रयत्न केले असते, निसर्गानें जरा अधिक मदत केली असती, तर आपल्या अर्थव्यवस्थेंत केवढी तरी सुधारणा झाली असती. यापुढें याबाबतींत अधिक चांगलें कार्य होईल अशी आशा आहे. निदान आम्ही तसा प्रयत्न करीत आहोंत.

प्र. फ्रेंच कृषितज्ञ प्रो. ड्यूमाँ यांनीं 'भारतीय शेतीचें अपयश' या विषयावर लिहितांना फार निराशाजनक चित्र रंगवलें आहे. भारतीय शेती–उत्पादनाच्या मार्गांतले अडथळे हे निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत, असें त्यांनीं म्हटलें आहे. कम्युनिस्टांचे मार्ग सोडून इतर मार्गांनीं जातिभेद व इतर तऱ्हेची विषमता भारत नाहींशी करूं शकणार नाहीं, खरी सामाजिक क्रांति घडवूं शकणार नाहीं असा निष्कर्ष त्यांनीं काढला आहे. आपण प्रो. ड्यूमाँ यांचा अहवाल वाचला आहे काय? असल्यास त्याविषयीं आपण आपलें मत सांगाल काय?

उ. होय. तो संपूर्ण अहवाल माझ्याकडे आहे आणि त्यांतला फक्त कांहीं भाग 'न्यू स्टेट्स्मन' मध्यें प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल मी वाचला आहे, त्याचबरोबर तितक्याच दर्जाच्या इतर कृषितज्ञांचेहि अहवाल वाचले आहेत. ड्यूमाँ-अहवालाशीं कांहींचा अंशतः व कांहींचा संपूर्ण मतभेद आहे. याविषयीं मी स्वतःहि बरीच माहिती मिळविली आहे. आम्ही चुका केल्या आहेत. अडचणीहि फार मोठ्या आहेत. त्या मानवी आहेत. तशा निसर्गनिर्मितहि आहेत. पण प्रो. ड्यूमाँ रंगवतात तितकें सारें काळेंकुट्ट आहे असें मुळींच नाहीं. आमच्या किसानाची सामाजिक चौकट व भारतीय परिस्थिति यांच्या संदर्भांतच भारतीय शेतीच्या प्रश्नांची योग्य पहाणी करतां येईल. माणसाच्या कृतीला येथें परंपरांचीं आणि रूढीचीं बंधनें पडतात. त्यामुळें प्रगति मंदावते. आम्हांला त्यांचा भूतकाळ नष्ट करायचा नाहीं. समाजांत रुजलेलीं त्यांचीं पाळेंमुळें उपटून काढायचीं नाहींत. सातत्य आणि बदल यांच्या शक्तींमध्यें आम्हांला तोल साधायचा आहे. त्याला वेळ लागणारच.

अर्थात् झालेल्या प्रगतीनें माझें समाधान झालेलें नाहीं हें मला मान्य केलेंच पाहिजे. हें मी सुरुवातीलाच आपल्याला सांगितलें. पण जातिभेद व इतर भेद नष्ट करण्याच्या बाबतींत आपण बरीच प्रगति केली आहे. बड्या जमीनदारीची पद्धति आम्ही नष्ट केली आहे. जमिनीचें वांटप अधिक समानतेनें होत आहे. सारें कांहीं आम्हांला शांततेनें आणि लोकशाही पद्धतीनें करावयाचें आहे. जाती आणि वर्ग यांमधील संघर्ष आम्हांला अधिक भडकवायचे नाहींत; विझवायचे आहेत. सबंध जनतेला विशिष्ट वेगानें गतिमान करायचें

कित्येक शतकांच्या साचत आलेल्या निष्क्रियतेचें कार्यप्रवणतेंत रूपान्तर करायचें आणि आपल्या देशांतील विशिष्ट अट अशी कीं हें सारें लोकशाही चौकटींत राहून करायचें—अशा तऱ्हेचा हा प्रश्न आहे. तरी, या चौकटींत राहूनहि आपण प्रगति करूं शकूं—खूप प्रगति करूं शकूं, असें म्हणण्याइतका मी आशावादी आहें खास. ही प्रगति कदाचित सावकाश होईल. पण ती खात्रीशीरपणें, पक्केपणानें होईल. ग्रामीण समाज-प्रकल्प, सहकारी शेती व ग्रामपंचायती यांच्या द्वारें,—सहकारी संस्था व पंचायती यांच्याकडे अधिकाधिक सत्ता देऊन आम्ही वाटचालीला सुरुवात करीत आहोंत. एकदां आपण मार्गस्थ झालों, म्हणजे हळुहळु आपली गति वाढेल आणि पावलें अधिक आत्मविश्वासानें पडूं लागतील.

तेव्हां, लोकशाही चौकटींत राहून कार्य होत असलेलें एखाद्या व्यक्तीला दिसत नाहीं, एवढ्यासाठीं लोकशाहीचा त्याग करायला मी तयार नाहीं. प्रगति—विशेषतः वेगाची प्रगति लोकशाही, शांततामय मार्गांनीं साधणार नाहीं; त्यासाठीं हुकुमशाही, हिंसात्मक मार्गच चोखाळले पाहिजेत असें कांहीं लोक म्हणतात. या युक्तिवादाशीं माझा संपूर्ण मतभेद आहे. जें जें हुकूमशाही पद्धतीचें किंवा हिंसामय असेल त्याला त्याला माझा मूलतः विरोध असतो. आज भारतांतील लोकशाहीची दिशा सोडून आपण दुसरीकडे वळलों, तर देशांत हिंसा आणि फुटीरपणा माजेल.

**प्र.** पण हिंसाचार आणि फुटीरपणा देशांत निदान मुकाट्यानें तरी सारा वेळ चाललेला आहेच. साठेबाजी आणि दुष्काळ, रोगराई आणि औषधांचें दुर्भिक्ष्य यांमुळें हजारोंनीं शेतकरी मरत आहेत.

**उ.** होय. होय. मला त्याची जाणीव आहे. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांनाहि कांहीं मर्यादा हव्यात; नाहीं तर दुसऱ्यांना दुखवण्याचीं तीं साधनें बनतील; ही महत्त्वाची गोष्ट कोणीच नाकारीत नाहीं. ग्रामीण सहकारी संस्था आणि ग्रामपंचायती यांना सत्ता देणें अगत्याचें ठरतें तें यामुळेंच. संघर्ष आणि वादंग आहेत; हिंसाहि आहेच. फक्त आम्ही शांततेनें आणि सहकारानें ते वितळवायचा प्रयत्न करीत आहोंत. मोठालीं कामें करायचीं म्हणजे थोडाफार वेळ



मराठी ... संग्रहालय

लागतो; त्यासाठीं धीमेपणा आणि चिकाटी यांचीहि गरज असते. इथें तर आपण तीस कोट किसानांवर परिणाम करणारा एक प्रश्न हाताळीत आहोंत.

प्र. हा प्रश्न आणि त्यांतल्या अडचणी माझ्या ध्यानांत आल्या. परंतु स्वातंत्र्यानंतर भारतानें केलेल्या प्रगतीच्या मुद्द्याकडे आपण पुन्हां वळूं या. ह्या प्रगतीकडे साधारणतः सर्वमान्य झालेल्या समाजवादी दृष्टिकोनांतून पाहातां, आपण प्रारंभ उत्तम केला आहे आणि प्रगतीसाठीं आवश्यक असा पाया योग्य तऱ्हेनें घातला गेला आहे, असें आपल्याला वाटतें काय ?

उ. होय. आपण सुरुवात चांगली केली आहे आणि विकासाचा पाया घातला गेला आहे. आपण म्हणतां त्याप्रमाणें आपण समाजवादी व सहकारी दृष्टिकोण स्वीकारला आहे. भारतांतलें राजकारण हें बऱ्याच्च प्रमाणांत आर्थिक धोरणांच्या भोंवती फिरत असतें. आपण आर्थिक विकासाच्या बाबतींत नियोजनाचा शास्त्रीय मार्ग निवडला आहे. आणि व्यक्तिगत उद्योगधंद्याचा, खुल्या स्पर्धेचा मार्ग सोडला आहे. जवळ असलेल्या सर्व साधनसामुग्रीचा जास्तींत जास्त उपयोग आणि स्वखुशीनें उपलब्ध होणाऱ्या, आणि व्यक्तीचें त्याचप्रमाणें समाजाचें हित साधण्याच्या दृष्टीनें ज्यांना योग्य मार्गदर्शन केलें जात आहे अशा, शक्य तितक्या कामकऱ्यांकडून काम करून घेणें म्हणजे लोकशाही पद्धतीचें नियोजन.

म्हणून आपण शास्त्रीयतेची कास धरून दैव किंवा योगायोग यांच्यावर कांहींहि न सोपवितां पद्धतशीरपणानें पावलें टाकीत आहोंत. एकदां हें सारें पुरें झालें म्हणजे नियोजन आणि विकास इत्यादींसारख्या गोष्टींविषयींच्या चर्चेला फार थोडी जागा रहाते. हें सारेंच गणितांतल्या फॉर्म्युल्याच्या—सूत्राच्या—स्वरूपाचें बनतें.

प्र. गणिताचें सूत्र ?

उ. होय. जवळ जवळ गणिताचेंच सूत्र. फक्त त्यांतले एकदोन घटक संदिग्ध आणि अनिश्चित स्वरूपाचे असतात. अशा घटकांपैकीं सर्वांत मोठा म्हणजे अर्थातच मानवी घटक, म्हणजेच देशांतील माणसांची गुणवत्ता. गुणवत्ता म्हणजे

माझ्या मतें माणसांचा बौद्धिक आवाका आणि मेहनत करण्याची क्षमता. भारतांतल्या नागरिकांच्या बुद्धिमत्तेबद्दल आणि तंत्रज्ञानाबद्दल मला शंका नाहीं. संधि मिळाली तर तो चांगल्यापैकीं आणि कुशाग्र असा तंत्रज्ञ बनूं शकेल याबद्दल माझ्या मनांत कसलाहि संशय नाहीं. परंतु आमच्या कार्यक्षमतेविषयीं मात्र मला पुरेशी खात्री नाहीं.

प्र. कार्यक्षमता आहे परंतु ती जागृत झालेली नाहीं. संघटित केली गेलेली नाहीं. तिला गति दिली गेलेली नाहीं.

उ. कदाचित् हेंहि कारण असेल...

प्र. आणि येथेंच आपण मोठा अपेक्षाभंग केला आहे. आपण नुसती हांक देण्याचा अवकाश, सारा देश कंबर बांधून कामाला लागेल.

उ. असेल, कदाचित् तसेंही असेल. परंतु माझ्याकडून झालेल्या ह्या अपेक्षाभंगाशिवाय इतरहि कांहीं घटक याला कारणीभूत आहेत. हवामानासारखी कांहीं परिस्थितीहि येथें महत्त्वाची ठरते. हें सर्व आहेच. आणि याशिवाय इतरही अस्थिर व अनिश्चित घटक आहेत. परंतु ते दुर्लंघ्य नाहींत. फक्त त्याला कांहीं काळ जावा लागेल. परंतु असे घटक जरा बाजूला ठेवले तर नियोजन आणि विकास यांचा प्रश्न हा एखाद्या गणिताच्या उदाहरणाप्रमाणें शास्त्रीय पद्धतीनें सोडवितां येतो. याचा अर्थ असा कीं, तुम्ही अमुक गोष्ट केलीत तर त्याचा परिणाम म्हणून अमुक गोष्ट होईल. त्या नंतरचा दुसरा टप्पा अमुक तऱ्हेचा असेल आणि तिसरा टप्पा अमुक स्वरूपाचा असेल—हें सारें नियमानें ठरून गेल्याप्रमाणें घडतें. अर्थात् नेहमीच या सगळ्याची सुरुवात "जर आपण अमुक केलें तर" अशीच असते. पण हें सारें योग्य त्या बुद्धिमत्तेनिशीं करण्याच्या आपल्या ताकदीवर खूपच अवलंबून असतें.

किती झालें तरी एखाद्या राष्ट्राजवळ आणि समाजाजवळ असलेली शक्ति ही तुलनात्मक दृष्ट्या मर्यादित प्रमाणांतच असते. आपण ती उचित किंवा इतर प्रकारच्या मार्गांनीं वाढवूं शकूं. परंतु शक्तीचा हा साठा आपण रिकामाहि करूं शकतों. शक्ति ही एक मोठी विलक्षण गोष्ट आहे. ती वापरली म्हणजे ती वाढते.

आपण व्यायाम घेतला म्हणजे आपल्या शरीराची ताकद वाढते. हें तर खरेंच. परंतु राष्ट्रामध्यें अशी एक शक्ति असते कीं, जी आपल्या प्रगतीबरोबर वाढते आणि आपल्या अवनतीबरोबर नाहींशीहि होते. आतां समजा, राज्यांच्या पुनर्रचनेविषयींच्या भांडणांत किंवा अशाच इतर गोष्टींत ही शक्ति आपण खर्च केली. याचा अर्थ असा कीं अधिक विधायक अशा कामासाठीं जिचा उपयोग होऊं शकला असता अशी शक्ति आपण उधळून टाकली. आतां नियोजन आणि विकास रोखून धरणारा हाहि एक अनिश्चित घटक आहे.

प्र. मी मुंबईचा रहिवासी आहें. तिथें भाषावार वांटणीच्या आणि पुनर्वांटणीच्या चळवळींत इतर सर्व कामें स्थगित झालीं आहेत. त्यामुळें आपल्या या बोलण्यांतलें मर्म माझ्या चांगलें ध्यानांत आलें.

उ. असे कांहीं घटक आपल्या मार्गांत अडथळे आणतात. ते अटळ आहेत. तरीहि स्थूलमानानें पाहातां औद्योगिक विकासाचें नियोजन हें गणितांतील सूत्रासारखें असतें हें बहुतेकांना मान्य होणारें आहे. गंमत अशी कीं अमेरिका आणि रशिया या दोहोंचेहि तज्ञ ही गोष्ट मान्य करतात. एखादा रशियन नियोजनतज्ञ इथें येतो, आमच्या प्रकल्पांची पाहाणी करतो आणि आम्हांला सल्ला देतो, त्यावेळीं त्यानें काढलेले निष्कर्ष हे इतर तज्ञांच्या—अमेरिकन तज्ञांच्याहि निष्कर्षांशीं किती जुळतात, हें पाहून मोठा चमत्कार वाटतो. दोन अगदीं वेगळ्या आणि परस्परविरोधी अशा राजकीय व आर्थिक पद्धतींचे प्रतिनिधि असलेले नियोजनकार अशा तऱ्हेनें एक मत प्रदर्शित करतांना ज्या ज्या वेळीं पाहातों, त्यात्या वेळीं मला आश्चर्य वाटतें. हीं माणसें शास्त्रज्ञ आहेत, तज्ञ आहेत, नियोजनकार आहेत. आमच्यापुढील प्रश्नांकडे ते केवळ शुद्ध वैज्ञानिक दृष्टीनें पाहातात. एकदां त्यांनीं ही दृष्टि स्वीकारली म्हणजे ते आपल्या ध्येयप्रणालि वगैरे विसरतात; औद्योगीकरण, विकास इत्यादि गोष्टींच्या पूर्वतयारीच्या अमूक इतक्या गोष्टी गृहीत धरल्या, म्हणजे अशा अशा तऱ्हेचे त्यांचे परिणाम निसर्गक्रमानेंच अचूकपणें दिसूं लागतील याबद्दल त्यांचें एकमत होतें. अर्थात् मी येथें शास्त्रविहीन दृष्टिकोणाच्या लोकांबद्दल बोलत नाहीं आहें. खासगी उद्योगधंदे व तशाच इतर गोष्टींबद्दल

बोलत रहाणारा अमेरिकन उद्योगपति, किंवा कम्युनिस्ट अगर मार्क्सवादी उपाययोजना लादूं पहाणारा रशियन राजकारणी हीं अशा दृष्टिकोनाचीं उदाहरणें आहेत. ते नेहमी असेंच वागतात. पण तोच एखादा शास्त्रज्ञ किंवा तंत्रशास्त्रज्ञ—मग तो अमेरिकन असो किंवा रशियन असो—देशांत येऊं दे, त्याचे निष्कर्ष सारखेच असतात. नियोजन आणि विकास हे गणिताचे विषय झाले आहेत, हें त्याचें अगदीं साधेंसोपें कारण आहे.

अर्थात, या गणिताच्या किंवा नियोजनाच्या पाठीमागें सामाजिक आणि इतर समस्या नेहमीच असतात. शेतकी हा विषय घेतला, तर सहकारी शेती, तिचा इष्ट प्रकार इत्यादींविषयीं वाद निर्माण होतात. हे प्रश्न असणारच. विशेषतः औद्योगिक क्षेत्रापेक्षां शेतींत अधिक असतात. नंतर लोकसंख्येसारखे आणखी कांहीं प्रश्न आहेत. अमेरिकन किंवा रशियन लोकांसमोर हा प्रश्न कधींच उभा राहिला नव्हता. सोविएत युनियनचा आकार भारताच्या आठपट आहे; लोकसंख्या मात्र आमच्या लोकसंख्येच्या निम्म्यानें आहे. म्हणजे जमीन व लोकसंख्या यांच्या प्रमाणांत 'सोळास एक' असा फरक आहे. अशा तऱ्हेनें असे कांहीं घटक आमच्या अडचणी वाढवतात तर कांही त्या कमी करतात.

थोडक्यांत, आपण जेव्हां समाजवादाविषयीं बोलतों, तेव्हां त्यांतला एक दृष्टिकोण शास्त्रविहीन असतो. वाढणाऱ्या, विकसित होणाऱ्या माणसांबद्दलचा तो मानवतावादी दृष्टिकोण असतो. समाजवादाविषयींच्या शास्त्रीय दृष्टिकोणाविषयीं मात्र मतभेद फारसा उद्भवत नाहीं. लोकांच्या, प्रगति करण्याच्या हिंमतीचा प्रश्न सोडला, तर औद्योगीकरण ही एक विज्ञानाच्या क्षेत्रांतली घटना बनली आहे, हें अनुभवानें आपल्या ध्यानांत आलें आहे.

प्र. आपण औद्योगिक विभाग आणि शेती विभाग यांच्यांत फरक करीत आहांत, असें दिसतें. औद्योगिक क्षेत्राला जें सूत्र—आपल्या शब्दांप्रमाणें गणिती सूत्र लागू पडतें, तेंच यांत्रिक शेतीलाहि लागू पडणार नाहीं काय? आपल्या सुरतगड येथें यांत्रिक पद्धतीची विविध कार्यकारी शेतीवाडी आहे. आपल्या मर्यादित क्षेत्रांत सुरतगडनें नेहमीपेक्षां किती तरी अधिक शेती-उत्पादन

काढून दाखविलें आहे. आतां समजा, अशा सुरतगडसारख्या शंभर शेतवाड्या आपण उभारल्या, तर सुरतगडसारखें वाढीव उत्पन्न शंभरपटीनें काढतां येईल आणि त्यामुळें पिकाची तूट बऱ्याच प्रमाणांत भरून निघेल, नाहीं काय?

उ. होयहि आणि नाहींहि. शंभर सुरतगड प्रकल्प शंभरपटीनें पीक देतील हें क्रमप्राप्तच आहे. पण ग्रामीण भारताचा विचार करतांना त्यांतल्या अफाट मानवी घटकाचाहि विचार केलाच पाहिजे हें आपण विसरत आहांत. आमच्याजवळ मनुष्यबळ कमी नाहीं. मनुष्यबळ हेंच आमचें सर्वांत मोठें यंत्र आहे, सर्वांत मोठी तरफ—किंवा त्याला आपण काय म्हणाल तें—आहे. गांधीजी आम्हांला एक गोष्ट सतत कटाक्षानें बजावून सांगत असत. 'तुम्ही यंत्राबद्दल बोलतां. ठीक.' ते म्हणत, 'मी यंत्राच्या विरुद्ध नाहीं. पण भारतांत तीस कोट यंत्रें आहेत. त्यांचा उपयोग आपण कां करूं नये? हीं यंत्रें म्हणजे काम करणारीं माणसें. मेहनत करण्याची अमाप ताकत असणारे किसान.'

आपल्याला दर माणशीं किंवा दर शंभर किंवा हजार माणसांगणिक अधिक चांगलीं यंत्रें कदाचित् मिळतील. पण त्याबरोबर तीस कोट, किंवा वीस किंवा दहा कोट यंत्रें आपण वाया घालवूं. बरें हीं नुसतीं निर्जीव यंत्रें नाहींत, त्यांना पोटाला घालावें लागतें, आणि त्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करायची असते. तेव्हां मानवी व्यक्तींना सर्जनशील व उत्पादनक्षम कसें करायचें, हा प्रश्न सोडवण्याचें साधन हातीं येत नाहींच. मुख्य मुद्यावर यायचें, तर येथें एक अडचण ध्यानांत येते. सबंध देशांत सुरतगडसारखीं यंत्र-चालित शेतीचीं केंद्रें उघडलीं, तर शेतांवरच्या कोट्यवधि कामकरी माणसांचें काय करायचें?

प्र. शेती ही सगळीच यांत्रिक केली पाहिजे असें नाहीं. पण जादा शेतमजुरांना—विशेषतः स्वतःची जमीन नसलेल्या शेतमजुरांना सामावून घेणाऱ्या सरकारी शेतवाड्या उभारतां येतील. आपण ज्यांना मानवी यंत्रें म्हणतां तीं तर उपलब्ध आहेतच; परंतु आपण त्यांना कामाला लावूं शकलेले नाहीं; आपल्या योजनेंत सामावून घेऊं शकलेले नाहीं.

उ. पण शेतींत आज कितीतरी अधिक शेतमजूर मुळांतच आहेत.

प्र. शक्य आहे. पण शेतींतली परिस्थिति अक्षरशः भयानक आहे. डयूमाँचे कांहीं निष्कर्ष आपल्याला पटले नसतील. पण या विशिष्ट बाबतींत माझ्या स्वतःच्या वार्ताहरांनीं देशभर फिरून अभ्यासूपणें जमवलेली माहिती त्या निष्कर्षांशीं जुळणारी आहे. कांहीं ठिकाणीं स्वतःची जमीन नसलेल्या शेतमजुरांना दरमहा चार ते पांच रुपये मिळतात. मोठाल्या सरकारी शेती-केंद्रांमध्यें या मजुरांना योग्य तऱ्हेनें सामावून घेतां येणार नाहीं काय ?

उ. तसें करतां येईल हें खरें; परंतु आज भारतांतल्या शेतीची—खाजगी शेतीची परिस्थिति अशी आहे कीं प्रत्येक शेतावर जमिनीच्या गरजेपेक्षां जास्त माणसें कामाला आहेत! गेलीं सुमारें दीडशें वर्षें भारताला दारिद्र्य येत गेलें. तें याच जादा लोकसंख्येमुळें. औद्योगिक विभागाइतक्या वेगानें वाढणारी किसान लोकसंख्या हा आमच्यापुढला प्रश्न आहे. युरोपमध्यें ही प्रक्रिया अगदीं उलट बाजूनें घडली. चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी यांच्यासारख्या देशांना त्वरेनें देशाचें औद्योगीकरण करायचें होतें; या उद्योगाला ते अशा कांहीं वेगानें लागले कीं त्यामुळें शेतीविभागाला फार हानि पोहोंचली. कारण शेती करण्यासाठीं त्यांच्याजवळ पुरेसें मनुष्यबळच नव्हतें. आतां ते औद्योगिक आणि शेतकी या दोन विभागांमध्यें तोल निर्माण करायचा प्रयत्न करताहेत. उलट आपल्याकडे मनुष्यबळ वाजवीपेक्षां जास्त आहे. शेतीवाडीवरची प्रचंड आणि शिवाय सतत वाढत असलेली जनता हा आपल्यापुढला प्रश्न आहे. ही जादा लोकसंख्या आपल्याला शेतकीकडून औद्योगिक विभागाकडे न्यायची आहे.

शेतीच्या यांत्रिकीकरणाचे दोन विभाग पाडतां येतील. श्रम कमी करून उत्पादन वाढवण्यासाठीं अधिक चांगलीं अवजारें, सुधारलेले नांगर आणि सुधारलेली साधनसामग्री यांचा उपयोग होतो. परंतु फार मोठालीं यंत्रें शेती-पद्धतींत आणलीं, म्हणजे शेतमजुरांना रिकामें बसायची पाळी येते. शेतमजुरांच्या बेकारीमुळें उत्पादन न वाढतां सामाजिक प्रश्न मात्र निर्माण होतात. चांगलीं अवजारें पाहिजेतच, पण प्रचंड यंत्रसामुग्रीचा मात्र आपल्याला उपयोग नाहीं. सोविएत युनियन किंवा अमेरिका या देशांमध्यें शेतजमीन अफाट आहे, पण

लोकसंख्या मर्यादित आहे. अशा देशांमध्यें मोठीं यंत्रें अत्यावश्यक आहेत. आमच्या देशांतला प्रश्न वेगळा आहे. आपल्याकडेही मोठीं यंत्रें येतील. आपण सुरतगडचा उल्लेख केलात. आम्हाला सुरतगडसारखीं आणखी कांहीं केंद्रें पाहिजे आहेत, आणि लवकरच आम्ही तीं उभारणार आहोंत. जेथें लोक-संख्येचें प्रमाण कमी आहे, अशा राजस्थानसारख्या भागांमध्यें सुरतगड पद्धतीच्या यांत्रिक शेतीला योग्य ती परिस्थिति आहे. पण तेथें सर्वांत महत्त्वाची गोष्ट पाणीपुरवठा ही आहे. भाक्डाहून व इतर कांहीं ठिकाणांहून होणारा पाणीपुरवठा येत्या कांहीं वर्षांमध्यें बहुधा वाढेल आणि अशा मोठाल्या शेतीवाड्या उभ्या करण्याचें काम पूर्ण होईल. पण आम्हाला या मोठ्या शेतीकेंद्राचा उपयोग मुख्यतः दोन बाजूंनीं महत्त्वाचा वाटतो. तांत्रिक प्रयोगांना तेथें संधि मिळते. दुसरें, गरज पडेल तेव्हां इतरांना धान्यपुरवठा या केंद्रांमधल्या राखीव साठ्यामधून करतां येईल. जपानमध्यें छोटीं शेतें शेतकरी कसतात; तरीहि साऱ्या जगांत आज सर्वांत अधिक प्रमाणांत शेतीउत्पादन जपानमध्येंच होतें. आम्हाला जपानचें वळण शक्य तितकें गिरवायचें आहे. अर्थात् सुरतगड पद्धतीची यांत्रिक शेतीहि आम्ही त्याज्य समजत नाहींच.

प्र.　तर मग आपला शेतीविषयक मूलभूत दृष्टिकोण काय आहे ?

उ.　सहकारी सेवा संघांमधील बिगरजमीनधारक शेतकऱ्यांना खासगी शेती करणाऱ्या जमीनमालकांचें सहकार्य मिळावें अशी अपेक्षा आहे. संयुक्त शेतीचा आदर्श आम्हाला मान्य आहे. पण लोकांची मान्यता इत्यादि अनेक घटकांवर तें अवलंबून आहे. या बाबतींत आम्हाला कोणावर सक्ति करावयाची नाहीं किंवा काटेकोर आग्रही दृष्टिकोण स्वीकारायचा नाही.

·५·

# भारत कुठल्या दिशेनें जाणार ?

प्र. पंतप्रधान महाशय, स्वातंत्र्याच्या दहा वर्षांतील आपल्या यशापयशाच्या संदर्भात आपण औद्योगिक व शेती विभागांचें जवळजवळ संपूर्ण सिंहावलोकन केलें. आतां आपल्यापुढील साध्य आणि साधनें यांचा थोडक्यांत आढावा आपण घ्यावा असें मी सुचवूं काय? पहिल्या प्रथम, आपलीं उद्दिष्टें कोणतीं आहेत? कोणत्या गोष्टी साध्य करण्याच्या हेतूनें आपण कार्यप्रवृत्त झालों आहोंत?

उ. उत्पादनवाढ करणें आणि आमच्या लोकांना उत्तरोत्तर अधिक कामधंदा मिळवून देणें हें मुख्य उद्दिष्ट आहे. वाढीव उत्पादन, वाढीव उत्पन्न, राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्नांत वाढ, आणि स्वावलंबी व स्वयंविकासी अर्थव्यवस्था या गोष्टी ज्यांत आहेत, असें औद्योगिक राष्ट्र आपल्याला बनायचें आहे. दारिद्र्याची फळी फोडून आम्हाला पलीकडे जायचें आहे; आमच्या कोट्यवधि जनतेच्या उंबरठ्यांत अधिक सुखसमाधान, अधिक संपन्नता आणि उन्नत जीवन आणायचें आहे; आणि त्याचबरोबर भारतीय समाजाची घडी अधिक समानतेच्या पायावर बसवायची आहे. आपल्या शब्दांत सांगायचें तर, या गोष्टी आम्हाला मुख्यतः साध्य करायच्या आहेत. नियोजित व सहकारी अर्थव्यवस्थेवर आधारलेल्या समाजवादाचें ध्येय आम्ही अंगिकारलें आहे. समाजवाद ही संज्ञा कुठल्याहि काटेकोर आग्रही किंवा पोथीनिष्ठ अर्थानें आम्ही वापरीत नाहीं. कांहींसा लवचिक आणि व्यवहारवादी स्वरूपाचा हा समाजवाद आहे. वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन्ही दृष्टींनीं मानवी व्यक्तीला पूर्ण, सुनिबद्ध व्यक्तित्वाचें स्वरूप व गुणवत्ता यांचा लाभ घडवण्याचें आमचें ध्येय आहे, असें म्हणतां येईल.

प्र. आपल्या राष्ट्रीय ध्येयाचें चित्र आपण फार चांगलें रेखाटलें. आतां आपल्याविषयीं एक व्यक्तिगत प्रश्न. आपल्याला कोणी 'सोशलिस्ट'—समाजवादी—म्हटलें तर आपल्याला अवघडल्यासारखें होतें काय ?

उ. मुळींच नाहीं. समाजवादावरील माझी श्रद्धा गेल्या पन्नास वर्षांपासूनची आहे. विरुद्ध मत मला कोणी पटवून दिलें तर प्रश्न निराळा. पण तोंपर्यंत मी समाजवादावर श्रद्धा ठेवणार आणि त्यासाठीं कामहि करीत राहाणार. मी समाजवादी आहें किंवा आमचीं उद्दिष्टें समाजवादी आहेत याबद्दल मला मुळींच अवघडल्यासारखें होत नाहीं. हें तर कुठल्याहि सर्वसाधारण समज असलेल्या राष्ट्राचें, समाजाचें किंवा व्यक्तीचें ध्येय असलें पाहिजे. जगांतील आधुनिक विचारप्रवाह समाजवादाच्या दिशेनें चाललेला आहे आणि समकालीन प्रवाहाशीं ज्यांचा संबंध मुळींच राहिलेला नाहीं अशांचीच कांही वेगळी समजूत आहे. त्याचबरोबर कुठल्याही धर्माचा किंवा तत्त्वज्ञानाचा विशिष्ट पंथ अंधपणें स्वीकारणें हें जसें माझ्या स्वभावांत नाहीं तसेंच समाजवादाचा कुठला तरी विशिष्ट सांचा अंगीकारणें मला मान्य नाहीं. समाजवादानें—आमच्या किंवा दुसऱ्या कोणाच्याही समाजवादानें—कोणतें स्वरूप धारण करावें याबद्दलचा पोथीनिष्ठ आग्रह मी कधींच धरीत नाहीं, तो यामुळेंच. समाजांत फार मोठी विषमता असूं नये; अशा बऱ्याचशा समानतापूर्ण समाजांत प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी; निदान संधि मिळण्याच्या बाबतींत तरी विषमता असूं नये या गोष्टीला खरें महत्त्व आहे. श्रीमंतांच्या घरची वैभवशाली उधळपट्टी आणि गरिबांघरचें अठराविश्वे दारिद्र्य या दोन्ही गोष्टी सारख्याच विरूप आणि अवनतिकारक आहेत. आणि या दोन्ही गोष्टी नाहींशा करण्याची माझी इच्छा आहे.

प्र. अगदीं बरोबर. आत्तांच आपण आपल्यापुढील ध्येयांची जवळजवळ संपूर्ण मांडणी केलीत. आतां आपला साधनाविषयींचा दृष्टिकोण आपण मांडाल काय ? आपण त्याला कायद्याच्या मार्गानें क्रांति म्हणाल काय ?

उ. आम्हीं संसदीय लोकशाहीचा मार्ग पसंत केला आहे तो अशासाठीं कीं, दीर्घकालीन दृष्टीनें हा मार्ग सर्वांत अधिक हितप्रद ठरतो. साधनें हीं योग्य

आणि शिव असलीं पाहिजेत असें आम्हाला वाटतें हें खरें असलें तरी अखेर साध्य हेंही महत्त्वाचें असतेंच.

प्र. आम्हाला निधर्मी, समाजवादी आणि सहकारी समाजव्यवस्था स्थापन करायची आहे; ती आर्थिक नियोजनाच्या आणि संसदीय क्रांतीच्या मार्गानें साध्य करावयाची आहे आणि हें उद्दिष्ट साध्य करण्याचा सगळ्यांत चांगला उपाय म्हणून संसदीय लोकशाहीचें साधन वापरावयाचें आहे—अशा शब्दांत मीं आपल्या देशापुढील ध्येय मांडलें तर तें बरोबर ठरेल काय?

उ. : स्थूल मानानें तें बरोबर आहे.

प्र. : आपण आपलें साध्य आणि साधनें याविषयीं पुरेशी चर्चा केली आहे. या दोहोंच्या संदर्भात आपल्या—म्हणजेच राष्ट्राच्या दृष्टिकोणाच्या पायाशुद्धपणाबद्दल कोणी आरोप घेणार नाहीं. परंतु आजच्या काळांत जगांत जे सर्वांत भव्य असे ध्येयविषयक प्रयोग चालू आहेत त्यामध्यें गणला जाणारा हा प्रयोग यशस्वी करण्यासाठीं आपल्याजवळ असलेल्या सामग्रीबद्दल किंवा यंत्रणेबद्दल मात्र अनेकांच्या मनांत शंका आहे. आपलें पुरोगामी तत्त्वज्ञान प्रत्यक्षांत येण्याची खात्री वाटावी यासाठीं आपण कोणत्या तऱ्हेची संघटना आपल्या मागें देशांत ठेवूं इच्छितां?

उ. या प्रश्नाचें उत्तर देणें मला कठीण वाटतें. आपण ज्याला सामग्री किंवा यंत्रणा म्हणतां तें आपल्याला कॉंग्रेस पक्ष, संसदीय लोकशाही यांमध्यें, इतकेंच काय पण आपल्या जनतेंत किंवा एकंदर राष्ट्रांत दिसतेंच. कॉंग्रेस चळवळीचा सारा इतिहास पाहिला तर तिच्यांतला मुख्य ओघ हा अधिकाधिक पुरोगामी आणि लोकशाही अशा मतप्रणालीकडे नेहमींच वाहात असलेला दिसतो. ही दिशा बदलण्याचे, इतकेंच काय, पण पूर्णपणें उलट्या दिशेकडे ही संघटना वळवण्याचे प्रयत्न झाले आहेत. पण अखेर प्रतिगामी व जीर्णमतवादी गटांबरोबरच्या संघर्षांत अखेर प्रगतिवादी मतप्रवाह नेहमींच विजयी झाला आहे. मी एखादा गट किंवा तत्सम कांहीं तरी संघटित करावें, असें जर आपल्याला सूचित करायचें असेल, तर अशा तऱ्हेच्या कोणत्याहि सूचनेला माझा विरोध

आहे. अशा गटाचा दृष्टिकोण फुटीर व पंथनिष्ठ बनत जातो. धर्म, राजकारण इत्यादि सर्व क्षेत्रांत फुटीर पंथ असण्याची भारताची जुनी परंपरा आहे. आजहि भारतांतली प्रवृत्ति अशी दिसते कीं असा एखादा गट निर्माण झाला, कीं लगलीच त्याला विरोधी असा आणखीं एक गट उभा राहातो. ही प्रक्रिया अशीच पुढेंहि चालू राहते. प्रथम सुधारणावादी संत कबीर निर्माण होतो आणि कबीर गेल्यावर कबीर पंथ वाढूं लागतो. शेवटीं सगळी संघर्ष-प्रतिसंघर्षांची बजबजपुरी माजते आणि राष्ट्राची शक्ति केवळ वाया जाते.

प्र. माझ्या प्रश्नाविषयीं आपण कांही तरी गैरसमज झाल्यासारखा दिसतो. आम्ही ज्याला नेहरूमार्ग किंवा भारतीय मार्ग म्हणतों, त्याच्यासाठीं एखादी कार्यकर्त्यांची फळी आपण उभी केली नाहीं, आपल्या ध्येयाशीं व ध्येयवादाशीं एकरूप झालेला राजकीय पक्ष निर्माण करण्याची जरुरी आपल्याला कधींच भासली नाहीं, ही आपल्या कारकीर्दीतली सर्वांत मोठी उणीव आहे असें मला सुचवायचें आहे. आपल्या महान् प्रयोगाची अंमलबजावणी व वारसा या गोष्टी आपल्या ध्येयांवर विश्वास नसलेल्या लोकांकडे आपण सोंपवल्या आहेत; स्वतःच्याच तत्त्वज्ञानाला आपण निष्फळतेचा शाप दिला आहे ऐतिहासिक दृष्टया अपरिहार्य अशा कर्तव्यांत आपल्या हातून कसूर होत आहे असाच याचा अर्थ नव्हे काय ?

उ. : हा माझा दोष असणें अगदीं शक्य आहे. कांहीं झालें तरी प्रत्येकाला स्वतःच्या आवाक्यांत राहूनच काम करतां येतें. मात्र असा एखादा गट किंवा दल उभारण्याच्या विचाराला मी मनांत कधींच थारा दिलेला नाहीं. माझ्या ध्येयांशीं एकरूप झालेला राजकीय पक्ष मला नको आहे, असा त्याचा अर्थ नव्हे. एखादा राजकीय पक्ष माझ्या आदर्शांनीं प्रेरित झालेला मला खचित आवडेल. स्थूलमानानें पाहिलें तर कॅंग्रेस हा असा एक राजकीय पक्ष आहे. कांहीं बाबतींत थोडेफार मतभेद असतील, पण लोकशाही तत्त्वावर उभारलेल्या पक्षांत ते असणारच. पण नेहरूंच्या किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या तत्त्वज्ञानानें नव्हे, तर ज्याला मूलतः भारतीय म्हणतां येईल अशा स्वरूपाच्या दृष्टिकोनानें हा पक्ष प्रेरित झाला आहे, असें एकंदरीनें मला वाटतें. हा भारतीय

दृष्टिकोन आधुनिक आहे, शास्त्रीय, म्हणजेच समाजवादी आहे. आधुनिक जगांत फक्त हाच दृष्टिकोन परिणामकारक होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय ध्येयप्रणालीनें हा पक्ष प्रेरित होणें अपरिहार्यच आहे. कारण तो या राष्ट्राचा एक भाग आहे. तो त्याच्याकडे पाठ कशी फिरवूं शकेल?

प्र. हें सर्व मी मान्य करतों. पण ध्येयप्रणाली म्हणून नेहरू-मार्गांचा स्वीकार करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी आहे कुठें? राष्ट्रांतील तरुण राष्ट्रीय ध्येयप्रणालीशीं बांधले कां गेले नाहींत? विद्यार्थी, मध्यमवर्ग आणि खेडुत वर्ग यांच्या वैफल्यभावनेचा फायदा घेऊन त्यांना नेहरू आणि कॉंग्रेस यांच्यापासून दूर नेण्यास स्वतंत्र पक्षासारख्या गटांनीं सुरुवात केली आहे, त्याचें काय? कुठें तरी कांहीं तरी चुकतें आहे खास!

उ. आपण नेहरू-तत्त्व ही संज्ञा बाजूस ठेवून त्याचा उल्लेख राष्ट्रीय ध्येयप्रणाली या नांवानें करूं या. ही प्रणाली कांहीं केवळ या किंवा त्या पक्षाच्या आधारानें उभी नाहीं. भारतीय जनता आणि या जनतेच्या इच्छा-आकांक्षा यांच्या खंबीर पायावर उभी आहे. आपण स्वतंत्र पक्षाचा उल्लेख केलात; या स्वतंत्र पक्षानें आमच्या दृष्टिकोनाशीं पूर्णपणें विरोधी असें तत्त्वज्ञान देशासमोर मांडलें आहे—अर्थात् त्याला तत्त्वज्ञान म्हणायचें कीं काय हें आपण ठरवा.

प्र. प्रतिक्रांतीचें तत्त्वज्ञान?

उ. त्याला आपण प्रतिक्रांतीचें म्हणूं तत्त्वज्ञान शकतां. आमच्या धोरणाच्या अंतर्गत आणि परराष्ट्रीय अशा दोन्ही बाजूंवर त्याचा रोख आहे. मी तर असें म्हणेन की हें नवें तत्त्वज्ञान सरळसरळ भूतकाळाकडे मोहरा फिरवणारें आहे. वेगवेगळे प्रश्न, अडचणी आणि वैफल्यभावना यांचा फायदा घेऊन ते राष्ट्राचा पाया खिळखिळा करायचा प्रयत्न करतील असा संभव आहे. ही एक मनःप्रवृत्ति आहे. अशा मनःप्रवृत्तीमधून फॅसिस्ट पद्धतीचें राज्य उदयाला येणें शक्य असतें. हा शब्द वापरतांना मला बरें वाटत नाहीं; पण भारतासारख्या मोठ्या देशांत फॅसिझमकडे कल असणारे कांहीं घटक असणारच. एकीकडे 'धर्म', 'धर्म' अशी ओरड करून ते विधायक स्वरूपाच्या आर्थिक धोरणांचें आणि राजकीय

वादविषयांचें स्वरूप धूसर करण्याचा मुद्दाम प्रयत्न करतात आणि दुसरीकडे 'लांचबाजी', 'वशिलेबाजी' असा आरडाओरडा सुरू ठेवतात. याच्या मागचें कारण? कारण असें कीं धर्माच्या गोष्टी सांगतांना तर्कनिष्ठ मुद्दे आवश्यक नसतात. धर्म हा चांगला,—पण कोठपर्यंत? बुद्धिवादी किंवा शास्त्रीय दृष्टिकोणाशीं त्याचा विरोध येत नाहीं तेथपर्यंत. पण असा विरोध हेंच तर स्वतंत्र पक्षाच्या सद्गृहस्थांचें उद्दिष्ट आहे! लांचलुचपतीचे आरोप घ्या. लांचलुचलुचपतीवर हल्ला करण्यासाठींहि वैचारिक युक्तिवाद करावा लागत नाहीं. याचें कारण साधें आहे. लांचलुचपत त्याज्य आहे, आणि आपण ती नाहींशी केली पाहिजे, हें कोणालाच अमान्य असणें शक्य नाहीं! आपल्या राजकीय दृष्टिकोणांत किंवा आर्थिक कार्यक्रमांत असलेली उणीव लांचलुचपतीबद्दल 'लांडगा आला रे आला' अशा थाटांत ओरडून भरून काढायचा हा स्वतंत्र पक्षाचा प्रयत्न आहे.

पण, भारतांतली सर्वसाधारण जनता चाणाक्ष, समंजस आणि बुद्धिवादी आहे. तुम्ही त्यांच्या समोर गेलांत, तर ते तुम्हाला अशा मुद्यांवर बोलायला लावतील कीं ज्यांत कांही हंशील आहे. उदाहरणार्थ, राजकारण, अर्थकारण वगैरे. अशा तऱ्हेच्या तत्त्वज्ञानाचा ज्यांच्याजवळ खडखडाट आहे, ते जनतेपासून दुरावतात; बाजूला पडतात. कांहीं बड्या शेतमालकांना ते आकर्षित करतील, आपण म्हणालांत त्याप्रमाणें मध्यम वर्गाच्या आणि विद्यार्थ्यांच्या वैफल्यभावनेचा फायदा घेतील,—पण आणखी ते काय करूं शकणार? तेव्हां स्वतःचे नाकर्तेपण लपवण्यासाठीं ते लांचलुचपतीबद्दल ओरडूं लागतात. आपल्या संघटनेला जे 'पक्ष' म्हणवतात, पण ज्यांना ध्येयप्रणाली अशी कांहीं नाहीं अशा लोकांनीं असा पवित्रा घ्यावा, हें केवढें आश्चर्य! लांचलुचपत सापडली, तर जरूर सर्व उपायांनीं तिचा पाठपुरावा करा; तिच्याबद्दल संबंधित व्यक्तींना शासन मिळूं द्या; ती नष्ट करा. पण लोक जेव्हां लांचलुचपतीबद्दल नुसताच संदिग्ध आणि नकारात्मक आरडाओरडा करूं लागतात, तेव्हा नष्ट करायला किंवा शासन करायला हातीं काय लागतें?

प्र. स्वतंत्र पक्षाचा प्रचार बाजूला ठेवला, तरी, कांहीं वरिष्ठ पदांवर काम करणाऱ्या लोकांमधील लांचलुचपतीच्या भयंकर प्रकरणांची मात्र कडक चौकशी

झाली पाहिजे, असें मला वाटतें. अशा कांहीं प्रकरणांच्या चौकशीचा धडा घालून दिला पाहिजे. अशा गोष्टींकडे आपण कडक नजरेनें पाहातां असें लोकांना दिसूं द्या, म्हणजे त्यांचें समाधान होईल. लांचलुचपतीची अशी धडा घालून देणारी चौकशी व कडक शासन यांची मागणी जनता करीत आहे.

उ. जेव्हां प्रत्यक्ष प्रकरणें आमच्याकडे येतात, तेव्हां आम्हीं त्यांची चौकशी करतोंच. अशा प्रकरणांत इतरांना धडा घालून देणारें शासन जरूर मिळूं दे. आपण अशीं प्रकरणें आमच्याकडे आणलीं तर त्यांची योग्य दखल आम्हाला घ्यायची आहेच. लोकांनीं न्यायासाठीं झगडावें आणि तो मिळेपर्यंत थांबू नये अशीच माझी अपेक्षा आहे. हें सारें मला कळूं शकतें. पण घराच्या छपरावर उभें राहून 'सगळे लांचखोर आहेत' असा नुसता ओरडा केला म्हणजे लांच-खोरीचें वातावरण मात्र निर्माण होतें. साऱ्या हवेंतच लांचखोरी भरली आहे असें लोकांना वाटूं लागतें आणि ते स्वतःच तें करूं लागघात. रस्त्यांतून चाल-णारा सर्वसामान्य माणूस मनाशीं म्हणूं लागतो, "सगळेच लोक लांचखोरी करताहेत असें दिसतें; मग मीहि तसेंच कां करूं नये ?" अशी हवा निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत, त्यांना आळा घालणें आवश्यक आहे.

जो लांचलुचपतीविरुद्ध सर्वांत मोठ्यानें ओरडतो, तो स्वतः लाचखोर असण्याचाहि धोकादायक प्रकार संभवनीय असतो. एखाद्या चोराप्रमाणें तो स्वतःच "पकडा ! पकडा ! चोर ! चोर !" असें ओरडून स्वतःला बचावूं पाहातो. जेव्हां सगळेच जण लांचखोरीबद्दल आरडाओरड करूं लागतात, तेव्हां त्यांतला खरा कोण आणि खोटा कोण हेंच कळेनासें होतें. भारतांतल्या रोगटपणाचें हें चिन्ह आहे. आपल्या राजकीय विचारामधला फक्त पोरकट-पणाच त्यांतून दिसून येतो.

प्र. लांचलुचपतीचे प्रकार आणि त्यांबद्दल बेजबाबदार बोलणें या दोन्ही गोष्टी लोकशाहीमधील अंगभूत दुर्बलतेच्या निदर्शक मानणें बरोबर ठरेल काय ?

उ. मानवी स्वभावांतील दुर्बलता हीच लोकशाहींतील दुर्बलता असते. मानवतेमधील सगळ्या गुणांचें आणि दोषांचे प्रतिबिंब लोकशाहीमध्यें पडत

असतें. आपण या गोष्टींना दुर्बलता म्हणा, पण अखेरीस दीर्घ कालानें अशाच गोष्टी लोकशाहीला चिरंतन, अविनाशी असें सामर्थ्य देत असतात. प्रतिगामी-पणाला विरोधी अशा आमच्या धोरणाचें सातत्य खात्रीपूर्वक टिकवणारी ही एकच गोष्ट आहे. केवळ आपण आणीबाणीच्या काळांतून जात आहोंत या किंवा अशा कारणासाठीं आपली लोकशाहीविषयींची भूमिका बदलणें योग्यहि नाहीं आणि इष्टहि नाहीं. उलट आपल्याकडील लोकशाही संस्था-संघटनांना अधिक कार्यक्षम आणि सुव्यवस्थित स्वरूप देणें आणि कोणत्याहि नव्या आव्हानाला तोंड देण्यास त्यांना समर्थ बनवणें हेंच आज आपलें कर्तव्य आहे. या प्रश्नाकडे आम्ही दक्षतेनें आणि आस्थेनें लक्ष पुरवीत आहोंत.

प्र. स्वतंत्र पक्षानें कॉंग्रेसला दिलेल्या आव्हानाकडे पुन्हा वळूं या. अशा प्रतिगामी प्रवृत्तीच्या पक्षाचा उदय झाल्यामुळें देशांतल्या उजव्या व डाव्या विचारप्रणालींमधली गुंतागुंत नाहींशी होईल आणि हे गट आपापल्या बाजूंना नीट केंद्रीभूत होतील; या घटनेमुळें कॉंग्रेसला समाजवादाकडे अधिक निश्चितपणें झुकणें भाग पडेल—या मताबद्दल आपल्याला काय वाटतें ?

उ. 'डावे' व 'उजवे' या संज्ञांच्या साहाय्यानें विचार करणें मला मानवत नाहीं. आपल्या मनांत आहे तसली प्रक्रिया घडावयाची ती या नव्या गट-विभागणीमुळें घडेल असें मात्र मला वाटत नाहीं. समाजवादाकडे झुकणारा कल हा कॉंग्रेसमध्यें अंगभूतच आहे. कॉंग्रेसमध्यें मुख्यतः दोन प्रवाह नेहमींच राहात आले आहेत. त्यांतला एक हा अटळपणें समाजवादाच्या दिशेनें वहाणारा आहे. हा कॉंग्रेसमधला मूल प्रवाह. दुसरा प्रवाह हा छोट्याछोट्या, वरवरच्या प्रवृत्तींचा बनला आहे. कधीं तो पुढें सरत असतो तर कधीं मागें जात असतो. या प्रवृत्ति परिणामकारक स्वरूपाच्या नाहींत. पक्षाच्या गति-तत्त्वाचें पोषण होतें तें त्या मूलभूत प्रवाहाकडून. हें गतितत्त्व मूलभूत आणि वरवरच्या अशा दोन्ही प्रवाहांना पुरोगामी दिशेनें पुढें पुढें खेचीत आहे. १९४७ पासून घडत आहे तें हें. कांहीं वेळां पीछेहाट झाली असेल. कधींमधीं, कुठें कुठें प्रगति मंदावली असेल; परंतु एकंदरींत पाहिलें तर, पक्षाला पुढें खेचीत नेलें आहे तें मूलभूत समाजवादी प्रवाहानेंच.

प्र. नेहरूंच्या मागें नेहरुतत्त्व शाबूतपणें अस्तित्वांत राहील याबद्दल आशा-दायक खात्री आपण दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहें. माझे मुद्दे पुन्हा पुन्हा मांडीत राहिल्याबद्दल माफ करा, पण आपल्या ध्येयप्रणालीला वाहिलेल्या कार्यकर्त्यांची—आपलें अंतरंग जाणणाऱ्या तरुण कॉंग्रेस कार्यकर्त्यांचें दल उभारण्यासाठीं एखाददुसरा तास खर्च करणें आपल्याला अशक्य आहे काय? त्यांना देण्यासाठीं आपल्याजवळ वेळच नसतो, अशी त्यांची तक्रार आहे.

उ. त्यांना नक्की काय म्हणायचें आहे?

प्र. ते म्हणतात कीं आपण त्यांना हाताशीं घेत नाहीं, त्यांना उत्तेजन देत नाहीं; त्यांच्यांतल्या सुप्त गुणांना विकसित करीत नाहीं. गांधीजी हें करीत असत.

उ. होय. लोकांमधल्या सुप्त गुणांना प्रकाशांत आणण्याचे कसब गांधीजींच्या जवळ फार मोठ्या प्रमाणांत होतें. कदाचित् माझ्याजवळ तें नसेलहि. लोकांना काय वाटावें हें आपण ठरवूं शकत नाहीं. इतरांच्या मनांवर असा ताबा ठेवणें हें माझ्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. माझी पद्धति ही आम जनतेला आवाहन करण्याची, सार्वजनिक सभांमध्यें बोलण्याची किंवा कांहीं व्यक्तींच्या समूहाबरोबर चर्चा करण्याची आहे. सबंध जनतेच्या विचारांमध्यें बदल घडवणें, आणि कोठल्याहि बाबतींत अचूक अशी जनतेची प्रतिक्रिया निर्माण करणें हें मला अधिक फलप्रद वाटतें. आम जनतेमध्यें सामाजिक जाणीव निर्माण करण्यांत हा मार्ग उपयुक्त ठरला आहे असें मला वाटतें. माझा बहुतेक वेळ याच कामांत जातो. माझ्या घरीं जमलेल्या दोनशें-तीनशें मंडळींसमोर मी बोललों नाहीं, अशी एखादीच सकाळ जात असेल.

प्र. मला वाटतें, आपल्या घरीं येणाऱ्या या श्रोत्यांमध्यें बहुसंख्य शेतकरी असतील?

उ. कृषिप्रदर्शनामुळें शेतकरी बरेच असत. पण तें आतां संपलें आहे. खरें तर माझ्याकडे येणाऱ्या मंडळींत सर्व असतात. शेतकरी, कामगार, विद्यार्थी—ते तर खूपच असतात. अशी ही मंडळी दररोज येत असतात. आज सकाळीं

माझ्या घरीं तीनशें ते चारशें मंडळी येऊन गेली. ते पुष्कळ ठिकाणांहून येतात. कांहीं पंजाबांतल्या रोहटकहून येतात, कांहीं म्हैसूरहून येतात, कांहीं महाराष्ट्रांतल्या सातारा जिल्ह्यांतून येतात. त्यांतील बरेचसे लोक अनुसूचित जातींतले असतात. हे सारे येतात आणि मी शक्य तितका वेळ त्यांच्याशीं बोलतों.

प्र. आपण त्यांना कांहीं शिकवण्याचा किंवा आपल्या मतांची दीक्षा देण्याचा प्रयत्न करतां काय?

उ. नाहीं, मी त्यांना शिकवीत नाहीं किंवा त्यांना कसली दीक्षा देत नाहीं. त्यांच्या स्वतःच्या प्रश्नांबद्दल मी त्यांच्याशीं शक्य तितक्या साध्या भाषेत बोलतों. राजकीय किंवा आर्थिक विषयावरील माझीं बौद्धिकें ऐकण्यासाठीं ते येत नसतात. त्यांच्या समोरील अडचणींवर शास्त्रीय आणि बुद्धिवादी असे उपाय शोधून काढायला माझी कांहीं मदत झाली तरी तेवढ्यानें माझ्याकडून कांहीं कार्य झालें असें मला वाटतें. कदाचित् विशालतर राष्ट्रीय, इतकेंच काय परंतु सामाजिक-आर्थिक संदर्भातहि त्यांना पूर्वीपेक्षां वेगळ्या तऱ्हेनें विचार करायला लावणें मला थोडेंफार शक्य होत असेल. आतां कांहीं शेतकरी मंडळी माझ्याकडे आली तर मी त्यांच्याशीं शेतीविषयीं बोलतों. त्यांची उन्नति कशी होईल, शेतीच्या अधिक चांगल्या पद्धती कशा अंमलांत आणतां येतील, सहकारी शेतीचे आणि सहकारी सेवासंघांचे फायदे कोणते इत्यादि इत्यादि विषय आमच्या बोलण्यांत येतात. या मंडळींचे धंदेउद्योग आणि विशिष्ट प्रश्न यांच्या संदर्भात आमचे दृष्टिकोन आणि सिद्धांत कसे आवश्यक आहेत, हें त्यांना दाखवून देण्याचा प्रयत्न मी करतों. यामुळें त्यांना नवा विचार, नवी दृष्टि कळते आणि स्थूल मानानें पुरोगामी अशा दिशेकडे त्यांचे विचार आणि कृति यांचा कल झुकूं लागतो.

प्र. ही पद्धत मोठी मुत्सद्दीपणाची आहे. आपलें म्हणणें माझ्या ध्यानांत आलें आहे, असें गृहीत धरून बोलायचें तर, गट किंवा छोट्या संघटना उभारण्यापेक्षां, जनमानसाच्या विशाल राष्ट्रीय पायावर आपली सामाजिक, आर्थिक आणि राजकीय तत्त्वप्रणाली उभी करणें आपल्याला अधिक पसंत आहे, असें दिसतें. परंतु, प्रतिक्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न झाला तर तो निष्फळ ठरवण्या-

इतकी प्रगल्भता, जागृति आणि शक्ति भारतांतल्या आम जनतेजवळ आहे असें आपल्याला वाटतें काय? देशाच्या प्रगतीच्या इंजिनाचीं चाकें उलट्या दिशेनें फिरवण्याची इच्छा असलेलीं फॅसिस्ट प्रवृत्तीचीं माणसें देशांत आहेत, असें आपणच म्हटलें आहे.

उ. तसे घटक आहेत खरे—फॅसिस्ट, प्रतिक्रांतिवादी, अनेक प्रवृत्तींचे. आपल्या देशासारख्या प्रचंड देशांत ही गोष्ट टाळतां येण्यासारखी नाही. अलीकडेच बिहारमध्यें एक भव्य जत्रा भरली होती. मुसलमानांनीं गायी मारल्याची हूल जत्रेंत उठली. बातमी पूर्णपणें खोटी होती, परंतु तिच्यामुळें जातीय भावना उसळल्या आणि अनेक खेदकारक घटना घडल्या. राष्ट्रीय पातळीवरील आमच्या निधर्मी भूमिकेबद्दल आमच्या लोकांना निष्ठा आहे, असें स्थूलपणें म्हणतां येईल. पण तरीहि अशा गोष्टी घडतात. आमचा समाज—किंबहुना कुठलाहि समाज फॅसिस्ट किंवा जातीय प्रवाहांना यशस्वीपणें तोंड देण्याइतका प्रगल्भ किंवा सामर्थ्यवान् आहे कीं नाहीं, हें सांगणें फार कठीण आहे.

पण मी त्याचबरोबर असेंहि म्हणेन कीं जगांतल्या इतर कुठल्याहि लोकांपेक्षां भारतीय लोक अधिक सौम्य, मृदु स्वभावाचे आहेत. प्रकृतीनें ते शांतताप्रेमी आहेत आणि माणसांच्या बाबतींतच नव्हे, तर इतर प्राण्यांच्याहि बाबतींत ते हिंसा टाळण्याचा प्रयत्न करतात.

प्र. पण एखाद्या डांसाला सुद्धां न मारणारा मनुष्य, आपल्या प्रातिकराच्या भानगडी अधिकाऱ्यांना कळवल्याबद्दल आपल्या हिशेबनिसाला निर्घृणपणें पांचव्या मजल्यावरून खालीं फेकून देईल. अशीं प्रकरणें मला माहीत आहेत.

उ. अगदीं खरें. मी या विरोधाकडे येणारच होतों. फाळणी आणि स्वातंत्र्य यांच्या पाठोपाठ जें कांहीं घडलें त्यानें मला विलक्षण धक्का बसला. मी अगदीं चकित होऊन गेलों. दिल्ली, पंजाब आणि इतर ठिकाणीं दिसलेलें क्रौर्य, पशुत्व आणि हत्या...सर्वसाधारण, नेहमींच्या जीवनांत मृदुपणानें, सौजन्यानें वागणारे हेच ते लोक आहेत, यावर विश्वास बसत नव्हता.

प्र. हा आपल्या राष्ट्रीय चारित्र्यातलाच अंतर्विरोध आहे.

ग्रंथालय ... ११०००

उ. केवळ राष्ट्रीय चारित्र्यांतलाच नव्हे; अधिक विस्तृत व्याप्तीचा आहे तो. महायुद्ध चालू असतांना आणि त्यानंतर, जपानी लोकांनीं जे अत्याचार केल्याचें सांगितलें जात होतें, त्यामुळें मला अतिशय मोठा धक्का बसला. दोन-तीन वर्षांपूर्वी मी जपानला गेलों, त्यावेळीं ही पार्श्वभूमि मनांत होती, पण जपान्यांचा चांगुलपणा पाहून मी पुन्हा एकदां चकित झालों. ते अतिशय सौजन्यशील, सुसंस्कृत, आतिथ्यशील, कामसू आणि कलाप्रेमी आहेत. म्हणजे पहा: एकाच समाजाच्या या दोन बाजू असतात. एक चांगली आणि एक वाईट. त्यांतल्या वाईट बाजूवर माणसाला ताबाच मिळवावा लागतो आणि अशा प्रयत्नांनींच मानवजातीची प्रगति होत असते.

एकंदरींत, भारत काय किंवा दुसरें कुठलें राष्ट्र काय, तें दुष्ट, प्रतिगामी, फॅसिस्ट किंवा अशाच शक्तीपासून पूर्णपणें सुरक्षित आहे असें म्हणणें फार कठीण आहे. एखाद्या जनसमाजाच्या भौतिक प्रगतीबरोबरच, त्याच्या नैतिक चारित्र्याकडे किंवा आध्यात्मिक गुणवत्तेकडे नीट लक्ष पुरवावें लागतें तें बहुधा अशाच बाबतींत. मानवजातीला बुद्ध व गांधी यांच्यासारख्या महापुरुषांचें मोल वाटावें तें याच संदर्भात. या महापुरुषांच्या मुळें माणसें वरच्या पातळी वर जातात, त्यांना आपल्या कर्तव्याची, भवितव्याची जाणीव लाभते, आणि एक प्रकारची आध्यात्मिक शिस्त अंगीं बाणते. या शिस्तीच्या अभावीं हें जग म्हणजे मानवी वासनांचें एक मोकाट जंगल बनेल. अखेर संस्कृतीचें सामर्थ्य आणि शिस्तशीरपणा यांची गुणवत्ता हाच त्या संस्कृतीचा अंशतः तरी गाभा नव्हे काय?

प्र. आपल्या देशांतील क्रांतीचा सामाजिक-आर्थिक पाया अजून कच्चा आहे. अशा स्थितींत प्रगतीचें चाक उलटें फिरवायचा प्रयत्न झाला, तर, भौतिक विकास आणि नैतिक शक्ति या दोहोंनींहि सज्ज झाल्यास, भारतीय लोक त्याला यशस्वी विरोध करण्याची ताकद दाखवतील असें आपल्याला वाटतें काय?

उ. जनतेला एकदां लोकशाहीचा पाया योग्य तऱ्हेनें मिळाला म्हणजे मग साऱ्या जनसमूहाला एकदम भलतीकडे वळवणें किंवा उलट्या दिशेला फिरवणें हें तितकेंसें सोपें नाहीं. अर्थात् प्रगतीची गति कमी करतां येईल किंवा वाढवतां

येईल; पण सबंध जनसमूहाला मागें रेटणें शक्य होईल असें मला वाटत नाहीं. मला तें पूर्णपणें अशक्य वाटतें. आपण म्हणतां त्याप्रमाणें ही क्रांति अपुरी आणि दुबळी असेल; पण आमच्या योजनांनीं—किंबहुना नियोजनाच्या नुसत्या कल्पनेनेंच कांहीं शक्तींना गति दिली आहे. ती थांबवतां येणार नाहीं; तिला उलटी दिशा देतां येणार नाहीं; अशा परागतीच्या शक्यतेविरुद्ध आमचें सगळ्यांत खात्रीचें अस्त्र म्हणजे आमच्या लोकांच्या आशेची आणि उमेदीची पातळी. लोकांना हताश आणि अश्रद्ध बनवून आमच्या योजना निष्फळ बनविणें कदाचित् शक्य असेल. परंतु दुसऱ्या व तिसऱ्या योजनांनीं एकदां गति घेतली म्हणजे नाकर्तेपणा, दारिद्य, मागासलेपणा यांची तटबंदी भेदून आपण पलीकडे जाऊं आणि स्वयंगति साधूं. म्हणजेच, आपली अर्थव्यवस्था स्वतःच निर्माण केलेल्या शक्तीवर चालूं लागेल. संसदीय लोकशाहीमुळें परिणामकारक झालेली जनतेची इच्छाशक्ति या अर्थव्यवस्थेच्या पाठीशीं उभी राहील, तर आपल्या या महान् प्रयोगाचें सातत्य टिकवणें कठीण जाणार नाहीं.

प्र. आपण आपले मुद्दे इतक्या सुंदर रीतीनें मांडले याबद्दल धन्यवाद. या आपल्या मांडणीमुळें आपल्या राजकीय वारशाच्या प्रश्नाकडे योग्य संदर्भात, योग्य त्या अंतरावरून आणि समतोल नजरेनें पाहाणें शक्य झालें आहे. पं. नेहरू यांच्या जाणीवयुक्त अंतरंगांत व तसें नसेल तर जाणीवेच्या पृष्ठ-भागाखालीं काय चाललें आहे याचें चित्र आपल्या परवानगीनें मी माझ्या शब्दांत असें मांडीन : ध्येयप्रणालीच्या दृष्टीनें एकजिनसी असा एखादा पक्ष, गट किंवा कार्यकर्त्यांची फळी निर्माण करण्यांत नेहरूंची कुचराई झाली किंवा त्यांनीं तसें करण्यास नकार दिला असेल; परंतु याची भरपाई करण्यासाठीं त्यांनीं साऱ्या राष्ट्रांतच बदल करण्याचा, राष्ट्राच्या साऱ्या नागरिकांनाच नेहरू बनविण्याचा असामान्य प्रयत्न चालवला आहे. आमच्या धोरणांतील मूल प्रवाह उलटा फिरवण्याचा प्रयत्न करण्याचें कोणत्याहि प्रतिगामी नेत्याच्या किंवा गटाच्या मनांत आलें तरी हा नेहरूंचा देश त्याला प्रतिबंध करील. आतां, चिनी कम्यून्सच्या आणि सक्तीनें कामें करवून घेण्याच्या पद्धतीला हा आमचा लोकशाही पर्याय आहे, असें आपल्याला वाटतें काय?

उ. चिनी किंवा इतरहि कुठल्या पद्धतीला पर्याय शोधण्याच्या दृष्टीनें आम्ही विचार करीत नाहीं. आमचा मार्ग आम्ही आमची परंपरा आणि आमच्या गरजा यांच्या अनुषंगानें ठरवतों. साऱ्या जनतेच्या पाठिंब्यावर धोरणांचें बळ आधारायचें आणि तीं अखंडपणें पुढें चालावींत यासाठीं जनतेंतूनच सामर्थ्य-शाली असे ताण निर्माण करायचे, हा मार्क्स, किंवा कम्युनिस्ट किंवा आणखी कोणी यांच्याप्रमाणेंच गांधींचा स्वतःचाहि मार्ग आहे. बहुसंख्य जनतेच्या संघटित पाठिंब्याशिवाय आज कुठल्याच राष्ट्राला पुढें जातां येणार नाहीं— मग तें राष्ट्र लोकशाहीवादी असो किंवा कम्युनिस्ट असो. अर्थात् जनतेचें सक्रिय सहकार्य मिळवण्याचे मार्ग आणि साधनें अर्थातच निरनिराळीं असूं शकतात. जनतेला कार्यप्रवृत्त करण्याचें, तिची निष्क्रिय वृत्ति नष्ट करण्याचें आणि योग्य दिशेनें तिला पुढें नेण्याचें प्रतिभाशाली व परिणामकारक तंत्र गांधीजींनीं आपल्या देशांत विकसित केलें. मला वाटतें, आपण याची चर्चा आधीं एकदां केली आहेच. या तंत्राचा वारसा गांधीजींकडून आम्ही घेतला आहे. अशा तऱ्हेची जनतेमधील जाणीव, राष्ट्राला भूतकाळाकडे वळवूं पाहाणाऱ्यांना नक्कीच परावृत्त करूं शकेल.

प्र. पं. नेहरूंच्या नंतरच्या भारताचें अंधुक चित्र यांतून सापडतें. परंतु या मुद्याकडे मी या मुलाखतीच्या शेवटीं वळणार आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...................... दि: ................
क्रमांक ...................... नों: दि: ..............

.६.

# विकासाचें लोकशाही वळण

प्र. आज आपण अंगिकारलेली नियोजित विकासाची पद्धति ही गणितांतल्या सूत्रासारखी–फॉर्म्युल्यासारखी–आहे, फक्त त्यांतले कांहीं घटकच अनिश्चित स्वरूपाचे आहेत, असें आपण सांगितलेंत. या अनिश्चित घटकांमधला सर्वांत महत्त्वाचा घटक मानवी आहे असें दिसतें. मानवी घटक म्हणजे नियोजनाला पाठिंबा देण्यास व हातभार लावण्यास जनतेला उद्युक्त करणें. यासाठीं आधीं नव्या काळाला योग्य असे संस्थात्मक आणि इतर बदल करणें ही एक अपरिहार्य आवश्यकता आहे. हे बदल औद्योगिक क्षेत्रापेक्षां शेतीच्या क्षेत्रांत अधिक आवश्यक आहेत. नवें राजकीय नेतृत्व—भारताच्या संदर्भांत राजकीय क्षेत्राची पुनर्व्यवस्था; सहकारी सेवासंघ यांसारख्या आवश्यक गोष्टींवर आधारलेली नवी कारभारयंत्रणा; भारतासारख्या प्रचंड देशांत विकासयोजनांमध्यें जनतेचें सहकार्य मिळवण्यासाठीं लाखों संघटना उभ्या करणें—अशा स्वरूपाचे बदल आवश्यक दिसतात.

उ. कोणचेंहि काम हातीं घेतलें तरी त्यांतला मानवी घटक हा सर्वांत महत्त्वाचा आणि मूलभूत घटक असतो हें उघडच आहे. जनतेच्या कांहीं विशिष्ट स्वाभाविक प्रवृत्ति, विशिष्ट प्रमाणांत शिक्षण मिळणें; कामें करण्याची बौद्धिक आणि इतर तऱ्हेची विशिष्ट कुवत आणि तीं करण्याची विशिष्ट प्रेरणा—इतक्या गोष्टी या मानवी घटकांत अंतर्भूत आहेत. प्रत्येक देशांत ही गरज आर्थिक क्षेत्राशीं संबंधित नाहीं. पोलादाचा कारखाना बांधायचा संकल्प करणें आणि तो बांधून काढणें—शक्य झालें तरी त्यानंतर तेथें काम करण्यासाठीं—तो चालवण्यासाठीं लोक पाहिजेतच. कदाचित् त्या देशांतील लोक बौद्धिक दृष्ट्या मागासलेले असण्याचाहि संभव.

याचाच अर्थ असा कीं सबंध देशाची परिस्थिति, हवामान, वातावरण आणि इतर गोष्टी या सगळ्यांवर अशा प्रश्नाचें उत्तर अवलंबून असतें. दुसरें असें कीं, आपण आपल्यासमोर ठेवलेल्या उद्दिष्टांमुळेंहि अंशतः तें उत्तर निश्चित होत असतें. ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपण केवळ आर्थिक दृष्टिकोणांतून नियोजनाकडे पहात असलों तर त्यांत कारखान्यांची उभारणी, अधिक चांगली शेती, सुधारलेलीं अवजारें, उत्पादनाच्या आधुनिक व सुधारलेल्या पद्धति इतक्या गोष्टी येतात. या गोष्टी सूत्राप्रमाणें अचूक आंखतां येतात. फक्त तेथेंहि मानवी घटक अनिश्चित असतो.

प्र. येथें आपण फक्त भारताचाच विचार करूं लागलों तर...

उ. भारताच्या बाबतींत पाहिलें तर बौद्धिक आणि शारीरिक कुवत—म्हणजेच निष्णात कामगारांचा सांठा—भरपूर प्रमाणांत आहे. संधि मिळाली म्हणजे भारतीय कामगार उत्कृष्ट दर्जाचें तांत्रिक किंवा बारकाव्याचें काम उत्तम तऱ्हेनें करून दाखवूं शकतात. एकंदरींत पाहिलें तर आवश्यक त्या कच्च्या मालापैकीं बराचसा आपल्याकडे आहे. त्या दृष्टीनें औद्योगिक विकासाला आवश्यक ती पूर्वपरिस्थिति इथें आहे. कदाचित् भारतानें यापूर्वींच या बाबतींत आघाडी गांठली असती. परंतु गेल्या शतकापेक्षां अधिक काळांत भारताला या बाबतींत जवळजवळ योजनापूर्वक प्रतिबंध करण्यांत आला !

प्र. आजहि आपण पुरेसे वेगानें पुढें जात नाहीं आहों, याचेंहि कारण, त्याच जुन्या यंत्रणेद्वारां आपला कारभार चालला आहे, हेंच. तेव्हां, बदलत्या काळांत आवश्यक असलेले संस्थात्मक बदल घडवून आणण्याकडे आपण पुरेसें लक्ष देतों आहोंत काय, हाच मुख्य प्रश्न आहे.

उ. तसें लक्ष आम्ही नक्कीच देतों आहोंत. आपण ज्यांना संस्थात्मक, संघटनात्मक बदल म्हणतां ते सगळेच बदल संस्थात्मक नाहींत. आपण नेतृत्वाविषयीं आण राजकीय क्षेत्रांतील पुनर्घटनेविषयीं म्हणालांत. पण हे बदल कांहीं संस्थात्मक नव्हेत. या प्रश्नाकडे पाहाण्याचे फक्त दोन मूलभूत मार्ग आहेत. अर्थात् या दोहोंच्या मधले अनेक मार्ग असतील. या दोन मुख्य मार्गांपैकीं

एक हा सर्वाधिकारशाहीचा आहे. या पद्धतींत सरकार—किंवा सरकारच्या नांवानें सत्ता धारण करणारा कांहीं व्यक्तींचा गट—जनतेवर आपल्या इच्छा लादीत असतात. तिच्याकडून भरपूर काम करून घेतात. इतरहि हव्या त्या गोष्टी करून घेत असतात. अर्थात् या सक्तीबरोबरच फार मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि लोकांचीं मनें वळवण्याचे प्रयत्न हेहि चालू असतात. तेथें केवळ हुकुमानें कामें होत नाहींत, तर लोकांचीं मनें बदलण्याचा प्रयत्न करावा लागतो. कुठलाहि कार्यक्रम त्यांनीं स्वीकारावा लागतो. लोकांच्या मनावर थोडाफार तरी अनुकूल परिणाम केल्याखेरीज त्यांच्यावर एखादी गोष्ट लादणें अशक्यच असतें. परंतु स्थूल मानानें याला सर्वाधिकारशाहीचा मार्ग असें म्हणतां येईल. त्यांत स्वाभाविकपणें लोक करतील त्यापेक्षां कितीतरी अधिक काम त्यांना करावें लागतें. तें करण्याची पद्धति त्यांना अप्रिय असते. पण सक्तीमुळें तें काम ते करतात.

दुसऱ्या मार्गाला लोकशाही मार्ग म्हणतां येईल. मतप्रदर्शन, युक्तिवाद, आवाहन, मन वळवणें, विशिष्ट तऱ्हेचा मतप्रचार आणि इतर गोष्टी या सर्वांच्या साहाय्यानें जनतेला जागृत केलें जातें; कार्यप्रवृत्त केलें जातें. आपण करीत असलेल्या कामाचा आज नसला तरी उद्यां, भविष्यकाळांत आपल्यालाच फायदा होणार आहे, अशी जाणीव त्यांना झालेली असते. हा दुसरा मार्ग 'वरून' सुरू होतो, पण त्याचें कार्य जनतेला बरोबर घेऊन—'खालून'—चालतें. पहिला मार्ग हा मुख्यतः 'वरून'च जातो. त्याचा परिणाम अर्थातच खालच्या पायऱ्यांवर होतोच.

आतां समजा, आपल्याला एखादा कारखाना उभारायचा आहे. तुलनेनें ही गोष्ट बरीच साधीसोपी आहे—म्हणजे तिची आंखणी करणें कठीण नाहीं. आपल्याजवळ योग्य त्या आवश्यक गोष्टी असल्या म्हणजे आपण कामाला सुरुवात करतों. परंतु शेतीचा वेगळा आहे. कुठल्याहि देशांत शेती हा पायाभूत उद्योग असतो. भारतांत तर तो फारच मोठा आहे. अशा बाबतींत वरून हुकूम सोडून फारसें कांहीं साध्य होत नाहीं. लोकशाही मार्गांत संबंधित लोकांना त्यांच्या कार्याची, कर्तव्याची जाणीव करून देणें, त्यांनीं स्वावलंबी व्हावें आणि कांहींतरी हातपाय हालवण्यास उद्युक्त व्हावें यासाठीं प्रयत्न करणें आवश्यक

असतें. या दृष्टीनें आम्ही जे संस्थात्मक बदल करीत आहोंत, ते खूपच महत्त्वाचे आहेत. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, समिति–पंचायती, जिल्हा परिषदा आणि इतर संघटना आम्ही उभारीत आहोंत. सर्व विकासकार्यक्रम विकेंद्रित करून ग्रामपंचायतींकडे सोपवावयाचे असा याचा अर्थ आहे. त्यांना याबाबतींत सल्ला दिला जाईल, परंतु जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली जाईल.

हा एक मूलभूत संस्थात्मक बदल आहे. वरच्या थरांमध्यें कितीहि बदल केले तरी त्यांच्यापेक्षां हा बदल अधिक महत्त्वाचा आहे. 'वरचे' बदल हे शेतीच्या दृष्टीनें आवश्यक असतील, पण औद्योगिक दृष्टीनें तसे नसतीलहि. माझ्या माहितीप्रमाणें राजस्थानसारख्या ज्या ज्या ठिकाणीं विकेंद्रीकरण सुरू झालें आहे, त्या त्या ठिकाणीं कांहीं लक्षवेधक बदल घडून येत आहेत. एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. तुलनेनें राजस्थान हा देशांतल्या मागासलेल्या विभागांतला आहे. असें म्हणतां येईल, पण तो आतां जागा होतो आहे. या लोकांना आणि पंचांना आपण भेटलांत तर ध्यानांत येईल कीं ही सर्वसाधारण माणसें आहेत, असामान्य नाहींत; परंतु त्यांच्या बोलण्याचा सूर बदलला आहे. ते विशिष्ट आत्मविश्वासानें बोलतात. मोठ्या अधिकाऱ्यांशीं, मंत्र्यांशीं किंवा दुसऱ्या कोणाशीं बोलतांना ते संकोचत नाहींत. आपल्या समोरचें काम आपल्याला केलेंच पाहिजे अशा भावनेनें, कर्तव्याच्या जाणीवेनें ते कामाला भिडले आहेत.

ही प्रतिक्रिया मला फार आशास्पद वाटली. असाच बदल साऱ्या भारतांत घडवून आणण्याचें आम्हीं ठरवलें आहे. शेतीच्या क्षेत्रांत एक अगदीं नवें वातावरण निर्माण होणार असें मला वाटतें आहे. ग्रामोद्योग, छोटे उद्योगधंदे यांमध्यें कार्यकारी वर्गाच्या नव्या संघटना उभारण्याचाहि समावेश अर्थात् आतां सांगितलेल्या कार्यक्रमांत होतोच.

कार्यकारी वर्गाच्या संघटनांविषयीं आणि त्या न उभारण्यांत माझ्या हातून घडलेल्या कुचराईविषयीं आपण विस्तारानें बोललांत. काँग्रेसनें किंवा इतर कोणत्याहि पक्षानें आपलीं माणसें पाठवून त्यांना बळजबरीनें एकत्र आणावें व त्यांची संघटना बनवावी असें माझ्या क्षणभरहि मनांत येत नाहीं. पण खऱ्या कार्यकर्त्यांच्या संघटना गांवांच्या पातळीवर सतत निर्माण होत आहेत. त्या पक्षसंघटना नाहींत. गांवांत काम करणाऱ्या व्यक्ति, शेतकरी, शेतमजूर यांच्या

त्या संघटना आहेत. अशा लोकांना आम्ही शिक्षण देत आहोंत. गांवाच्या पातळींवरील कार्यकर्त्यांना आम्ही प्रथमच सहा महिने शिक्षण देत होतों. नंतर अभ्यासक्रम एक वर्षाचा आणि त्यानंतर दीड वर्षाचा झाला. आतां हे कार्यकर्ते दोन वर्षें शिकतात. अधिकाधिक कार्यकर्ते शिकूं लागले आहेत आणि त्यामुळें त्याचें काम पूर्वींपेक्षां सुधारलें आहे, असें मला वाटतें. एखादा प्रचंड देश बदलणें हें अर्थात् फार कठीण आहे. अधिकाधिक लोक आम्हाला मिळेपर्यंत उपलब्ध कार्यकर्ते आवश्यकतेपेक्षां कमीच पडणार. आम्हाला अशीं हजारों माणसें हवीं आहेत, आणि तीं मिळतीलहि. पण मुख्य गोष्ट अशी कीं आम्ही जवळजवळ सगळ्या विकासकार्याची जबाबदारी ग्रामसंघटनांकडे सोंपवीत आहोंत. अर्थात् कांहीं फार मोठीं कामें हे अपवाद. त्यांना बाहेरच्या मदतीची गरज लागणारच. ग्रामसंघटनांच्या कार्यांत मदत व सल्ला देण्यासाठीं म्हणून दर विभागाला आम्ही स्थापत्यशास्त्रज्ञ, पशुपालन-तज्ञ, आरोग्य, शिक्षण इत्यादींचे तज्ञ देत आहोंत. सध्या चालू असलेला अशा प्रकारचा संस्थात्मक बदल हा मूलभूत आहे.

इतर संस्थात्मक बदलहि वरच्या थरांत चालू आहेत, पण त्यांचा वेग मंद आहे. मोठाले संस्थात्मक बदल एकदम घडवून आणण्यांत धोका असतो. ते बदल अंगवळणीं पडेपर्यंत, आज चालू असलेल्या कामांत खीळ पडण्याचा संभव असतो. एकंदरीनें पहातां आजचा आमचा अधिकारीवर्ग बदलाच्या बाबतींत वाटतो तितका तटस्थ किंवा पराङ्मुख नाहीं. बदलाचें हें काम अधिक वेगानें आणि अधिक कार्यक्षमतेनें करतां आलें असतें. पण किती केलें तरी, माणसाला विशिष्ट मर्यादांच्या चौकटीच्या बाहेर जातां येत नाहीं.

प्र. हें अगदीं खरें. भारतांत ज्या तऱ्हेनें सत्तेचा खांदेपालट झाला, त्या पद्धतीचा परिणाम आपल्या गेल्या बारा वर्षांच्या इतिहासावर फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे, असें म्हणतां येईल. या संदर्भात भारतीय आणि चिनी क्रांतींची तुलना केली तर एक मुख्य फरक दिसतो. चिनी लोकांनीं भूतकाळाला सरळ रामराम ठोकला, तर आपण बारीक सारीक गोष्टींसह सारा भूतकाळ इस्टेटीच्या वारशाप्रमाणें आपल्या ताब्यांत घेतला. भारतांत सत्ता बदलली ती शांततामय मार्गानें. पण बहुधा त्यामुळेंच सरकारी कारभारयंत्रणेची

घडण बदलण्याच्या, आजच्या सरकारच्या शक्तीला पायबंद बसला. आपण जेव्हां कारभार हातीं घेतला, त्यावेळीं पूर्वीच्या अनेक गोष्टींना आपण मान्यता दिली होती. तसेंच, अनेक बंधनें स्वीकारलीं होतीं, असें आपल्या अनुभवास आलें काय ? विशेषतः सरकारी कारभार-यंत्रणेच्या बाबतींत ?

उ. या गोष्टीला चांगली आणि वाईट अशा दोन बाजू आहेत. मला असें वाटतें कीं, सरकारी अधिकारी व कारभारयंत्रणा बऱ्याच प्रमाणांत फार उत्तम आहेत. मी कनिष्ठ वर्गाच्या सरकारी अधिकाऱ्यांविषयीं बोलत नाहीं. कारण, गेल्या कांहीं वर्षांत या वर्गांत मोठ्या संख्येनें नवे उमेदवार नेमले गेले आहेत. आणि त्यांना अजून शिक्षणाची गरज आहे. परंतु स्थूल मानानें बोलायचं झाल्यास आमचा अधिकारी चांगला कार्यक्षम आहे. दोषयुक्त आहे तो यांतला मानवी घटक नव्हे, तर, भूतकाळाकडून आम्हाला जो कार्यपद्धतीचा वारसा मिळाला त्या कार्यपद्धतींत दोष आहे. आपला किंवा माझा दृष्टिकोण आधुनिक आहे. मला वाटतें, तो अधिक चांगला आणि विशालतर असा दृष्टिकोण आहे. परंतु, जुन्या जमान्यांतील ज्येष्ठ अधिकारीहि उत्तम काम करीत आहेत आणि काळाबरोबर बदलत आहेत. खरी अडचण ही, या विलक्षण गुंतागुंतीच्या कार्यपद्धतींतून निर्माण झाली आहे. ब्रिटिशांची राज्यपद्धति सरळसोट होती. त्यांना सामाजिक किंवा आर्थिक सुधारणांची विशेष निकड नव्हती. त्यामुळें ही गुंतागुंतीची कार्यपद्धति त्यांना विशेष अडचणीची वाटली नाहीं. पण आज मात्र ही कार्यपद्धति पदोपदीं आमच्या आड येत आहे. आणि तिच्यांत सुकरता व सरळपणा आणण्याकडे आम्हाला सतत लक्ष द्यावें लागत आहे. मला असें वाटतें कीं, या कामीं आम्हाला यश मिळतें आहे आणि यापुढें मिळेल. ही एक अखंडपणानें चालणारी प्रक्रिया आहे. तिच्यांत एकदम कांहींतरी नाट्यपूर्ण असें घडण्याला वाव नाहीं.

सत्तेचा खांदेपालट ज्या पद्धतीनें झाला तिचे चांगले आणि वाईट— दोन्ही तऱ्हेचे परिणाम अलीकडल्या वर्षांवर झाले आहेत, हें नक्कीच ! आम्हाला दोन्हींही स्वीकारावे लागले. परंतु मला असें वाटतें कीं, झालें हेंच तुलनेनें अधिक चांगलें झालें. गांधीजींनीं या क्रांतीची कल्पना मनांत साकार केली, क्रांति प्रत्यक्षांत घडवून आणली, ती सातत्याच्या कल्पनेच्या आधारानें. भूतकाळाशीं

असलेले धागेदोरे संपूर्णपणें तोडण्याची कल्पना त्यांच्या मनांत नव्हती. ही गोष्टही एका दृष्टीनें अर्थपूर्ण आणि असामान्यच आहे. कारण बहुधा क्रांति ही हिंसा आणि भूतकाळाशीं काडीमोड या कल्पनांवर आधारलेली असते. सत्तेचा शांततामय खांदेपालट हा आपल्या राजवटीला स्थिरता देणारा घटक ठरला आहे. स्वाभाविकच नंतरच्या इतिहासावर त्याचा परिणाम घडला आहे.

.७.

# संश्लेषणाचें तत्त्वज्ञान

प्र. आपला वारसा आणि पुढील विकास यांच्याविषयीं आपण जें बोललांत त्यांतून संघर्षाऐवजीं संश्लेषणाचें—समन्वयवादासारखें तत्त्वज्ञान सूचित होतें, असें म्हणणें बरोबर आहे काय ?

उ. बरोबर. संश्लेषणाचेंच हें तत्त्वज्ञान आहे. विरोधी पक्षांमध्यें पूल बांधायचा —दुवे निर्माण करण्याचा—गांधीजींचा नेहमींच प्रयत्न दिसे.

प्र. व्यवहारांत उपयुक्त असें तत्त्वज्ञान म्हणून संश्लेषण उत्तम आहे. पण मूलभूत वर्गविग्रहाच्या बाबतींत तें लागू करूं लागलें तर मात्र तें कांहींसें अप्रस्तुत वाटूं लागतें. उदाहरणार्थ, संपन्न आणि गरीब यांच्यामधील विरोध नष्ट व्हावा यासाठीं गांधीजींनीं विश्वस्तव्यवस्था व विश्वस्तनिधि यांची आश्चर्यजनक कल्पना मांडली. म्हणजे भोळ्या कोकराला त्यांनीं जणुं विश्वस्त वाघाच्या ताब्यांत दिलें. प्रश्न असा आहे: मार्क्सप्रणीत वर्गसंघर्षाच्या तत्त्वज्ञानाऐवजीं आपण वर्गसंश्लेषणाच्या गांधीवादी उपायाचा स्वीकार केला आहे काय ?

उ. वर्गसंघर्ष हा निरंतरचा आहे. आपण त्याचें अस्तित्व नाकारूं शकत नाहीं. पण हिंसा, संघर्ष किंवा द्वेष हेच त्यावरचे उपाय आहेत असें नाहीं. येथेंच गांधीजींच्या शांततामय भूमिकेची, त्यांच्या मित्रत्वाच्या व विधायक दृष्टिकोणाची आठवण व्हावी. मी आपल्याला सविस्तर सांगितलें त्याप्रमाणें ज्या काळांत लोकशाही, सार्वत्रिक मतदान किंवा कामगार चळवळ या गोष्टी नव्हत्या, अशा काळांत मार्क्स जगला. विषमता नाहींशी करून समता प्रस्थापित करण्यासाठीं त्याकाळीं संघर्षाशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आम्हीं वर्गविग्रहाचें अस्तित्व

नाकारीत नाहीं किंवा तिकडे दुर्लक्षहि करीत नाहीं; पण हा प्रश्न शांततेनें आणि सहकार्यानें हाताळण्याचा; संघर्ष उग्र करण्याऐवजीं सौम्य करण्याचा, व विरोधकांना नाहींसे करण्याची, त्यांच्याबरोबर लढण्याची धमकी देण्याऐवजीं त्यांना आपल्याकडे वळवण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे. वर्गसंघर्षाची ज्या तऱ्हेची जाणीव आपल्याला आहे, त्या तऱ्हेची जाणीव कदाचित् गांधीजींना नसणें शक्य आहे. पण त्यांनीं सुचवलेले उपाय हे आधुनिक काळांत आणि आपल्या देशांत विशेष उपयुक्त ठरणारे आहेत. शांततामय, स्नेहपूर्ण आणि सहकार्याने योजलेले उपाय हितकर असतात हेंच आपला इतिहास आणि परंपरा यांच्यावरूनहि दिसून येतें.

वर्गसंघर्ष, युद्धं इत्यादि गोष्टींमध्यें आणखी एक घटक येतो. तो म्हणजे अणु बाँब आणि अर्थातच उपयुक्त अशी अणुशक्तीहि. अणुशक्तीमध्यें मानवी विकासाची कल्पनातीत प्रभावी अशी शक्यता दिसत आहे, पण दोनतीन स्फोटांत सारी संस्कृति बेचिराख करण्याचें भय अणुबाँब दाखवीत आहें. अशा या विध्वंसक शस्त्राच्या शोधामुळें युद्ध, वर्गसंघर्ष या गोष्टी इतक्या अनर्थकारिक ठरतात कीं हिंसक उपायांचा विचारहि मनांत आणणें अशक्य व्हावें—मग तें युद्ध वर्गसंघर्षाच्या स्वरूपाचें असो कीं भांडवलदार व समाजवादी यांच्यामधील लढ्याचें असो. आजच्या काळांत केवळ राष्ट्रांच्याच नव्हे, तर गटांच्या—इतकेंच काय एखाद्या व्यक्तीच्याहि ताब्यांत अत्यंत विध्वंसक शक्ति असलेलीं शस्त्रें जाऊं शकतात. अशा काळांत कोठल्याहि दृष्टीनें पाहिलें तरी, वर्गसंघर्षांची किंवा युद्धांची कल्पना इतकी धोक्याची आहे कीं ती आपोआपच इतिहासजमा होते. आणि म्हणूनच, संश्लेषण, सहकार्य, सहजीवन आणि क्रमानें समानीकरण यांवर आधारलेल्या गांधीजींच्या मार्गाचे गुण आपण ओळखले पाहिजेत आणि त्यांचा मार्ग चोखाळला पाहिजे.

प्र. पंचशीलांची किंवा शांततामय सहजीवनाच्या तत्त्वांची जणुं जन्मकहाणीच आपण येथें सांगितली. गांधी-मार्गानें आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडवण्याचा व जगांतील संबंधांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न आपण या पंचशीलांच्या द्वारें करीत आहांत. मला या बाबतींत एक विचारावेंसें वाटतें. गांधीजींचा दृष्टिकोण

आपण इतक्या निष्ठेनें कसा स्वीकारला? चाळीस सालाच्या सुमारास आपण कांहींसे बदललांत. पूर्वी चिकित्सक अनुयायी होतां ते अत्यंत श्रद्धावान् समर्थक झालांत. आपण अणुबॉंबचा उल्लेख केलात. या भयंकर स्वरूपाच्या विध्वंसक शस्त्राचा जन्म झाला, आणि त्यामुळें १९४० पूर्वींच्या आपल्या विचारांमध्यें मूलभूत पालट झाला, असें झालें असावें काय? कीं गांधीजींच्या बलिदानामुळें आपली त्यांच्या तत्त्वांवरील निष्ठा तीव्र आणि उत्कट झाली?

उ. मला हें नीटसें सांगतां येणार नाहीं. कारण स्वतःच्याच मनाचें विश्लेषण करणें कठीण असतें. अणुबॉंबमुळें माझ्या विचारसृष्टीवर फार मोठा परिणाम झाला. परंतु आपण सुचवलेल्या स्वरूपाचा नव्हे. हा बदल एकदम न होतां हळू हळू झाला. अणुबॉंबचा परिणाम फार खोल असा झाला तो केवळ त्याच्या दुःखदायक परिणामामुळें नव्हे तर त्याच्या रूपानें एक नवी अमाप शक्ति या जगांत नव्यानें उदयास आली यामुळेंहि. या शक्तीचें स्वरूप अमंगल आहे तसें शुभंकरहि आहे. अशा अपूर्व स्वरूपाच्या शक्तीच्या उदयामुळें आपली विचारसृष्टि आणि दृष्टिकोन ही बदलून जाणें स्वाभाविकच! भविष्य-काळ आणि त्यांतील घटना यांविषयींचें आपलें कल्पनाचित्रच त्यामुळें बदलून जातें.

आतां आपण ज्याविषयीं बोलत होतों, तो वर्गसंघर्षच घ्या. वर्ग अस्तित्त्वांत आहेत आणि त्यांच्यामध्यें संघर्ष आहे हें उघड आहे. त्यांचे हितसंबंधच एकमेकांना विरोधी आहेत. त्यामुळें संघर्ष निर्माण होतो. हें सारें नाकारणें अशक्यच आहे. परंतु हा वर्गसंघर्ष संपवण्यासाठीं आपण तो अधिक उग्र करायचा आणि लढ्यांतून त्याची समाप्ति घडवायची हा मार्ग योग्य ठरतो काय, हा खरा प्रश्न आहे. शक्य तोंवर संघर्ष हा टाळला पाहिजे किंवा त्याचा शांततेनें निरास केला पाहिजे, हा जो माझा मूलभूत दृष्टीकोन आहे, त्याच्याशीं हा मार्ग जुळण्यासारखा नाहीं. मला अभिप्रेत असलेला मार्ग वर्गसंघर्षाचें अस्तित्त्व नाकारीत नाहीं, तर, लढ्याशिवाय इतर उपायांनीं वर्गसंघर्षच उखडून टाकण्याचा प्रयत्न करतो. हा मार्ग आमच्या तत्त्वप्रणालीचा अविभाज्य असा घटक आहे. तो अणुबॉंब किंवा गांधीजींचा खून याच केवळ कारणांमुळें आम्ही स्वीकारला नसून आमच्या तत्त्वप्रणालीचें तें मूलभूत अंग आहे.

संस्थानिकांच्या आणि जमीनदारांच्या बाबतींत या मार्गाचा अवलंब परिणामकारक रीतीनें करण्यांत आम्हाला अंशतः तरी यश लाभलें आहे असें मला वाटतें. आम्ही सगळ्याच संस्थानिकांचीं मनें बदललीं आहेत अशी समजूत माझी नाहीं. पण त्यांच्यावर अनेक बंधनें घातलीं गेलीं आहेत आणि अनेक बाजूंनीं—जनतेकडून तसेंच सरकारकडून त्यांच्यावर दाब येत असल्यामुळें दोन्ही बाजूंना योग्य निर्णयावर येणें अधिक सोपें झालें आहे. या पद्धतीनें आम्ही बड्या जमीनदारांची पद्धत नाहींशी केली. आम्ही त्यांना नुकसानभरपाई दिली परंतु ती त्यांच्या राहणीमानाच्या प्रमाणांत नव्हती. त्यांना हें आवडलें नाहीं आणि त्यांनीं विरोधहि केला. परंतु फार मोठा लढा न होतांच हा संघर्ष मिटवण्यांत आला.

आतां औद्योगिक विभागांतील खासगी क्षेत्र आणि वर्धिष्णु राष्ट्रीय क्षेत्र यांच्यामध्यें विरोध उद्भवला आहे. परंतु त्याचाहि निरास शांततेनें आणि सहकार्यानें होईल अशी मला खात्री वाटते.

अशा तऱ्हेनें, गांधीमार्ग चोखाळणें सर्व बाबतींत शक्य आहे. कांहीं वेळां संघर्ष टळणार नाहीं ही गोष्ट अलाहिदा. पण हा संघर्ष मोठ्या प्रमाणावर पेटणार नाहीं. त्याचें स्वरूप स्थानिक राहील. वर्ग अस्तित्वांत आहे, हक्कदार वर्ग—कामगार, किसान व मध्यम वर्गीय यांच्यावर सत्ता गाजवणारा वर्ग—आपल्याकडे आहे, हें मला नाकारायचें नाहीं. विषमता नाहींशी करून समता प्रस्थापित करण्याची मला प्रामाणिक इच्छा आहे—तरीहि विरोध अधिक उग्र करून, संघर्षाच्या मार्गानें हें साध्य करणें बरोबर आहे, असें मला वाटत नाहीं. हा मार्ग अवलंबून आपण यशस्वी झाल्याचें कदाचित् दिसेल; पण आपण त्यांतून एक वाईट परंपरा मागें ठेवीत असतों. येथें आपण पुन्हा साध्य आणि साधनें यांच्या संबधांच्या मुद्द्यावर येतों.

प्र. अणुबॉंबनें हिरोशिमा–नागासाकीचा विध्वंस केला व इतिहासाचं नव पान सुरू केलें, त्यापूर्वीच गांधी-मार्गाचा आपण स्वीकार केला होता असें आपलें म्हणणें आहे तर?

उ. लढ्याला—विशेषतः हिंसामय लढ्याला माझा दृष्टिकोण नेहमीच विरोधी राहिला आहे. अर्थात् अणु बॉंम्बचा–नव्हे, अणुशक्तीचा विचार माझ्या मनांत

येतोच. जगांत निर्माण होऊं पाहाणाऱ्या महान सामर्थ्याचें तें प्रतीक आहे. तिनें जीवनाचा सगळा संदर्भ—भावी जीवनाची सारें चित्रच—बदलून टाकलें आहे. त्यामुळें सगळे भूतकालीन सिद्धान्त या नव्या संदर्भात पुन्हा एकदा पारखून घेतले पाहिजेत. कुठल्याही गोष्टीचा विचार करायला लागलें म्हणजे, आज प्रथम युद्धाच्या शक्यतेचा आणि तदनुषंगिक सर्वनाशाचा संदर्भ आधीं ध्यानांत घ्यावा लागतो.

प्र. त्यामुळेंच आपण सहजीवनाचा आग्रह धरतां काय?

उ. असें पहा; सहजीवनाविषयींहि माझें मत पूर्वीपासून होतेंच.

प्र. चाळीस सालापूर्वीपासून?

उ. अर्थातच तें पूर्वीपासून माझ्या विचारांत आहे. खरें म्हणजे सहजीवनाचें तत्त्व बुद्ध, अशोक यांच्या काळापासूनचें आहे. गांधीजींनीं साध्यसाधनविवेकाचा तो एक भाग बनवला. सनातन भारतीय विचाराचेंच तें एक अंग आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. 'जगा आणि जगूं द्या' या तत्त्वावरच भारतीय विचार आधारलेला आहे. भारतीय लोक म्हणजे देवांचे अवतार आहेत असें मला म्हणायचें नाहीं. पण कांहींहि असलें, तरी भारतीय विचार हा भले-पणाचा विचार आहे. तेव्हां, सहजीवनाच्या तत्त्वाचा उगम हा आमच्या इतिहासांतच सापडेल. आजच्या कांहीं घटनांमुळें त्याला फार निकडीचें महत्त्व आलें आहे, हेंहि खरेंच. कारण आज युद्ध म्हणजे मानवी जीवनाचा संपूर्ण विनाश असेंच समीकरण बनूं पहात आहे.

.८.

# राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सहजीवन

प्र. येथें आपण स्वतंत्र भारताच्या इतिहासांतील सर्वांत उज्ज्वल पानावर येऊन ठेपतों. तें म्हणजे, शांततामय सहजीवन आणि तटस्थता यांवर आधारलेलें आपलें परराष्ट्रीय धोरण. आपल्या मूलभूत तत्त्वप्रणालीच्या ऐतिहासिक परंपरेचें आपण जें अर्थपूर्ण विश्लेषण केलें, त्यांत आपल्या परराष्ट्रीय धोरणाची तेजस्वी कामगिरी किती चपखल बसते! रशिया-अमेरिका यांचे संबंध आतां सुधारत असून शिखर परिषदहि भरणार आहे, व अशा रीतीनें इतिहासानें जणुं भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर आपल्या मान्यतेचें शिक्कामोर्तब केलें आहे. अशा वेळीं चिनी–भारतीय वाद निर्माण झाल्यामुळें आपल्या तत्त्वप्रणालीच्या मूळ गाभ्याविषयींच संशय प्रगट केला जात आहे, ही मात्र दुर्दैवाचीच गोष्ट.

उ. अस्वस्थ आणि आक्रमक अशा शेजाऱ्याबरोबर कांही कुरबुर निर्माण झाली, म्हणून एखादें चांगलें धोरण कांहीं लगेच वाईट ठरत नाहीं. उलट अशा गोष्टींमुळें या धोरणाला कसोटी लागते. मला खात्री आहे कीं आमचें धोरण या कसोटीला खात्रीनें उतरेल.

प्र. आपल्या या निकोप आशावादामुळें मनाला केवढा तरी धीर येतो. परंतु आपल्या शेजारी राष्ट्रांबरोबरच्या कटकटीमुळें आशियाई-आफ्रिकी सहजीवनाच्या व सहकार्याच्या बांदुंग-वृत्तीवर, न बुजणारे घाव बसले आहेत अशी आपल्या धोरणाचे टीकाकार ग्वाही देतात. आशियांतल्या शेजारी राष्ट्रांमध्यें निर्माण झालेली शत्रुत्वाची—निदान दुराव्याची भावना ही तात्पुरती, कांही काळापुरती आहे, कीं ती आतां वज्रलेप झाली आहे? आपल्याला काय वाटतें?

मला विशेषत्वानें उल्लेख करायचा आहे, तो चीन आणि पाकिस्तान यांच्या-बरोबरच्या आमच्या संबंधांबद्दल.

उ. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर आपण भारतीय किंवा इतर देशांतील लोकहि निरंतर विरोधाच्या किंवा द्वेषाच्या वातावरणांत राहूं शकत नाहीं हें उघड आहे. सर्व शेजारी राष्ट्रांबरोबर आपले स्नेहसंबंध असले पाहिजेत; तसे ते असावेत असें आपल्याला वाटतेंहि आहे हें पाकिस्तान व चीन यांच्या-बरोबरच्या वादांकडे समतोल नजरेनें पाहातांना दिसतें. पाकिस्तान आणि चीन यांच्याबरोबर मित्रत्वानें रहायचें आणि सगळ्याच शेजारी राष्ट्रांबरोबरचे, इतकेंच काय, पण साऱ्या जगाबरोबरचेहि संबंध अधिकाधिक निकटचे व सह-कार्याचे ठेवायचे असें आमचें नेहमीच धोरण राहिलें आहे. हें धोरण क्षणिक लहरींतून निर्माण झालेलें नाहीं, हें आपण ध्यानांत घ्या. आपल्या ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक परिस्थितींतून तें निर्माण झालें आहे. दुर्दैवानें कांहीं विरोध आणि अडचणी निर्माण झाल्या आहेत खरें; परंतु कुठल्याहि देशा-बरोबरचे आपले संबंध कायमचेच शत्रुत्वाचे राहतील असें गृहीत धरणें मूर्खपणाचें होईल. आम्ही तर असें मुळींच गृहीत धरीत नाहीं.

प्र. खाटमांडूला केलेल्या एका भाषणांत 'आहे कुठें तें पंचशील ?' असें आपण म्हटलें, त्यांतला सूर कांहींसा हताशपणाचा वाटला. पंचशील सांदी-कोपऱ्यांत पडलें किंवा हरवलें असें तर आपल्याला वाटत नाहीं ना ?

उ. छे ! ! तसेंच मुळींच नाहीं ! पंचशील हें हितकर आणि शहाणपणाचें तत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय वागणुकीचा तो एकमेव समंजस वाटाड्या आहे. मला म्हणायचें होतें तें एवढेंच कीं इतक्या चांगल्या तत्त्वाबद्दल लोक फक्त बडबड करतात, पण जगांत सगळे त्याप्रमाणें वागूं मात्र लागलेले नाहींत.

प्र. हें तर खरेंच. पण तिबेटच्या बाबतींत भारतानेंच चीनबरोबरच्या पंचशील कराराचा भंग केला, त्यामुळें वाद निर्माण झाला, असा चीनचा आरोप आहे. तिबेट हा चीनचा एक प्रांत आहे असें एकदां मान्य केल्यानंतर आपण तिबेटच्या बाबतींत चीनच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप केला असें चीनचें म्हणणें आहे. आपलें त्याला काय उत्तर आहे ?

ड. आम्ही तिबेटांत हस्तक्षेप केलेला नाहीं, तिथल्या बंडाला आम्ही कसलेंच उत्तेजन दिलेलें नाहीं, किंवा तसें यापुढें करायचा आमचा हेतुहि नाहीं. तिबेटमधील सुधारणांच्या बाबतींत जरा सबुरीनें घ्यावें व दडपशाही टाळावी, हें चीनला पटवून देण्यासाठीं आम्ही मित्रत्वाच्या नात्यानें आमचें वजन खर्चेण्याचा प्रयत्न केला, एवढेंच काय तें. तिबेटी लोकांना निष्ठावंत कम्युनिस्ट बनवणें अशक्य आहे; सुधारणा आवश्यक आहेत हें खरें असलें तरी त्यासुद्धां सक्तीनें लादण्यापेक्षां शिक्षणानें आणि मतपरिवर्तनानें घडवल्या तर अधिक चांगलें —हें त्यांना पटवायचा आम्ही प्रयत्न केला. याला हस्तक्षेप म्हणतां येईल काय? बंड मोडलें पाहिजे हें आम्हाला मान्य आहे. परंतु दडपशाही ही अगदीं वेगळी गोष्ट आहे. त्यांतून असा अटीतटीचा प्रसंग येतो कीं त्याची खळबळ कांठावरून पलीकडे ओसंडते आणि दलाई लामा व इतर सगळ्या तिबेटी निर्वासितांबरोबर तिचा प्रवाह इकडे वाहात येतो.

तिबेट हा अर्थातच चीनचा एक भाग आहे. पण तो चीनचा प्रांत नाहीं; तिबेटी हे चिनी वंशाचे नसून हान वंशाचे आहेत; पेकिंग सरकार तिबेट हा चीनचा केवळ एक स्वायत्त भाग मानील आणि तशी वागणूक त्याला देईल असें श्री. चाउ यांनीं आपल्या तोंडानें मला सांगितलें होतें.

अर्थात तिबेटवर आमचा कसला हक्क नाहीं, कसले हितसंबंध नाहींत. तसा आमचा दावाहि नाहीं. परंतु हिंदु आणि बौद्ध यांचें तिबेट हें एक पुण्यक्षेत्र आहे आणि भारताच्या जाणीवेचा तो एक अविभाज्य भाग बनला आहे. मानससरोवर आणि इतर तीर्थक्षेत्रें, बुद्धधर्म आणि दलाई लामांचें संस्थान यांच्याविषयीं भारतीयांना आध्यात्मिक आणि भावनात्मक प्रेमादर आहे, त्यांत राजकीय धागेदोरे नाहींत. या सगळ्या गोष्टींच्या बाबतींत दडपशाही आणि हिंसा सुरू होते, तेव्हां स्वाभाविकच साऱ्या भारतांत तीव्र अशी भावनात्मक प्रतिक्रिया होते; या प्रतिक्रियेला प्रतिसाद देण्याचें कुठल्याच सरकारला टाळतां येणार नाहीं.

तिबेटी लोक मागासलेले आहेत; सरंजामशाही युगांत वावरत आहेत; कदाचित ते हट्टी अणि ताठहि असतील. पण अशा ताठ जमातीचें मतपरिवर्तन न करतां व त्याची संमति न घेतां त्यांच्यावर सुधारणा लादणें खरोखर शक्य आहे काय? त्यामुळें भावनात्मक विरोध आणि सशस्त्र बाचाबाची हीं होणारच.

प्र. सत्तीची सुधारणा आणि मतपरिवर्तनानें सुधारणा या दोन वेगवेगळ्या तत्त्वांची इथें कसोटी लागते म्हणायची. केवळ वैचारिक कुतूहल म्हणून विचारतों, पं. नेहरू जर चीनचे पंतप्रधान असते, तर त्यांनीं या परिस्थितींत काय केलें असतें ?

उ. तिबेटी लोक आणि चिनी लोक एकमेकांचें मन ओळखूं शकत नाहींत, एकमेकांचे विचार कळावे, अशा तऱ्हेचे प्रेमाचे धागे त्यांच्यांत निर्माण झालेले नाहींत, इथेंच सारा घोटाळा आहे. असे धागे—म्हणजेच वैचारिक आणि भावनात्मक दुवे—कसेंहि करून निर्माण केले पाहिजेत. तें होईपर्यंत मी कम्युनिझम बाजूस ठेवला असता, सुधारणांचा वेग कमी केला असता, आणि मुख्य म्हणजे परस्परांमध्यें विचारांची देवाणघेवाण आणि सौहार्द निर्माण केलें असतें. जग आणि त्यांतील प्रगति यांच्यापासून कित्येक शतकें एखाद्या बेटाप्रमाणें तिबेट दूर राहिलें आहे, हें ध्यानांत घेऊन मी तिबेटी लोकांनाच स्वतःच्या सुधारणेची गति ठरवायचें स्वातंत्र्य दिलें असतें आणि त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय भावनांना शक्य तितका वाव दिला असता.

कांहीं झालें तरी तिबेटी लोक हे चिनी लोकांपेक्षां वंशानें भिन्न आहेत. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तरी चिनी व तिबेटी यांच्यामध्यें एक प्रकारचा सनातन संघर्ष दिसतो. इतिहासांत कांहीं काळांत तिबेटनेंच चीन व्यापलेला होता, आणि जेव्हां तिबेटवर चीननें ताबा मिळवलेला होता अशा कालखंडांमध्येंहि चिनी लोकांवर लामांचा फार मोठा आध्यात्मिक प्रभाव होता, हें आपल्याला माहीत आहे काय ?

पेकिंग आणि ल्हासा यांच्यामधील अंतर जर सांधायचें असेल तर हे ऐतिहासिक, वांशिक व धार्मिक घटक, त्याचप्रमाणें वैचारिक आणि भावनात्मक विरोध हे सारें नीट समजावून घेतलें पाहिजे. अशा तऱ्हेचें परस्पर-सामंजस्य निर्माण व्हावें यासाठीं आम्ही आपल्याकडून शक्य ते प्रयत्न केले. याला कांहीं हस्तक्षेप म्हणत नाहींत.

प्र. तिबेटमध्यें जो गोंधळ उडाला, त्यावरून आपल्या दृष्टिकोनाचा अचूकपणा सिद्ध झाल्यासारखाच दिसतो. पण या साऱ्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता ?

उ. मला असें वाटतें कीं चीननें तिबेटला अंतर्गत स्वायत्तता देणें हा मार्ग आहे. ऐतिहासिक, धार्मिक आणि भावनात्मक घटक बाजूला ठेवले तरी तिबेटच्या डोंगराळ भूप्रदेशामुळेंहि त्या लोकांना सतत आपल्या सत्तेखालीं किंवा दडपणाखालीं ठेवणें कोणालाहि शक्य होत नाहीं.

प्र. आपल्या परराष्ट्रीय धोरणाविषयीं मी आपल्याला या वेळेपर्यंत प्रश्न विचारले नव्हते. कारण माझ्या मतें हा एक विषय असा आहे कीं ज्याबद्दल कसल्या शंका किंवा प्रश्न निर्माणच होऊं नयेत. आपल्या देशाचे परराष्ट्रीय संबंध ज्या वेळीं आपण हाताळींत असतां त्यावेळीं आपलें व्यक्तित्व खरें तळपतें. कारण आपण साकार केलेल्या या धोरणांत आपला इतिहास, भूगोल, धर्म, संस्कृति आणि इतर परंपरा यांचें उत्तम प्रतिबिंब पडलें आहे, त्याचप्रमाणें आजच्या काळांतील प्रेरणा आणि अपरिहार्य कर्तव्यें यांचेंहि रूप त्यांत दिसतें. तटस्थता–म्हणजेच सत्तागटांपासून दूर राहणें; सर्व स्वातंत्र्य-चळवळींना—विशेषतः आशिया आणि आफ्रिका खंडांतील स्वातंत्र्यलढ्यांना विधायक पाठिंबा; साम्राज्यशाही वसाहतवाद, आणि वंशभेद यांना विरोध; शीत व उष्ण युद्धांवर उतारा म्हणून शांतीचें क्षेत्र सतत वाढवीत राहणें आणि अर्थातच जागतिक शांतीचें रक्षण व मानवी स्वातंत्र्याचा विकास हीं आपल्या परराष्ट्रीय धोरणाचीं प्रमुख तत्त्वें आतां सर्वत्र माहीत झालीं आहेत. अगदीं अलीकडे मी या विषयावर एका सुप्रसिद्ध अमेरिकन राजकीय निरीक्षकाबरोबर बोलत होतों. आयझेनहॉवर आणि ख्रुश्चेव्ह यांना शांततामय सहजीवनाच्या संदर्भात विचार करायला, किंबहुना प्रत्यक्ष कृति करायला आपण वैयक्तिक प्रयत्नांनीं उद्युक्त केलें याबद्दल त्यांनीं आपल्याला फार मोठें श्रेय दिलें. नंतर त्यांनें एक अर्थपूर्ण आणि सूचक वाक्य उच्चारलें. ते म्हणाले, "शिखर परिषदेला श्री. नेहरू हजर राहातील कीं नाहीं हा मुद्दा महत्त्वाचा नाहीं. कारण कांहीं झालें तरी शिखर परिषदेंत प्रभाव पडेल तो त्यांच्याच तत्त्वप्रणालीचा. तेच या परिषदेचे अदृश्य अध्यक्ष असतील." या संदर्भात आजच्या जागतिक आणीबाणीवर आपण एखादा मूलभूत उपाय सुचवला तर मी आपला आभारी होईन.

उ. शिखर परिषदेचा, आणि माझ्या अदृश्य, आध्यात्मिक इत्यादि इत्यादि अध्यक्षपदाचा उल्लेख करून आपण मला मोठ्या पेचांत टाकीत आहांत. मला असें कांहीं होण्याची इच्छा नाहीं हें मी आपल्याला निक्षून सांगूं इच्छितों. आमच्या परंपरा आणि देशाची स्वाभाविक प्रवृत्ती यांच्याशीं जुळणारें परराष्ट्रीय धोरण भारतानें विकसित केलें आहे आणि आजच्या ऐतिहासिक गरजा तें पुऱ्या करूं शकणारें आहे ही गोष्ट अर्थातच खरी आहे. यामुळेंच आमच्या आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याच्या तुलनेनें कितीतरी अधिक सामर्थ्य आणि महत्त्व आमच्या परराष्ट्रीय धोरणाला लाभलें आहे. सुदैवानें पश्चिम आशिया, दक्षिण आशिया आणि अतिपूर्व यांच्यामधल्या मोक्याच्या जागीं भारत उभा आहे. त्यामुळें आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या कांहीं जबाबदाऱ्या आम्हाला टाळतां येत नाहींत. आम्हीहि त्या शक्य तितक्या कार्यक्षमतेनें पार पाडायचा प्रयत्न करतों. हें सारें आहेच; शिवाय स्वतः जगायचें व दुसऱ्यालाहि जगूं द्यायचें ही प्रवृत्ति, अहिंसा, सहिष्णुता व सहजीवन या सर्व गोष्टींचें जें तत्त्वज्ञान अशोक, गांधी व इतर महान् राज्यकर्ते व विचारवंत यांच्याकडून आमच्याकडे परंपरेनें आलें आहे, तेंच आजच्या प्रश्नांवरील एकमेव व्यावहारिक उपाय जगाला देऊं शकेल, असें मला वाटतें.

प्र. तो उपाय म्हणजे पंचशील काय?

उ. होय. राष्ट्रें, धर्म आणि तत्त्वप्रणाली यांनीं शांततेनें एकमेकांबरोबर राहावें व एकमेकांमध्यें हस्तक्षेप करूं नये असें सांगणारें पंचशील. हें धोरण मूलतः शांततामय, सहकार्याचें आणि विधायक आहे, आणि त्याच्या प्रत्यक्षांतील उपयोगाचा अनुभव इतिहासांत आम्हांला लाभलेला आहे. शिवाय आजच्या काळांत तें विशेष उपयुक्त आहे. कारण युद्ध हा उपाय आणि लष्करी मार्ग हे अणु-शस्त्रांमुळें अनुपयुक्त आणि त्याज्य ठरले आहेत. जगांतल्या कांहीं सत्तांमध्यें जो बेबनाव, कडवटपणा व संघर्ष माजला आहे, त्यावर आम्ही हा उपाय सुचवूं शकतों. या सगळ्या वाईट गोष्टी नाहींशा करण्याची जादू किंवा मंत्र भारताजवळ आहे असें सूचित करणें अगदीं वेडेपणाचें ठरेल. परंतु मानवजातीचे घटक म्हणून, आंतरराष्ट्रीय तंगपणा जिच्यामुळें कमी होऊं

शकेल, आणि संघर्षांचीं बीजेंच जिच्यामुळें उखडलीं जातील, अशी योजना सुचवणें हें आमचें कर्तव्यच आहे.

प्र. अगदीं खरें. आपण जिची शिफारस करूं इच्छितां अशी योजना कोणती?

उ. हिला योजना म्हणण्यापेक्षां नवा वैचारिक दृष्टिकोण म्हणणेंच अधिक साजेल. हा दृष्टिकोण लष्करी किंवा शीतयुद्धात्मक नाहीं. तो शांततेचा दृष्टिकोण आहे, आणि त्याला अनुसरणारीं राजकीय व आर्थिक धोरणेंहि त्यांत अनुस्यूत आहेत. पंचशील तत्त्वें हा दृष्टिकोण अचूकपणें देतात, असें आमचें मत आहे. आंतरराष्ट्रीय वर्तणुकीचीं मार्गदर्शक तत्त्वें म्हणून जर पंचशीलांचा व्यावहारिक आणि परिणामकारक उपयोग व्हावयाचा असेल, तर त्यासाठीं मन आणि अंतःकरण यांमध्यें पालट झाला पाहिजे.

प्रथम एक वस्तुस्थिति नीट आपल्या मनावर बिंबवली पाहिजे : अलीकडची शास्त्रीय तंत्रविज्ञानात्मक प्रगति, तसेंच अणुअस्त्रांचा आणि अणु-उत्तर शस्त्रास्त्रांचा शोध यांमुळें आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्यासाठीं युद्धाचा उपयोग आतां पूर्णपणें बाजूला पडत आहे. कारण आजचें युद्ध म्हणजे संपूर्ण विनाश. त्यांतल्या कुठल्याच राष्ट्राला किंवा राष्ट्रगटाला विजय नाहीं कीं फायदा नाहीं. युद्ध हें एकदा मनांतून हद्दपार केलें म्हणजे मग शीतयुद्ध इत्यादि आनुषंगिक गोष्टींनाहि अर्धचंद्र दिला पाहिजे. त्यानंतर युद्धाच्या धमक्या आणि युद्धखोर पवित्रे हीं आपण पूर्णपणें बंद केलीं पाहिजेत. इतरांशीं आपले मतभेद झाले म्हणून राजकीय घोषणा, तात्त्विक निषेध, संतप्त टीका या सगळ्या माथेफिरूपणाचा अवलंब करण्याचें कारण नाहीं. आपल्या मार्गांत येणार नसतील तर, आपल्याला नापसंत असणारीं इतरांचीं मतेंहि आपण चालवून घेतलीं पाहिजेत. जगाच्या एका अर्धानें दुसऱ्या अर्धाला वाईट, दुष्ट, पापी म्हणणें हें किती वेडेपणाचें आहे हें आपण ओळखलें पाहिजे. पूर्वींच्या धार्मिक युद्धांच्या काळांत असा प्रकार चालत असे. पण नंतर स्वभावतः स्वयंव्यास धर्मांमधील झगडे थांबले आणि सहिष्णुतेची व सहजीवनाची प्रवृत्ति वाढीस लागली. त्याचप्रमाणें आज स्पर्धिष्णु तत्त्वप्रणाली व आर्थिक—सामाजिक सिद्धान्त यांनीं एकमेकांशेजारीं एकदम गुण्यागोविंदानें कां नांदू नये? आज जगांत जी

तंत्रविज्ञानात्मक क्रांति चालू आहे, तिनें तत्त्वप्रणालींमधला संघर्ष हा जणुं इतिहासजमा करून टाकला आहे, असें मला वाटतें. शीतयुद्धांत गुंतलेल्यांना ही वस्तुस्थिति दिसत नाही. म्हणूनच खरी गरज दृष्टिकोनांत बदल करण्याची आहे.

प्र. असा बदल घडून येत आहे असें आपल्याला वाटतें काय?

उ. बदल घडतो आहे. सगळेंच सतत बदलतें आहे. अमेरिका आणि रशिया यांचेंच उदाहरण घ्या. या दोन महान् सत्तांमध्यें इतक्या गोष्टी एकमेकीला समान आहेत कीं हा सगळा शीतयुद्धाचा गदारोळ अगदीं आभासात्मक आणि अस्वाभाविक आहे, असें मी नेहमीं सांगत आलों आहें. आतां हे दोन देश एकमेकांशीं बोलायला लागत आहेत. संशयानें आणि भीतीनें भरलेल्या दहा वर्षांची मोडतोड त्यांच्या पायाशीं विखुरली आहे, ती आतां नाहींशी होऊन सारें स्वच्छ होईल. एकमताचीं क्षेत्रें दृग्गोचर व्हायला लागतील. मतभिन्नतेचें क्षेत्र अगदींच क्षुद्र होतें आणि शीतयुद्धांतील शोकांतिका आणि नाश हीं घडण्याची मुळींच जरुरी नव्हती हेंहि कदाचित् त्यांना दिसून येईल. माझ्या मतें मूलभूत असलेली ही गोष्ट एकदां ध्यानांत आली म्हणजे युद्धाला कारणीभूत होणारें भय आणि संशय हीं दोघांच्याहि मनांतून धुवून जातील आणि त्यांच्या ऐवजीं दुसऱ्याच्या मनाची जाणीव आणि सहिष्णुता यांनीं हीं मनें कदाचित् भरून जातील. हें एकदां झालें म्हणजे निःशस्त्रीकरण, अण्वस्त्रबंदी आणि इतर गोष्टी आपोआप घडायला लागतील. मला त्याबद्दल संदेह नाहीं.

आतां जर्मनीचें उदाहरण घेऊं. शिखरपरिषदेंत आणि इतरत्रहि वादाचा मुख्य मुद्दा हाच आहे. शांतता असो, युद्ध असो कीं आणखी कांहीं असो, कुठल्याहि गोष्टीचें संयोजन करण्याचें विलक्षण कौशल्य जर्मनांचे अंगीं आहे. आज जर्मनीच्या मित्र राष्ट्रांच्या मनामध्येंच त्याच्याविषयीं फार मोठें भय आहे, हें मला माहीत आहे. इतिहासाची पुनरावृत्ति होईल आणि आपल्यावर पुन्हा आक्रमण होईल, हें तें भय आहे. हें भय अगदीं वास्तव आहे. पण मी त्याविषयीं कांहींजणांजवळ बोललों तेव्हां मला आढळून आलें कीं दुसऱ्या बाजूला, सोविएत युनियन आक्रमण करील असें तितकेंच मोठें भय वाटत आहे. म्हणजे साराच

भय आणि संशय यांचा गोंधळ आहे. आपल्याला जें करायची भीति वाटते, त्याच गोष्टी यामुळें आपल्या हातून घडत असतात. तेव्हां भीति आणि संशय या गोष्टी जगांतून उखडून टाकणें हें आपलें मुख्य काम आहे.

अशा तऱ्हेनें अनेक समस्या एकमेकांवर उतरंडीसारख्या रचल्या गेल्या आहेत. पण योग्य तऱ्हेनें त्या हाताळल्या, तर त्या सोडवतां येतील. लष्करी धमकावण्या, युद्ध, चढाईखोर पवित्रे इत्यादींनीं हें साधणार नाहीं. त्यासाठीं शांततेचा आणि सहकार्याचा मार्गच उपयोगी पडेल. त्यासाठीं दोन गोष्टी मनांत बिंबवल्या पाहिजेतः युद्धावर पूर्णपणें बंदी घातली गेली पाहिजे ही पहिली. दुसरी गोष्ट, सगळे लढ्यांत पडलेले प्रश्न शांततेनें वाटाघाटी करून सोडवले पाहिजेत ही. यासाठींहि सहजीवनाचें आवश्यक असें वातावरण निर्माणच करावें लागेल. मी पुन्हा पुन्हा सांगत असतों त्याप्रमाणें, शांतता म्हणजे युद्धापासून केवळ देहानें दूर राहाणें नव्हे. तंग वातावरणांत सैलपणा, मोकळेपणा आणण्याचा प्रयत्न त्यांत अंतर्भूत असतो. साऱ्या जगावर शांततेची अशी सौम्य प्रभा त्यासाठीं पसरावी लागते.

प्र. असें वातावरण निर्माण करण्यासाठीं भारत काय करीत आहे ?

उ. विरोधी राष्ट्रगटांमध्यें पूल बांधायचें, दुवे निर्माण करण्याचें, आणि त्याच वेळीं शांततेचें क्षेत्र वाढवण्याचें धोरण आम्ही नेहमीच ठेवलेलें आहे.

प्र. सहजीवनाचे पूल आणि दुवे ?

उ. होय. आम्ही नेहमीच सहजीवनाचा प्रचार करीत असतों.—राष्ट्रीय जीवनांत आणि अर्थात् आंतरराष्ट्रीय जीवनांतहि. हें सहजीवनाचें तत्त्व म्हणजे काय ? विरोध आणि विसंगति यांमध्यें समन्वय घालणारा, वेगवेगळे धर्म, तत्त्वप्रणालि, राजकीय, सामाजिक, व आर्थिक पद्धति यांना समजून घेणारा व त्यांच्या अस्तित्वाचा स्वीकार करणारा; आणि आपल्या विचारांतून संघर्ष व लष्करी उपाययोजना या कल्पना पूर्णपणें काढून टाकणारा असा हा सहजीवनाचा दृष्टिकोण आहे. भारत हा एक विशाल देश आहे. अनेक धर्म, भाषिक गट, अनेक विचार, जीवनाच्या वेगवेगळ्या पद्धति येथें आहेत. त्यामुळें राष्ट्र म्हणून आपलें अस्तित्व

टिकविण्यासाठीं सहजीवन हा एकमेव आणि अपरिहार्य मार्ग आहे. कदाचित् यामुळेंच—अनुभवांतून निर्माण झालेल्या ऐतिहासिक अशा कारणामुळेंच, आंतरराष्ट्रीय झगडे आणि ताण यांच्याबाबतींत सहिष्णुता बाळगणारा सहजीवनाचा दृष्टिकोण आम्ही मांडीत आहोंत; त्याची इतरांना शिफारस करीत आहोंत.

प्र. ब्रिटिशांशीं झगडून त्यांना घालवून दिल्यानंतरहि त्यांच्याबरोबरचा राष्ट्रकुल संघटनेचा दुवा आपण निर्माण केला याबद्दलच्या वादाला उत्तर म्हणतां येईल अशी कल्पना यावरून माझ्या मनांत आली. सहजीवनाचें आमचें तत्त्व आणि पूल बांधण्याचें व दुवे जुळवण्याचें त्यांतलें महत्त्वाचें काम यांतच राष्ट्रकुल संघटनेच्या आवश्यकतेचें उत्तर शोधतां येईल काय ?

उ. शांततामय सहजीवन हेंच जिच्या मुळाशीं आहे, अशी राष्ट्रकुल ही मुक्त व बंधहीन संघटना आहे. सहकार्य आणि सल्लामसलत यांच्यासाठीं राष्ट्रांना एकत्र आणणारा तो एक पूल किंवा दुवा आहे. करार किंवा गट हे अधिक बंधनकारक असतात. त्यांपेक्षां अशा संघटना कितीतरी चांगल्या. राष्ट्रकुलांत स्वतंत्र राष्ट्रें, लष्करी किंवा इतर कसलीं बंधनें न स्वीकारतां एकत्र येतात. यांतून अहित होण्याची शक्यता नसते.

प्र. अशी आपण आशा करूं या. राष्ट्रकुलाबरोबरच्या आपल्या संबंधामुळें, नव्यानें स्वतंत्र झालेल्या आशियाई आणि आफ्रिकी राष्ट्रांचें नेतृत्व संभाळणें आपल्याला अडचणीचें होईल; दक्षिण, पश्चिम व मध्य आफ्रिकेंतील वंशद्वेषी व फॅसिस्ट घटनांविरुद्धच्या आपल्या निषेधाची धार बोथट होईल, अशी भीति कांहीं गोटांमध्यें व्यक्त केली जाते.

उ. अशीं बंधनें किंवा मर्यादा आम्हाला तरी जाणवत नाहींत. आपल्याला माहीतच असेल कीं खुद्द लंडनमध्यें मी दक्षिण आफ्रिकेंतील वंशभेदाचा निषेध केला आहे, आफ्रिकेंतील स्वातंत्र्य व वंशसमानता यांचा आमचा पुरस्कार ही आमच्या ऐतिहासिक परंपरेंतून निर्माण झालेली स्वाभाविक प्रेरणा आहे. आम्हाला नेतृत्वाची, किंवा एखाद्या देशावर सत्ता गाजवण्याची हांव नाहीं. आज घडत असलेल्या इतिहासांतली सगळ्यांत महत्त्वाची घटना, म्हणजे

आशियांतील नवी जागृति. या घटनेचा आमच्यावर परिणाम होणारच. आम्ही हिंदी महासागराच्या केंद्रस्थानीं राहत आहोंत. भौगलिक दृष्ट्या आशिया आणि आफ्रिका यांच्या बरोबर मध्यभागीं आहोंत. आशियांतील नवजागृतीच्या आंदोलनाचा आणि क्रांतीचा आम्ही एक भाग आहोंत. इतिहासांतल्या या महान् घटनेचा परिणाम आमच्यावर झाल्याशिवाय कसा राहील? आपण स्वतंत्र झालों; वसाहातवादी शृंखलांमधून अनेक देश आज मोकळे होत आहेत. साहाजिकच आम्ही एकत्र येत आहोंत; पश्चिम, पूर्व व आग्नेय आशियांमधील व अर्थात् आफ्रिकेमधीलहि देशांशीं असलेले आमचे प्राचीन काळचे संबंध आम्ही पुनः प्रस्थापित करीत आहोंत.

ऐतिहासिक प्रक्रिया राष्ट्रकुलाशीं असलेल्या आमच्या दुव्यांमुळें अडणार नाहीं. उलट या प्रक्रियेला त्याच्यामुळें मदतच होते. हें कांहीं 'ब्रिटिश' किंवा तशा प्रकारचें राष्ट्रकुल नाहीं. राष्ट्रकुल या नांवामुळेंच साम्राज्यशाहीशीं त्याचा नसलेला संबंध सिद्ध होतो. राष्ट्रकुलांतील राष्ट्रें व त्यांच्या लोकसंख्या यांचा जरी विचार केला, तरी नव्यानें स्वतंत्र झालेलीं अनेक आशियाई व आफ्रिकी राष्ट्रें आणि जनसमूह या संघटनेंत येत आहेत असें दिसतें. हें सारें अतिशय उपकारक आहे.

प्र. या प्रकरणाचा सारांश मांडायचा झाला तर, जवाहरलाल नेहरू हे एक-सप्तमांश मानवजातीचे घटनात्मक नेते आणि दैवत आहेतच, शिवाय जागतिक क्षेत्रांत ते दुहेरी भूमिका करीत आहेत. त्यांतली एक भुमिका आंतराष्ट्रीय सहजीवनाच्या प्रतीकाची आहे. कम्युनिस्ट जगांत स्टॅलिनविरोधी गटाचे व श्री. ख्रुश्चेव्ह यांचे पुरस्कर्ते आणि कम्युनिस्टांना साचेबंदपणा सोडून अधिक विमुक्त, सौम्य व्हायला उद्युक्त करणारें एक व्यक्तिमत्व ही श्री. नेहरू यांची दुसरी जागतिक भूमिका आहे. परराष्ट्रीय संबंधांच्या बाबतींत आपली कृति व वक्तव्यें यांचें विश्लेषण अशा तऱ्हेनें करणें आपल्याला कितपत मान्य होईल?

उ. मी स्वतःबद्दल बोलावें अशी तर तुमची अपेक्षा नाहीं ना!

प्र. माफ करा. हाच मुद्दा मी आपल्यापुढें वेगळ्या स्वरूपांत मांडतों. स्वातं-

६

मराठी ग्रंथ ... ठाणे. स्थळप्रत.

न्याच्या काळांत अंतर्गत बाबतींत भारतानें काय प्रगति केली आहे याचा आपण विस्तारानें आढावा घेतला. अशाच तऱ्हेनें आमच्या परराष्ट्रीय धोरणाच्या यशापयशाचा अहवाल आपण द्याल का ?

उ. अशा विषयाच्या बाबतींत निश्चित व कांटेकोर विधानं करणें कठीणच असतें. उदाहरणार्थ, जगांतील तपातणी कमी व्हावी व शांततामय वातावरण निर्माण व्हावें यासाठीं शक्य तेथें आम्ही कळकळीचे प्रयत्न करीत आलों आहोंत. कोरिया, इंडोचायना आणि सुवेझ येथील युद्धांमध्यें वाटाघाटींनीं तडजोड व्हावी आणि युद्धपरिस्थिति संपावी यासाठीं झालेल्या हालचालींमध्यें आमचाहि भाग होता. शीतयुद्धांत गुंतलेलीं बडीं राष्ट्रं घेतलीं, तर त्यांनीं विचाराची नेहमीची चाकोरी सोडून विरोधी पक्षाचा दृष्टिकोणहि समजावून घ्यावा यासाठीं आम्ही प्रयत्न केले आहेत. केवळ काळा आणि पांढरा या दोनच रंगांचें हें जग नाहीं. सगळीकडे पिंगट रंग सुद्धां आहे, तेव्हां आशियाई लोकांना दोहों-पैकीं कुठल्या तरी एका गटाला किंवा तत्त्वप्रणालीला बांधून घेतलेंच पाहिजे असें नाहीं; याची जाणीव कम्युनिस्ट व कम्युनिस्टेतर राष्ट्रांना करून देण्यांतहि आमचा वांटा आम्हीं उचलला आहे. तिसऱ्या तत्त्वप्रणालीला जगांत जागा आहे, लढ्यांत पडलेल्या गटांमध्यें आम्ही जें शांतता–क्षेत्र निर्माण करायचा व वाढवण्याचा प्रयत्न केला, त्यालाहि जागा आहे. यामुळें विरोधी गटांमध्यें एक प्रकारचा पूल निर्माण झाला. ख्रुश्चेव्ह इथें आले तेव्हां त्यांना कळलें कीं कम्युनिस्टबाह्य जगांत आपलें स्वागत करणारे, आपल्याशीं सहकार्य करूं पाहा-णारे आणि कम्युनिस्ट जगाकडून अशाच वागणुकीची अपेक्षा करणारे प्रदेश आहेत. आयझेनहॉवर येथें आले तेव्हां त्यांनाहि दिसून आलें कीं आम्ही जरी कुठल्याहि गटापासून अलिप्त असलों तरी या देशांतील लोकांना आपल्याविषयींहि स्नेहभावना आहे. या दोन्ही तत्त्वप्रणालींना असलेला कठोर काटेरीपणा या अनुभवांमुळें बहुधा कमी झाला असेल.

अर्थात् कांहीं वेळां आमच्या धोरणाला अपेश घ्यावें लागलें आहे. तात्पुरती पीछेहाट पत्करावी लागली आहे. पाकिस्तानबरोबरचे आमचे संबंध बिघडलेले होते. आतां ते सुधारत आहेत. आतां चीनहि या चित्रांत डोकावत आहे. सीमेविषयींची कटकट निर्माण झाली आहे. शिवाय

गोवें व पोर्तुगाल यांचें प्रकरण आहेच. पण त्यांतहि महत्त्वाची गोष्ट अशी कीं हे प्रश्न शांततेनें सोडवायचा आमचा इरादा आहे.

प्र. —आणि इतर जगापुढें एक आदर्श ठेवण्याचाहि इरादा?

उ. तें मला माहीत नाहीं. परराष्ट्रीय धोरण हें अंतर्गत परिस्थिति आणि घडामोडी यांच्यावर अवलंबून असतें. आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्यें भारताला परिणामकारक कामगिरी करायची असेल, तर त्यासाठीं अंतर्गत एकजूट आणि मजबूत आर्थिक परिस्थिति यांची आवश्यकता आहे.

प्र. आतां या विभागांतला अखेरचा प्रश्न. चीननें निर्माण केलेल्या नव्या परिस्थितीमुळें भारतीय तटस्थतावाद किंवा अलिप्ततावाद चुकीचा ठरला आहे, अशी टीका केली जाते. आपलें या टीकेला काय उत्तर आहे?

उ. चीनचा विषय बाजूस ठेवला तर अलीकडच्या घटनांनीं भारताची भूमिका अधिक बळकट केली आहे. प्रथम एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. आमचें धोरण तटस्थतेचें नाहीं. आपण तटस्थ राहूं शकतों ते फक्त युद्धाच्या काळांत. शांततेच्या काळांत एखादें राष्ट्र 'तटस्थ' आहे असें म्हणणें म्हणजे इतर देश युद्धयमान स्थितींत आहेत, एकमेकांवर शस्त्र परजीत आहेत असें गृहीत धरणें! आमचें धोरण हें लष्करी गटांच्या बाबतींत अलिप्त राहाण्याचें आहे. सगळ्याच देशांनीं समोर ठेवण्यासारखें शहाणपणाचें धोरण आहे हें. जागतिक शांततेच्या कार्याला सर्वांत अधिक उपकारक असें हें धोरण आहे. सारी मानवता ज्यामुळें नष्ट होईल, असें महायुद्ध आज त्याज्य आहे, ही मूलभूत गोष्ट एकदां मान्य केली म्हणजे मग, शीतयुद्धाच्या वृत्तींतून निर्माण होणारे लष्करी गट हेहि त्याज्यच आहेत हें आपोआप सिद्ध होतें. एकमेकांना वाव देणें, संभाळून घेणें, आंतरराष्ट्रीय प्रश्नांची उकल शांततेनें करणें हें आज जगांतल्या मोठ्या आणि छोट्या—सगळ्याच देशांचें उद्दिष्ट झालें आहे. परंतु हें वातावरण लष्करी गट निर्माण करूं शकत नाहींत, म्हणून ते त्याज्यच ठरतात.

प्र. या लष्करी गटांचें एकंदर चित्र आज मोठेंसें आनंददायक किंवा निकोप वाटत नाहीं हें खरेंच!

उ. एखादा माणूस खोटें बोलतो म्हणून सत्य पराभूत झालें असें म्हणतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच, आंतरराष्ट्रीय वर्तनाचे नियम या किंवा त्या देशानें नीट पाळले नाहींत यामुळें पंचशीलांप्रमाणेंच अलिप्ततावाद हा कांहीं पराभूत ठरत नाहीं. पंचशील हें आंतरराष्ट्रीय संबंधांचें अगदीं उघडपणें उचित असें तत्त्वज्ञान आहे आणि कांहीं देश हें तत्त्व पाळींत नाहींत एवढ्यासाठीं तें सोडून द्यायचें असा आमचा मुळींच इरादा नाहीं. त्याचप्रमाणें इतर एखाद्या देशाच्या वर्तणुकीवर आमचा अलिप्ततावादहि अवलंबून नाहीं. आमच्या बाबतींत ऐतिहासिक दृष्ट्या अपरिहार्य असें तें तत्त्व आहे आणि आम्ही तें पाळणार आहोंत.

.९.

# नेहरूंनंतर काय ?

प्र. आतां आपल्याविषयीं कांहीं वैयक्तिक प्रश्न मी आपल्याला विचारले तर आपण मला क्षमा कराल अशी आशा आहे. त्यांच्यामुळें आपल्याला अवघडल्यासारखें वाटेल. आपल्यासारख्या मोठ्या पदावरील व्यक्तीला टाळतां येणार नाहींत, जशा वादांशीं ते निगडित झालेले आहेत. श्री. नेहरू आतां म्हातारे झाले, थकले, भागले. वाईट गोष्टींनीं भरलेल्या जगाशीं तडजोड करायला, वास्तव परिस्थितीनें श्री. नेहरूंना भाग पाडलें आहे; जिवंत आहोंत तोंपर्यंत कसेंबसें गाडें हाकललें पाहिजे अशी त्यांची अलीकडे वृत्ति झाली आहे, नेहरू गेले कीं सगळें खलास!—हें मी फार बटबटीत शब्दांत मांडलें आहे खरें; पण 'नेहरूंनंतर कोण—किंवा काय?' हा प्रश्न अधिकाधिक निकडीचा आणि ज्वलंत होत जातो आहे. आपण त्याविषयीं चर्चा करायला तयार आहांत काय ?

उ. हा प्रश्न ज्या तऱ्हेनें मांडला जातो ती पद्धत पूर्णपणें चुकीची आहे असें मला वाटत असतांना मी त्याची चर्चा ती कशी करणार ?

प्र. कदाचित् तसें असेल, पण आपले चरित्रकार फ्रँक मोराइस अगदीं याच नांवाचें एक पुस्तक लिहीत आहेत.

उ. तसें असलें तरी, या पद्धतीची, निरर्थक अनुमानांची केवळ हवेंतली चर्चा अगदीं चुकीची आहे. भविष्यांत दृष्टि लावून पुढें काय होणार तें पाहण्याचा प्रयत्न पत्रकारांनीं केला तर ठीक आहे. इतरांप्रमाणें अंदाज करण्याची मोकळीक त्यांनाहि आहे. पण 'नेहरूंनंतर कोण?' हा प्रश्न जर वैयक्तिक संदर्भांत

विचारला जात असेल तर तो अगदीं चुकीचा, निर्बुद्धपणाचा आहे. उलट, आज असलेली परिस्थिति आणि पुढें भविष्यांत निर्माण होणारी परिस्थिति यांचा ऊहापोह कोणाला करावासा वाटलाच, तर तो मात्र एवढा अप्रस्तुत ठरणार नाहीं.

प्र. हें ठीक. आपण असा ऊहापोह करणार नाहीं काय ?

उ. त्या अर्थानें नाहीं. त्याचा कांहीं उपयोग आहेसें मला वाटत नाहीं. कांहीं व्यक्ति निवडून त्यांना 'तयार' करण्यांत मला गोडी नाहीं. अर्थात् योग्य माणसांना शिक्षण मिळणें वगैरे गोष्टी मला आवश्यक वाटतातच. पण माझा वारस ठरवण्याच्या अर्थानें मात्र मला विचार करणें अशक्यच आहे. याच्या पाठीमागचें तर्कशास्त्र मला कळत नाहीं. समजा, वारस म्हणून कोणाचें तरी नांव मी जाहीर केलें तरी त्याचा काय उपयोग ? मी केलेल्या नेमणुकीची पर्वा जनतेनें कां करावी ? समजा, मी सांगितलेल्या व्यक्तींचें नेतृत्व जनतेनें पत्करलें, तरी तोंपर्यंत परिस्थितीच कदाचित् साफ पालटलेली असेल.

प्र. पण गांधीजींनीं आपला वारस म्हणून आपलें नांव जाहीररीतीनें सांगितलें नव्हतें का ?

उ. गांधीजींनीं दोनतीन प्रसंगीं माझें नांव घेतलें होतें हें खरें. पण मी आज विशिष्ट पदावर येऊन काम करीत आहें तो कांहीं केवळ गांधीजींच्या शिफारशीमुळें नव्हे. वीस ते तीस वर्षांपूर्वी राष्ट्रीय चळवळीशीं माझा संबंध आला, तेव्हांपासून घडलेल्या अनेक घटना, देशकार्यांत आणि आंदोलनांत मी घेतलेला भाग इत्यादींमुळें या पदावर मी आलों. अर्थात् गांधींच्या आशीर्वादाचा प्रभाव जनमनावर निश्चितच पडला, या बाबतींत शंका नाहीं.

तेव्हां, माझा वारस म्हणून मी कोणाला नेमावें किंवा या वा त्या व्यक्तीला 'तयार' करावें अशा तऱ्हेचा हा प्रश्न नाहीं. आजच्या बदलत्या परिस्थितींत आपल्या विकासाचा पाया आपण कितीसा मजबूत बांधला आहे, ही खरी मुद्याची गोष्ट आहे. अशा तऱ्हेनें लोकशाहीप्रधान, निधर्मी, व समाजवादी पाया पक्का भरला असेल, म्हणजेच, आपलीं ध्येयें व दृष्टिकोण हीं आत्मविश्वासाच्या

खोल व अचल पायावर उभीं असतील, तर उद्यां देशकार्याचीं सूत्रें कोणाच्या हातांत जाणार याबद्दल मला मुळींच काळजी वाटायचें कारण नाहीं. पाया असणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट. कारण तो नसेल, तर इमारत बांधायची कशावर ? मग कांहींच होणार नाहीं.

प्र. अगदीं खरें; हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा निघालाच आहे, तर मीं मध्येंच एक प्रश्न विचारतों त्याबद्दल माफ करा. भारताचा योग्य दिशेनें विकास आणि राष्ट्रीय धोरणाचें सातत्य टिकणें या दृष्टीनें 'योग्य पाया' असें आपण नक्की कशाला म्हणाल ?

उ. प्रथम, प्रौढ मतदान आणि लोकशाही कारभारयंत्रणा—म्हणजेच संसदीय लोकशाही. दुसरें, लोकशाहीला आधार देणारा निधर्मी दृष्टिकोन. पंचवार्षिक योजना, औद्योगीकरण व पायाभूत उद्योगधंदे, विशेषतः यंत्रें तयार करणारे कारखाने; आपल्या अर्थव्यवस्थेंतील मोक्याचीं शिखरें दक्षतेनें संभाळणारें राष्ट्रीय क्षेत्र आणि स्वावलंबी, स्वयंसिद्ध व स्वयंचलित अर्थव्यवस्थेची पूर्वसामग्री यांतून निर्माण होणारा आर्थिक विकासाचा पाया. दुसऱ्या शब्दांत, टप्प्या टप्प्यानें आणायचें आर्थिक समानीकरण आणि सामाजिक न्याय या तत्त्वांवर आधारलेली समाजवादी समाजव्यवस्था हेंहि आपलें उद्दिष्ट आहे.

प्र. मी आपला आभारी आहें. असा पाया घातला गेला आहे असा आपला विश्वास आहे काय ?

उ. त्याविषयीं आपण फक्त अंदाज करूं शकतों. पाया घालण्याचें काम सतत चाललेलें आहे. पण त्याच बरोबर फुटीर आणि विध्वंसक शक्तींचेंहि कार्य चालू आहे. कारण या क्षणीं भारतांत इतिहासाचीं कित्येक शतकें जिवंत अवस्थेंत दिसतात. आणखी पुढें जाऊन आपण असेंहि म्हणूं शकूं कीं आज विसाव्या शतकाच्या मध्यावर कांहीं आदिवासी जमाती अश्मयुगांत राहात आहेत. दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर कांहीं सामाजिक प्रेरणा हळुहळु वाढत आहेत. आपण त्यांना उजवे, डावे, मध्यममार्गी म्हणा, किंवा पुरोगामी, स्थितिप्रिय, किंवा प्रतिगामी म्हणा—हे शब्द सुद्धां अनेकदां फारसें साहाय्य करीत नाहींत.

पण विशेष दक्षता आपण घेतली पाहिजे ती फॅसिस्ट प्रवृत्तींबद्दल. फॅसिस्ट हा शब्द ते वापरणार नाहींत, पण त्यांचा दृष्टिकोण त्याच प्रकारचा आहे. देशांत गोंधळ माजणें, राज्ययंत्रणा मोडून पडणें यासारख्या कुठल्याहि घटनेचा फायदा घेऊन ते सत्ता काबीज करूं पाहातील. या सार्‍या प्रवृत्ति इथें आहेत. आपला त्याला इलाज नाहीं. अशा कुठल्याहि प्रसंगीं उपयोगी पडतील अशा सुरक्षित-तेच्या उपायांचाच आपण विचार करूं शकतों. सुरक्षिततेची हमी आपल्याला कोठें सांपडेल? याला उत्तर 'योग्य पाया' हें आहे. हा पाया असला म्हणजे देशाच्या बाबतींत कोणी वाटेल ते खेळ खेळणार नाहींत.

आतां पाकिस्तानांतच पाहा.—मी केवळ उदाहरण म्हणून पाकिस्तानबद्दल बोलतों आहें. पाकिस्तानवर मला टीका करायची नाहीं. इतक्या वर्षांत पाकिस्तानांत योग्य पाया निर्माण होत गेला नाहीं. पाकिस्तानी माणसें आपल्या-प्रमाणेंच चांगलीं आहेत; भारत आणि पाकिस्तान यामध्यें फरक आहे तो असा: भारतांतील राष्ट्रीय आंदोलनाचे नेते स्वातंत्र्यासाठीं झगडलेले व त्या झगड्याचे संस्कार मनावर घेतलेले असे असल्यामुळें जनतेशीं त्यांचा घनिष्ठ संबंध राहिला. त्यामुळेंच लोकांच्या सामाजिक–आर्थिक आकांक्षांना प्रतिसाद देणारें सामाजिक धोरण निर्माण झालें. उलट पाकिस्तानांत नेते म्हणून ज्या व्यक्ति पुढें झाल्या, त्यांचा राष्ट्रीय आंदोलनाशीं कांहींहि संबंध नव्हता. मुख्यतः ते जमीनदार वर्गाचे प्रतिनिधि होते. त्यामुळेंच कसलाहि बदल घडवून आणायला सरकार राजी नव्हतें. उलट कांही लोकांचे हितसंबंध सांभाळायचीच त्यांची इच्छा होती. सार्‍या जनतेच्या संदर्भांत त्यांना —अर्थात् भारत–विरोध सोडला तर—कसलाच पाया नव्हता.

म्हणून सारख्याच पातळीवर—अगदीं सारख्या पातळीवर नसेल तर निदान सारख्याच नागरिकांनिशीं—भारत व पाकिस्तान यांनीं सुरुवात केली असली, तरी दोहोंमधला फरक वाढतच गेला. जनता दोन्हीकडे सारखीच आहे; पण पाकिस्तानांत नेते आणि जनता यांमध्यें कसलें नातें नाहीं. एखादा नेता लोकप्रिय असेल किंवा नसेल. मी व्यक्तींच्या लोकप्रियतेविषयीं मी बोलत नाहीं आहें. जनता आणि नेतृत्व यांच्यामधल्या मूलभूत दुव्याविषयीं मी बोलत आहें. कांहीं म्हटलें तरी हा दुवा भारतामध्यें शाबूत आहे. नाना तर्‍हेची

दुर्बलता, चुका आणि उणीवा असूनहि राष्ट्राचा विश्वास आणि शक्ति टिकून आहे, ती या दुव्यामुळेंच. सातत्य, वारसा इत्यादि बाबतींत व्यक्तींच्या संदर्भात मला मुळींच चिंता नाहीं. अर्थात् मला चांगल्या व्यक्ती पाहिजेतच. मी त्यांचा नेहमीं शोध घेत असतों. परंतु माझ्या दृष्टिकोनांतून, विशालतर राष्ट्रीय व जनतानिष्ठ पाया हा कितीतरी अधिक महत्त्वाचा आहे.

.१०.

# भविष्यकाळाचें आव्हान

प्र. अशोक, अकबर, गांधी इत्यादि भारतीय महापुरुषांच्या सर्वांत महत्त्वाच्या कार्याविषयीं आपण कुठेंतरी बोललां होतां, तें मला आठवतें आहे. वेगवेगळ्या धर्मांमध्यें आणि तत्त्वप्रणालींमध्यें त्यांनीं ज्या मार्गानें सामंजस्य निर्माण केलें त्यांत त्यांचा मोठेपणा आहे आणि आजच्या आपल्या काळांतल्या विरोधी शक्तींमध्यें असाच समन्वय घडवण्याचा मान भारताला मिळण्याचा संभव आहे असें आपण म्हणालां होतां. हा संभव प्रत्यक्षांत मूर्त होण्याच्या दृष्टीनें काय करावें असें आपलें मत आहे?

उ. आपण सांगितलेलें विधान मीं केलें, तेव्हां स्वतःविषयींचा किंवा आजच्या भारतीयांच्या पिढीचाहि विचार माझ्या मनांत नव्हता. मी भविष्यकाळाविषयीं कांहीं अंदाज बांधीत होतों. एका बाजूला भांडवलशाही किंवा भांडवलदारी लोकशाही आणि दुसऱ्या बाजूला साम्यवाद या दोन पूर्णपणें परस्परविरोधी बाजूंकडेच उत्पादन व वांटणी या प्रमुख मुद्यांविषयींच्या दृष्टिकोणांची मक्तेदारी आहे असें नाहीं. या बाबतींत एक तिसरा दृष्टिकोणहि आहे. रशियन, अमेरिकन आणि इतरहि अनेक पद्धतींमधलें जें जें चांगलें असेल तें घेणारा आणि त्यांच्या साहाय्यानें स्वतःचा राष्ट्रीय इतिहास आणि तत्त्वज्ञान यांच्याशीं जुळणारा असा मार्ग शोधणारा हा दृष्टिकोन आहे—हें जगाला दाखवून देण्याचें काम आम्ही कांहीं प्रमाणांत नक्कीच केलें आहे.

आर्थिक पातळीवर आम्ही लोकशाही समाजवादी व्यवस्थेखालीं नियोजनाचा प्रयोग करीत आहोंत, तो जवळजवळ साऱ्या जगभर समजून घेतला जात आहे आणि त्याचें कौतुक होत आहे. आशियाई आणि आफ्रिकन राष्ट्रांपुढें

आर्थिक विकासाचा एक नवा मार्ग ठेवला गेला आहे. एक सूचक गोष्ट अशी कीं जगांतल्या दोन्ही राष्ट्रगटांमधले—विशेषतः ज्यांना आर्थिक नियोजनाची कल्पनाच परकी आहे अशा पाश्चात्य देशांमधले—जे अर्थशास्त्री आणि इतर तज्ञ आहेत, यांना आमच्या विकासयोजना आणि आमची प्रगति यांच्याविषयीं अतिशय कुतूहल आहे. आम्ही या विकासाकडे बारकाईनें लक्ष देत आहों. आम्ही फार मोठ्या प्रमाणावर हा प्रयोग चालवला आहे, आणि त्याच्या पाठीमागें मुद्देसूद विचार आहे. त्यामुळें भारत हें विरोधी तत्त्वप्रणालींच्या समन्वयाचें, संगमाचें एक प्रकारचें क्षेत्रच झालें आहे. त्याबद्दल फार वढाया न मारतांहि आम्हाला दावा करतां येईल कीं इतक्या भव्य, निर्मितिक्षम मार्गानें असें काम करणारा हा एकमेव अविकसित देश आहे.

प्र. गेल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक कार्यांच्या कारकीर्दीमध्यें भारतानें जी प्रगति केली तिचें आज आयुष्याच्या संध्याकाळीं सिंहावलोकन करतांना आपल्या राष्ट्रावरील आपला विश्वास, भारतीयांविषयींची खात्री, आणि भारताच्या भवितव्याविषयीं आपला आशावाद हीं पूर्वींइतकींच उत्कट आहेत असा निष्कर्ष काढणें योग्य ठरेल काय ?

उ. या प्रश्नाचें उत्तर आपण आतां वापरलेल्या विश्वास, खात्री, आशावाद या शब्दांवर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून आहे. आजहि आयुष्याच्या सायंकाळीं या तीन्ही गोष्टी पूर्वीं होत्या, तितक्याच दृढ आहेत. एकंदर भारतीय जनतेविषयीं अतिशय विश्वास, विलक्षण खात्री मला नेहमी वाटत आली आहे. मी त्यांची निर्भर्त्सना करतों, त्यांना नांवें ठेवतों—अनेकदां. परंतु त्यांच्याजवळ कांहींएक विशिष्ट गुणवत्ता, विशिष्ट व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या हातून काम करवून घेणारी मूलभूत सांस्कृतिक परंपरा त्यांना लाभली आहे. मी एकंदर जनतेविषयीं बोलतों आहें; कांहीं व्यक्तींबद्दल नव्हे. ही जनता सनातनी असेल, औद्योगिक तंत्रांत मागासलेली असेल; पण ती सुधारूं शकेल. शिकूं शकेल. पण याहून अधिक महत्त्वाचें आणि लक्षवेधक असें कांहींतरी त्यांच्याजवळ आहे. तें म्हणजे व्यक्तित्वाची विशिष्ट गुणवत्ता. त्यांच्या आणि आपल्याहि दृष्टीनें ती फार मोलाची आहे. माझ्यापुरतें बोलायचें तर, या

जनतेबरोबरच्या नात्यांतूनच मला सामर्थ्य आणि स्थिरता लाभते. त्यांना अगदीं एवढेंसें प्रेम व मदत हीं तुमच्याकडून मिळालीं, तरी त्या साऱ्याची घसघशीतपणें ते परतफेड करतात.

आपण माझ्या आशावादाचा उल्लेख केलात. मी मूलतः अशावादी आहें, आणि ही वृत्ति बदलण्याचें कांहींहि कारण मला सापडलेलें नाहीं. आपण काम करीत असतांना, ठरलेलें काम ठरलेल्या पद्धतीनें एखाद्या यंत्राप्रमाणें चाकोरींत राहून करूं शकतों—मग तें काम पंतप्रधानाचें असो किंवा दुसरें कसलें असो. असें काम करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसें पाहिलें तर प्रत्येकाला काम करतांना ऐशीं ते नव्वद टक्के काम यंत्राप्रमाणें करावें लागतेंच. पण प्रत्येकाला आपल्यापुढील कार्याची जाणीव हवी. उणीव आणि अपयश आलें तरीहि आपण मोलाचें कांहीं तरी करण्याची प्रेरणा व आंच आपल्याला असली पाहिजे. काम करीत असतांना त्याच्या आनंदानें मन थरारून गेलें पाहिजे. कामांतला हा चैतन्यमय भाग नाहींसा झाला म्हणजे मग माणूस केवळ एक यंत्र बनतो. यंत्र फार कार्यक्षम असेल, पण हृदय, आत्मा, विश्वास आणि आनंद हीं ज्यांत नाहींत अशा यंत्रवत् माणसांत काय अर्थ आहे ?

स्वतःच्या बाबतींत बोलायचें झालें तर मला स्वतःला म्हातारपण आल्यासारखें, दमल्यासारखें किंवा उदास झाल्यासारखें वाटत नाहीं. कारण मी जीं कांहीं कामें करतों, त्यांत मला साहसांतील उत्तेजितता मिळते, मी आनंदानें थरारून जात असतों. अर्थात् हें मी माझ्या प्रत्येक कामाविषयीं म्हणत नाहीं आहें. कांहीं वेळां वैफल्य येतें, निराशा होते. परंतु एकंदरींत पाहिलें तर काम करतांना, भारतांत आणि भारतीयांमध्यें जे बदल घडवून आणले जात आहेत, ते बारकाईनें पाहात असतांना मला मोठा हर्ष होतो. आंदोलनांत पुढें पुढें चाललेली अखिल जनता आणि बदलणारा देश हीं पाहाणें हें माझ्या आयुष्यांतलें एक सुखदायक काम होऊन राहिलें आहे.

प्र. आपल्या तोंडून हे उत्तेजनकारक शब्द ऐकतांना मला फार बरें वाटलें. नेहमीच्या भाषेंत ज्याला सत्तर वर्षांचा वृद्ध म्हणतील, अशी एक व्यक्ति इतकी ताजेपणानें रसरसलेली आणि तरुण कशी राहिली हें मला त्यांतून समजलें.

यामुळेंच भविष्याबद्दल फार मोठी आशा मनांत उभी राहाते. आतां भविष्यकाळाविषयींचा एकमेव आणि अखेरचा प्रश्न. औद्योगिक क्रांति आणि आपल्याकडील वैज्ञानिक आणि तंत्रविज्ञानात्मक नवयुग यांविषयीं आपण बोललांत; पण हें बोलत असतांनाच स्पुत्निक–ल्युनिक यांसारखे उपग्रह, अग्निबाण आणि आकाशयानें अंतरीक्षप्रवास व अंतरीक्षविजय यांच्या नव्या युगांत आपल्याला नेत आहेत. या नव्या अद्‌भुत शोधांचा आपल्या मनावर काय परिणाम होतो हें जाणण्याची माझी इच्छा आहे.

उ. या शोधांमुळें भविष्यकाळाविषयींच्या कुतूहलानें मन थरारून जातें. मानवी मनाला त्यांमुळें एक नवें परिमाण लाभणार आहे. मला एका बाजूनें वाईट वाटतें कीं मी तें पाहायला आणि अनुभवायला हयात असणार नाहीं. आज साऱ्या जगाचें रूप मोठ्या प्रमाणावर पालटतें आहे. त्यांत क्रांति होत आहे. भविष्यांत या जगामध्यें कोणते भौतिक आणि जीवशास्त्रीय बदल घडून येणार आहेत, त्याची आपल्याला कल्पनाहि करतां येत नाहीं. पण मुद्दाम लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं या अभूतपूर्व बदलांमुळेंच सामाजिक बदल हे पूर्वी कधीं नव्हते इतके निकडीचे झाले आहेत. अंतरीक्षांत घुसूं पाहणारें विज्ञान आणि जुन्या रूढि उराशीं कवटाळून बसलेला मानवी समाज यांमध्यें इतकी तफावत आहे कीं त्यामुळें जगांतला तोल एकदम बिघडल्याखेरीज राहाणार नाहीं. अधिक पुढारलेल्या देशांमध्यें या ढळलेल्या तोलाचे परिणाम एव्हांनाच दिसूं लागले आहेत.

विज्ञानामुळें मानवाचें कार्य जसजसें बदलत जाईल तसतशी समाजाची सामाजिक आणि आर्थिक घडण बदलत जाईल असें मला वाटतें. घाट हा कार्याप्रमाणें निश्चित होत असतो. तेव्हां, विज्ञानाबरोबर प्रगतीची वाटचाल करीत असतांना, वागणुकीचे नवे नियम, सामूहिक जीवनाचीं नवीं संघटनातत्त्वें आणि संश्लेषणाचें नवें विशाल व सहिष्णु तत्त्वज्ञान यांचा नवा पाया आपली संस्कृति स्वतःसाठीं शोधून काढील अशी आपण आशा करूं या. माणसांमाणसांमधली आणि राष्ट्रांराष्ट्रांमधली आजची विषमता उत्तरोत्तर नाहींशी होईल व संघर्ष व युद्धें यांचें मुख्य बीज उखडलें जाईल एवढी तरी निदान आशा ठेवूं या. आज जग चाचपडतें आहे तें मानवी अस्तित्वाच्या नव्या

परिमाणासाठीं, नव्या तोलासाठीं. आध्यात्मिक सखोलता आणि नैतिक शक्ति यांनीं सज्ज झालेला, पूर्णपणें सुसंघटित आणि सुनिबद्ध व्यक्तित्वाचा माणूसच नव्या काळाचीं आव्हानें स्वीकारूं शकेल. आध्यात्मिक तोल नसलेली भौतिक प्रगति ही अनर्थकारक ठरण्याचा संभव आहे. जगांत, जीवनांत आपल्याला कांहीं कार्य आहे याची माणसाची जाणीवच त्यामुळें हरपेल आणि मानव हा खराखुरा 'जिवंत' राहाण्याऐवजीं यंत्र बनेल.

या नव्या शोधांच्या एका बाजूविषयीं मला पूर्ण खात्री आहे. युद्ध, संघर्ष, हिंसा यांचे विचार मनांतून उपटून काढून शांतता, सहजीवन आणि सहकार्य यांसाठींच्या कृतनिश्चयाचीं बीजें मनांत रुजवणें ही या शोधांमुळें आतां माणसाची अपरिहार्य इतिकर्तव्यता झाली आहे. दोन हजार वर्षांपूर्वीं बुद्धानें शिकवलेल्या सहिष्णुता, करुणा आणि शहाणपणा यांच्या तत्त्वज्ञानाची गरज पूर्वीं कधीं नव्हती तेवढी आज आहे. लष्करी दृष्टीकोन आणि लष्करी उपाययोजना यांचें मूळच आंतरराष्ट्रीय जीवनांतून उखडून टाकणें अत्यावश्यक आहे. म्हणूनच अण्वस्त्रांच्या चाचणीवर बंदी घालणारा ठराव ताबडतोब आणि एकमतानें झाला पाहिजे आणि नंतर क्रमशः निःशस्त्रीकरण झालें पाहिजे.

प्र. हें ढळढळीत सत्य बडीं राष्ट्रें पाहातील आणि त्यांतून बोध घेतील अशी आशा आहे. आपल्या सल्ल्यांतलें शहाणपण हें सनातन भारतीय विचाराच्या व तत्त्वज्ञानाच्या झऱ्यांतून आलेलें आहे; तेव्हां विज्ञान व तंत्रविज्ञान यांनीं घडलेल्या क्रांतिकारक बदलांच्या संदर्भात भारताचें स्वरूप काय राहाणार आहे हें आपण सांगाल काय?

उ. शांतता, सहिष्णुता आणि सहजीवन यांचा दृष्टिकोण हा भारतीय विचार व तत्त्वज्ञान यांच्याशीं जुळता आहे आणि मी आपल्याला आधींच खुलासेवार सांगितल्याप्रमाणें, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय बाबींत आमच्यासमोर दुसरा मार्गच नाहीं. अणुशक्ति, जेट यंत्रशक्ति, अग्निबाण व अंतरीक्षप्रवास यांच्यामधील प्रगति गेल्या वीस ते तीस वर्षांत इतकी वेगानें होत आहे कीं त्यामुळें मानवी जीवनाचा संदर्भच समूळ बदलत आहे. तंत्रविज्ञानानें पुढें झेप घेतली आहे, तर राजकारण मागें पडलें आहे. वर्तमानकाळांतील वास्तव आणि

भूतकाळची विचारपद्धति यांमधील तफावत भरून कशी काढायची हा आपल्या-पुढील प्रश्न आहे. आपण भारतीय अनेक बाबतींत काळाच्या मागें पडलों आहोंत. पण युरोप आणि अमेरिका यांचें जीवन बदलून टाकणारी औद्योगिक क्रांति भारतांतहि होईल. तिचें पाऊल देशांत पडलेंहि आहे. तिच्या पाठी-मागें नवें तंत्रविज्ञान आणि विज्ञान यांनीं सुरू केलेली अधिक वेगवान् क्रांतीहि यावयाची आहे. म्हणजे आपण एकाच वेळीं तीन वेगवेगळ्या टप्प्यांवर कूच करीत आहोंत. या साऱ्यामुळें आपण कुठें पोचणार आहोंत हें कोणीच सांगूं शकत नाहीं. भौतिक समृद्धि अर्थात् लाभेलच; पण हें पुरेसें आहे काय? या जोरकस भौतिक बदलांचें आव्हान स्वीकारण्यासाठीं आपल्याला नैतिक शक्तीची आवश्यकता आहे. वैज्ञानिक शक्ति हें सामर्थ्य आहे, पण तिला अंगभूत नैतिकता नाहीं. ती नीतिबाह्य आहे. ही शक्ती वापरणाऱ्या माणसानेंच तिला नीतिचा पाया द्यायचा असतो. माणसाच्या हातांतली ही नवी शक्ति चांगल्या हेतूंप्रमाणें वाईट हेतूंसाठीं वापरली जाणें शक्य आहे. आणि वाइटासाठीं ती वापरली जाऊं नये याची हमी ती वापरणाऱ्या माणसांच्या नैतिक पातळीमुळेंच मिळूं शकेल, असें मला सांगायचें आहे. या प्रचंड शक्तींवर माणूस प्रभुत्व गाजवणार कीं माणसावर ताबा मिळवून या शक्ति त्याचा आणि त्याच्या संस्कृतीचा विध्वंस करणार—हा प्रश्न आहे.

अंशतः याच कारणामुळें गांधीजींनीं व्यवहारोपयोगी आणि परिणामकारक अशा कृतिशील तत्त्वज्ञानाच्या रूपानें पुन्हा प्रस्थापित केलेल्या आमच्या शांततेच्या परंपरेचें महत्त्व मी मुद्दाम सांगत आहें. नव्या तंत्रवैज्ञानिक संस्कृतीशीं जुळवून घेण्याच्या बाबतींत समाजाला आलेल्या अपेशांतून जे अंतर्विरोध निर्माण झाले त्यांचा धोका इतरत्र आहेच; पण सनातनी मार्गाची आणि इतिहासजमा दृष्टिकोनाची सवय झालेल्या भारतीय समाजांत तर हे धोके अधिकच तीव्र आहेत. पण आपल्याजवळ असलेली, सहिष्णुता व करुणा यांची महान् परंपरा संस्कृतीवर आलेल्या आपत्तींतून आपल्याला बाहेर काढील असें दिसतें.

हिटलर व मुसोलिनी जागतिक परिस्थितीच्या चित्रांत डोकावूं लागले तेव्हां-पासून आधींच्या प्रश्नाच्या आणखी एका बाजूमुळें मी काळजींत पडलों आहें.

विज्ञानानें माणसाच्या हातीं दिलेल्यां नव्या शक्ति बाजूस ठेवल्या तरी, अत्यंत पुढारलेल्या प्रचारयंत्राच्या साहाय्यानें हिटलरनें दुष्ट हेतूंच्या पूर्तीसाठीं जनतेला आपल्याबरोबर कसें नेलें या प्रश्नानें मी चकित होतों. त्यामुळेंच हुकुमशाही, सांचेबंदी आणि सर्वाधिकारशाही याचा वास जरी एखाद्या गोष्टीला आला, तरी मला त्या गोष्टीची घृणा येते. आतां प्रचाराच्या या युक्त्या ल्हान, पण घातक प्रमाणांत नेहमीच्या धंदेवाईक जाहिरातकलेंतहि येऊं लागल्या आहेत. भारतांत नसल्या, तरी अमेरिकेंत आणि इतरत्र येत आहेत. भारतांतहि त्या केव्हांतरी येणारच. मानवाच्या अर्धजागृत मनावर ज्या तऱ्हेनें जाहिरातकार प्रभाव गाजवतात, त्यांच्याविषयीं ऑल्डस हक्स्लेनें 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' आणि 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड रिव्हिजिटेड' या पुस्तकांमध्यें लिहिलें आहे. या पद्धतीमध्यें सुप्त धोके फार आहेत, आणि मानवजातीला ही पद्धत कोठें नेईल याचा अंदाज करणें खरोखर कठिण आहे.

प्र. माणसाच्या जाणिवेच्या कमरेखालीं वार करण्याचें हें नवें तंत्र म्हणावें?

उ. होय. अशा तऱ्हेनें हीं सगळीं वास्तवें मानवी अनुभवाला अगदीं नवीन आहेत. ज्याच्या विषयीं आपल्याला फार थोडी माहिती आहे—किंबहुना कांहींच माहिती नाहीं—अशा नव्या जगाकडे तीं आपल्याला नेत आहेत. या आव्हानाला तोंड द्यायचें तर, भूतकाळांतून चालत आलेले तात्त्विक हट्टाग्रह,—विशेषतः संघर्षांचा व हिंसेचा उपाय सुचवणारे हट्टाग्रह टाकून देणें आणि पूर्णपणें सुनिबद्ध व्यक्तित्वाचा मानव निर्माण करण्यासाठीं भौतिक समृद्धीबरोबरच मानवतेचें आध्यात्मिक व्यक्तित्व विकसित करणें एवढेंच आपल्या हातीं आहे. भविष्यकाळाचें आव्हान आपण फक्त याच मार्गानें स्वीकारूं शकूं. याच उपायानें आपण त्याच्या कसोटीला उतरूं शकूं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
१००००
मराठी ग्रंथ [illegible] ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.............. दि ..................
शाखा.............. नों: दि: ..............

# BIBLIOGRAPHY


## By Jawaharlal Nehru

*Autobiography* (London, John Lane, The Bodley Head, Ltd., 1936 , New York, John Day, 1941, under the title *Toward Freedom*).

*The Discovery of India* (Calcutta, Signet Press, 1946 ; New York, John Day, 1946)

*Eighteen Months in India* (Kitabistan, 1938).

*Glimpses of World History* (London, Lindsay Drummond, Ltd., 1939 ; New York, John Day, 1942).

*India and the World* (London, George Allen & Unwin, Ltd., 1936).

*Mahatma Gandhi* (Signet Press, 1949)

*Soviet Russia* (Chetana, Bombay, 1929)

*Towards a Socialist Order* (Indian National Congress, 1955)

*The Unity of India* (London, Lindsay Drummond, Ltd., 1941 , New York, John Day, 1942)

## Speeches and Biographical Sources

*A Study of Nehru* (A volume published on the Prime Minister's 70th Birthday, November 14, 1959), edited by Dr. Rafiq Zakaria (Times of India, Bombay)

*Jawaharlal Nehru—a Political Study*, by Michael Brecher (Oxford, London, 1959)

*Jawaharlal Nehru*, by Frank Moraes (The Macmillan Company, New York, 1956).

*Independence and After*, a collection of more important speeches from September, 1946, to May, 1949 (Government of India, 1949 ; New York, John Day, 1950).

*Jawaharlal Nehru's Speeches* 1949-53 (Government of India, 1954).

*Speeches in America* (New Delhi National Bookstall, 1950).

*Visit to America* (New York, John Day Company, Inc., 1950).

*Prime Minister Jawaharlal Nehru in China* (Embassy of the People's Republic of China, New Delhi, 1955).

*Speeches of Bulganin and Khrushchev in India* (Tass in India, 1956).

*Jawaharlal Nehru Press Conferences* 1952 (Information Service of India, 1955).

*Nehru Abhinandan Granth* (A volume presented to the Prime Minister on his sixtieth birthday, November 14, 1949).

*Nehru Your Neighbour*, edited by P. D. Tandon (Signet Press, 1946).

*Talks with Nehru*, by Norman Cousins (New York, John Day Company, Inc., 1951).

*So I Became a Minister*, by Vijayalakshmi Pandit (Kitabistan, 1939).

*With No Regrets, by* Krishna Hutheesing (Padma Publications, Bombay, 1944).

*Prison and Chocolate Cake*, by Nayantara Sahgal (New York, Alfred A. Knopf, Inc., 1954).